
# माणूस

शनिवार । २९ जानेवारी १९७७ । साठ पैसे



## मतपेटीचे शस्त्र

☐ स्वातंत्र्यातील निवडणुकीला यावर्षी पंचवीस वर्षे पुरी होत आहेत. या निवडणुकांनी काय साधले ?

☐ शांततेच्या मार्गाने सरकार बदलण्याचे मतपेटी हे प्रभावी साधन, पण प्रत्येक निवडणुकीत ५० टक्क्यापेक्षा कमी मते पडूनही केंद्रातील काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी नष्ट का करता आली नाही ? विरोधीपक्ष कोठें उणे पडले ?

☐ 'मत देऊन काय उपयोग ?' अखेर काँग्रेसच निवडून येणार ! आणि विरोधी पक्ष निवडून आले तर ते तरी काँग्रेसपेक्षा निराळे काय करणार आहेत ?' अशा वैफल्याच्या वृत्तीतून काँग्रेस विरोधी मतदार घरी बसतात आणि काँग्रेस निवडून येते. हे थांबविता येणार नाही का ?

☐ आजच्या निवडणुका सामान्य कार्यकर्त्यांसाठी नाहीत. पैशाची थैली मोकळी सोडणाराच निवडून येऊ शकतो हे कितपत खरे आहे ?

☐ पैशाप्रमाणेच सत्तेच्या, जातीच्या दडपणातून मतदार कसा मुक्त होईल ?

☐ आजच्या निवडणूक पद्धतीतील उणीवा दूर करून परिपूर्ण लोकशाहीकडे कसे जाता येईल ?

## खास उहापोह

**' माणूस ' मधून लवकरच....**

**तपशील पुढील अंकी**

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक पस्तिसावा**

**२९ जानेवारी १९७७**

**मूल्य : साठ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
*


## सप्रेम नमस्कार....

¤ मी स्वतः कोणत्याही वादाचा अनुयायी नाही; परंतु इतर तत्त्वज्ञानाप्रमाणेच मार्क्सवादाचाही अभ्यासक आहे.

आपल्या पत्राच्या दि. १५ जानेवारीच्या अंकातील 'समाजवादी क्रांतीच्या वाटेतील खाचखळगे' हा लेख वाचनात आला व तो काहीसा एकांगी असला तरी, त्यातील एकंदर विश्लेषण बऱ्याच बाबतीत यथार्थ वाटले. तरीही या बाबतीत विधायक स्वरूपाचा विचार होणे अगत्याचे वाटते. 'मार्क्सवाद' काय अथवा महात्मा गांधीप्रणीत 'आसनविरहित समाजरचना' काय प्रत्यक्षात आणावयाची सुरुवात ही कोणत्या तरी सामाजिक यंत्रणेमार्फतच व्यवहार्य होऊ शकते व मग तिच्यातला आदर्शवाद पातळ होत होत गंगावतरणासारखा होऊन, निश्चित पात्रातून वाहू लागणे अपरिहार्य होते. आदर्शाचे असे अवतरण होत असताना त्याची अपरिहार्य वळणे ध्यानात घेऊन त्याला अविकृत स्वरूपात नव्या बदलणाऱ्या परिस्थितीच्या संदर्भात कायम टिकवणे व त्यातील मूळ अभिप्रेत आशय अधिकाधिक प्रगट कसा होईल ते दाखवणे ही विधायक विचारसरणी झाली.

मार्क्सवाद राज्यवादात रूपांतरित होऊन तो स्थिर झाला एवढीच परोपरीने टीका करून भागणार नाही. उदित झालेल्या राष्ट्रवादाला संघर्ष देण्याच्या बुद्धीत मार्क्सवादाला स्थिर स्वरूपाचे राज्यवादाचे स्वरूप घेणे अपरिहार्य होते. त्याशिवाय मार्क्सवाद क्रांतीच्या नंतरच्या काळात कितपत टिकाव धरतो हा प्रश्नच आहे. आता राज्यवाद काहीसा स्थिर होत असताना मार्क्सवादाला विविध राष्ट्रवादांच्या छटा चढणेही ओघानेच येते. प्रश्न आहे तो हा की, या राज्यवादाच्या नंतरची मार्क्सवादाशी निष्ठा ठेवणारी अवस्था कोणती? ती स्पष्ट करता आली, तिच्यासंबंधी काही निश्चित निदाने करता आली तर ती विधायक विचारसरणी म्हणता येईल. राज्यवादाचा धोका मार्क्सनीही सांगितला होता. अर्थात तो येईल हे मार्क्सवादालाही अभिप्रेत होते; पण या अवस्थेतून बाहेर कसे पडावयाचे ते सांगणे हे विधायक विश्लेषण म्हणता येईल. केवळ स्टॅलिनवाद व त्यातून निष्पन्न झालेला राज्यवाद व त्यातील उणीवा दाखवण्याने खरा कार्यभाग होणारा नाही. फार तर ते एक मार्मिक विश्लेषण होईल. तरी क्रांतिवंतांच्या समाजव्यवस्थांचा अभ्यास करीत राहणे व त्यांच्या प्रगतीची द्रष्टेपणाची निदाने वर्तविणे हाच एक पर्याय साम्यवादाच्या अविकृत प्रगतीकरिता आहे असे म्हणावे लागेल.

ता. १५-१-७७ — अ. तु. वाळके, डोंबिवली.

## खुषीपत्रे . . .

¤ मी जुलै ७६ पासून 'माणूस'मध्ये इंग्रजी पुस्तकांचे परिचय वजा परीक्षण लिहायला लागलो. आतापर्यंत सुमारें २३ पुस्तकांची परीक्षणे/परिचय लिहून झाली. पुस्तके निवडताना मुद्दाम वेगवेगळ्या विषयावरील पुस्तके घेतली.

या कालावधीत मला वाचकांची भरपूर पत्रे आली. श्री. मा. ग. पेठे, वामन हरी पेठे, ज्युवेलर्स, पेठे बिल्डींग, मुंबई नं. ४ असे लिहितात की 'माणूस'मधील माझे इंग्रजी पुस्तकांचे सदर चांगले व उद्बोधक आहे. श्री. ह. मो. मराठे, श्री. विद्याधर पुंडलिक व इतर साहित्यिक मंडळींनीसुद्धा मी हे सदर चालू ठेवावे अशी इच्छा माझ्या वाचनालयात येऊन व्यक्त केली.

पद्मभूषण श्री. ना. सी. फडके यांनी त्यांच्या inimitable भाषेत अशी चिठ्ठी पाठवली आहे, की 'मी जर राजा असतो

तर तुम्हाला राज्यच बहाल केले असते!'

डॉ. मु. ब. शहा, दैनिक स्वतंत्रभारत, धुळे लिहितात की 'ज्ञान व रंजकतेच्या दृष्टीतून हे सदर निश्चितच अनेकांना आवडत असेल.' त्यांनी माझे लेख 'दैनिक स्वतंत्र भारत'मध्ये परत छापण्याविषयी परवानगी मागितली व ती मी त्यांना दिलीही आहे.

श्री. बी. डी. उन्हाळे, १६२/६ रेल्वे लाइन्स, बाकळे बंगला, सोलापूर ह्यांना माझ्या 'बर्मुडा ट्रायँगल' हा लेख इतका आवडला की त्यांनी मला परभणी जिल्ह्यात एका गावात दोन मुलं फक्त छाती इतक्या पाण्यात २००० च्या समुदायासमोर कशी बुडाली त्याचे वर्णन लिहिले आहे!

श्री. सुधीर डी. देशपांडे, २८/१५१८ खेर नगर, पूर्व वांद्रा, मुंबई ४०००५१ यांनी माझे 'माणूस'मध्ये येणारे लेख खूपच आवडतात असे लिहिले आहे व माझ्या पुस्तकप्रेमाबद्दलही कौतुक केले आहे!

श्री. विद्याधर चौधरी, १४५, फार्म लँड, रामदास पेठ, नागपूर, यांनी असे लिहिले आहे की 'माणूस'मधील परीक्षणे वाचून त्यांना ती पुस्तके विकत घेण्याचा मोह होत आहे.

या सदराविषयी मला इतर सुमारे ७०–८० पत्रे आली आहेत. त्या सर्वांचा इथे उल्लेख करता येत नाही त्याबद्दल दिलगीर आहे. तथापी प्रत्येकांना मी वैयक्तिक उत्तर पाठवले आहेच.

वरील सर्व लोकांचा व ज्यांनी ज्यांनी मला पत्रे पाठवली आहेत त्यांचा मी आभारी आहे.

काही अपरिहार्य कारणामुळे थोडे दिवस मला खंत वाटते. पण शक्य तेवढ्या लवकर ते मी जरूर पुन्हा सुरू करीन.

'माणूस'चे श्री. माजगावकर ह्यांना नवीन लेखकांचा वास येतो की काय कोण जाणे! परंतु हे सदर लिहावयास त्यांनीच मला तयार केले!!

**—जे एन्. पोंडा.**
**फिनिक्स लायब्ररी**

# नवनिर्माण आणि लोकशाही

**श्री. ग. मा.**

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी तडकाफडकी जाहीर केलेला निवडणुकांचा कार्यक्रम म्हणजे त्यांच्या धक्कातंत्राचा आणखी एक प्रयोग आहे. हा निर्णय दोन महिन्यांपूर्वी घेऊन बेचाळीसावी घटनादुरुस्ती नवीन लोकसभेपुढे ठेवणे त्यांना अशक्य नव्हते. लोकशाहीच्या दृष्टीने असे करणे हेच अधिक उचित ठरले असते. परंतु त्यावेळी पंचवीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निवडणुका हा जणू काही एक अडथळा आहे, अशी हवा निर्माण केली गेली. युवक काँग्रेसद्वारा ही हवानिर्मिती झाली. संजय गांधी यांच्या मेळाव्यात, भाषणात-मिरवणुकात 'रोटी चाहिये–चुनाव नही' अशा घोषणाही दिल्या गेल्या. दोन महिन्यांत परिस्थितीत अशी कोणतीही सुधारणा झाली नाही की, त्यावेळी नको असलेल्या निवडणुका आज एकदम आवश्यक ठराव्यात. कदाचित पाश्चिमात्य देशामधील, विशेषत: नव्या अमेरिकन शासनासमोरील आपली लोकशाही प्रतिमा उजळण्याची निकड इंदिरा गांधींना भासली असावी; किंवा युवक काँग्रेसची चढाई थोपवून धरणे हाही यामागील हेतू असावा. कारणे कोणती, हे इंदिरा गांधीच जाणू शकतील, कारण कोणालाही विश्वासात न घेता धाडकन निर्णय घेऊन टाकण्याची त्यांची पद्धती आता सुपरिचित झाली आहे. निवडणुकांचा निर्णय रेडिओवरील भाषणात त्यांनी अचानक जाहीर करून टाकला, तेव्हा परराष्ट्र मंत्र्यांसारखे त्यांचे ज्येष्ठ अनुभवी सहकारी परदेशात दौऱ्यावर होते, ही बाब तर अनेकांना खटकल्याशिवाय राहिली नाही. आणीबाणी जाहीर करून प्रथम इंदिराजींनी विरोधी पक्ष खतम केले असे म्हटले जाते. पण आणीबाणीचा परिणाम काँग्रेस पक्षावरच अधिक झाला. जुने अनुभवी, निष्ठावंत कार्यकर्ते दूर फेकले गेले; काँग्रेस संघटना निर्जीव बनली, स्थानिक पातळीवर पक्षाला काही अस्तित्व उरले नाही. सर्व सत्ता नोकरशाहीच्या हाती केंद्रित झाली. लोकशाही म्हणजे लोकांनी राजकारणात सहभागी असणे. आणीबाणीमुळे हा सहभाग संपला, सत्तेचे–राजकारणाचे केंद्रीकरण झाले. हे केंद्रीकरण कसे थांबवायचे, लोकशाहीच्या निकोप प्रक्रिया पुन्हा कशा सुरू करायच्या एवढाच या निवडणुकांमधील मुख्य प्रश्न आहे. विरोधकांनी, तसेच काँग्रेसपक्षीयांनीही या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करायला हवा. नाहीतर उद्यापरवा, नजिकच्या भविष्यकाळात पक्षांचे अस्तित्वच संपुष्टात येईल. सत्ता अधिकाधिक केंद्रित होईल, अपरिहार्यपणे भ्रष्टही होईल. बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीमुळे कागदोपत्री तरी ही केंद्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेलीच आहे. पण ती झालेली नाही असे वाटणे हा इंदिराजींच्या धक्कातंत्राचा विजय आहे. या विजयाच्या चमचमाटात निवडणुका होत आहेत. त्यामुळे लोकशाहीवाद्यांची अवस्था आणखी-

नच नाजूक आणि चमत्कारिक झालेली आहे. जळत्या वर्तुळातून सूर मारून पलीकडे जाण्याचा खेळ सर्कसमध्ये आपण नेहमी पाहतो. लोकशाहीवाद्यांना हा खेळ करून दाखवायचा आहे. सूर मारणाऱ्या कसरतपटूइतकेच कौशल्य व जागरूकपणा यासाठी आवश्यक आहे. जरा इकडेतिकडे झाले तरी अंग भाजून निघण्याची शक्यता आहे. तेव्हा आणीबाणी शिथिल झालेली असली तरी उठलेली नाही याचे भान ठेवूनच मिळालेल्या संधीचा सर्व लोकशाहीवाद्यांनी लाभ उठवला पाहिजे. मागच्या चुका कटाक्षाने टाळल्या आणि नवीन केल्या नाहीत तरच काही पदरात पडण्याची शक्यता आहे. नाहीतर आणीबाणीची टांगती तलवार पुन्हा कोसळण्याची भीती आहेच.

यादृष्टीने लोकशाहीवाद्यांनी करावयाचे पहिले कार्य म्हणजे आपली जनमानसात असलेली 'विरोधी पक्ष' ही प्रतिमा पुसून टाकणे, हे होय. राज्यकर्त्यांचा भडीमारी एकतर्फी प्रचार याला मुख्यत्वे कारणीभूत असला तरी विरोधी पक्षांच्या गेल्या दहा-पंधरा वर्षांतील वागणुकीकडे, धोरणांकडे दोषाचा वाटा अगदीच नाही असे म्हणता येणार नाही. आपण नवनिर्माणासाठी उभे आहोत ही प्रतिमा आजवर तरी विरोधीपक्षांना—आता होऊ घातलेल्या प्रतिपक्षाला ठसवता आलेली नाही. सत्ताधाऱ्यांना सर्वांत अधिक भय अशा स्वतंत्र, स्वयंभू प्रतिमेचे असते आणि ती जराही कुठे निर्माण होऊ लागली तर सत्ताधारी सर्व साधनांनिशी ती तोडूनमोडून टाकण्यास मागेपुढे पाहात नाहीत. गेल्या पंचवीस वर्षांत प्रथमच जयप्रकाशांच्या आंदोलनामुळे प्रतिपक्षाची अशी एक स्वतंत्र प्रतिमा तळामुळापासून निर्माण होऊ पाहत होती. आणि याचेच पर्यवसान शेवटी आणीबाणी घोषित होण्यात झाले. कारण अल्पसे का होईना, नवनिर्माण आंदोलन हे जनतेतून उठलेले, खालून वर आलेले एक जीवंत आव्हान होते. ते असंघटित व उद्रेकी स्वरूपाचे होते, बिहार व्यतिरिक्त इतर कुठे ते फारसे पसरलेही नव्हते, हे खरे. पण तरी ते केवळ नकारात्मक नव्हते. सत्ताबाजीने निदान सुरुवातीला तरी पछाडलेले नव्हते. 'नया देश बनायेंगे' अशी विधायक नवनिर्मितीची प्रेरणा त्यामागे होती व जयप्रकाशांच्या समाजवादी—सर्वोदयी पूर्वपरंपरेमुळे समाजातील अगदी खालच्या स्तराला स्पर्श करण्याचा त्यात प्रयत्न होता. जयप्रकाशांनी तरुणांना शाळा-कॉलेजांवर बहिष्कार टाकायला सांगितला, तो या स्तरांत जागृतीचे काम त्यांनी करावे म्हणून. टोळकी करून गावभर भटकण्यासाठी किंवा हॉटेलांत बसून धुराच्या वर्तुळात चकाट्या पिटण्यासाठी हे आवाहन नव्हते. 'खेड्यात चला' हा गांधीजींचा मंत्रच जयप्रकाश पुन्हा तरुणांना ऐकवत होते. गुजराथेतील भ्रष्टाचाराविरोधी आंदोलनातसुद्धा हा नवनिर्मितीचा काही अंश होताच, जरी पुढे तो लुप्त झाला व हितसंबंधीयांनी आंदोलनाचा कबजा घेतला तरी. असे सगळ्या आंदोलनात कमीजास्त प्रमाणात होतच असते. अगदी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनही याला अपवाद नाही. विरोधी पक्ष केवळ एकत्र येण्याने ही विधायक प्रतिमा निर्माण होणार नाही. त्यांनी जयप्रकाश आंदोलनातील नवनिर्माणाचा हा तुटलेला धागा पुन्हा जोडून घ्यायला हवा. इंदिरा गांधींनी नवनिर्माणाचे आव्हान अचूक ओळखले व समाजातील अगदी खालच्या वर्गांना आकर्षित करील असा वीस कलमी कार्यक्रम आणीबाणी पाठोपाठ ताबडतोब जाहीर करून टाकला. जनतेला भ्रष्टाचाराविषयी घृणा वाटू लागली आहे, यांचीही त्यांनी नोंद घेतली व आणीबाणीचा यादृष्टीनेही काही वापर केला. एकीकडे त्यांनी नवनिर्माण आंदोलन चिरडून टाकले आणि दुसरीकडे या आंदोलनातील सत्वांश ग्रहण करून त्या पुढे झेपावल्या. एकत्रित आलेल्या लोकशाहीवादी विरोधीपक्षाने—प्रतिपक्षाने, लोकशाही रक्षणाप्रमाणेच नवनिर्माणाची इंदिरा गांधींच्याही पुढची झेप घेण्याची तयारी दाखवल्याशिवाय त्यांची पूर्वीची नकारात्मक प्रतिमा पुसली जाणार नाही व हुकमाचे एकही पान त्यांच्या हाती येणार नाही. सत्ताधाऱ्यांच्या चुकांचे भांडवल करून विरोधी पक्ष एक बिनहुकमी डाव गेली पंचवीस वर्षे खेळत आलेले आहेत. याचा त्यांना नसला तरी लोकांना खरोखरच कंटाळा आलेला आहे. लोकशाहीरक्षण आणि नवनिर्माण या दोन पायावर नवा प्रतिपक्ष उभा राहू लागला तरच हा कंटाळा दूर होईल आणि आज नाही उद्या एखादी वेगळी वाट दृष्टोत्पतीस येईल. अशी वेगळी व नवी वाट दीर्घकाळ चोखाळण्याची तयारी नसेल तर इंदिरा गांधींचे धक्कातंत्र नेहमीच यशस्वी होत राहील आणि विरोधकांना तक्रारी करत राहण्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच कार्यक्रम शिल्लक उरणार नाही. दोन/चार जागा कमी मिळाल्या तरी चालतील परंतु एकत्रित आलेल्या विरोधी पक्षांनी खराखुरा पर्यायी प्रतिपक्ष लोकांसमोर ठेवावा. लोक आपणहून त्यांच्या मागोमाग येतील. कारण केंद्रीकरणाचा अतिरेक, लोकशाहीवरील बलात्कार कोणालाच नको आहे. पण प्रगतीचा वेगही मंदावून उपयोगी नाही. ही दोन्ही आव्हाने पेलू शकणारा समर्थ प्रतिपक्ष ही आजची राजकीय गरज आहे. एकत्रित आलेल्या विरोधी पक्षांनी ही गरज ओळखून आपली वाटचाल सुरू केली तर यश दूरचे असले तरी अप्राप्य नाही. □


**Why Indira Rules**

**इंदिरा गांधींच्या सत्तेचे रहस्य काय?**

**निराद चौधरी यांच्या**
**जगभर गाजलेल्या लेखाचे भाषांतर**
**माणूसमधून लवकरच...**

# मुक्काम पुणे

मुकुंद मणूरकर

## राजकीय क्षेत्र गजबजले

इंदिराजींनी लोकसभेच्या निवडणुका घेण्याची घोषणा केली आणि गेले दीडएक वर्ष मरगळलेले राजकीय क्षेत्र गजबजून गेले. पुण्यात काँग्रेस हाऊसवरच काय ती वर्दळ चालू असायची. पण आता जनसंघाचे जोगेश्वरीजवळील कार्यालय, समाजवाद्यांचे काकाकुवा मॅन्शन येथेही उत्साही धावपळी सुरू झाल्या आहेत. मोहन धारियांची सुटका गेल्याच आठवड्यात झाली होती. जनसंघ, समाजवादी, डावे कम्युनिस्ट यांच्या नेत्यांचीही सुटका हळूहळू होत आहे. वृत्तपत्रीय नियंत्रण रद्द करणे व जाहीर सभांना परवानगी देणे या घोषणेमुळे निवडणुका बऱ्याच अंशी खुल्या वातावरणात पार पडणार याची खात्री वाटू लागलीय.

दरम्यान लोकसभेसाठी उमेदवार ठरविण्यासाठी काँग्रेस पक्षाची गडबड चालू आहे. पुण्याची निवडणूक ही काँग्रेसला नेहमीच डोकेदुखी ठरते. यावेळी तर त्यांना बहुधा मोहन धारियांविरुद्ध सामना करायचाय्. बहुधा म्हणण्याचं कारण म्हणजे काँग्रेसमधील काही मंडळी काँग्रेसने मोहन धारियांनाच उभं करावं असं म्हणताहेत. त्यांचं म्हणणं असं की, धारियांना काँग्रेसमधून सहावर्षांपर्यंत बडतर्फ केलंय ते श्रेष्ठींनी. त्यांनी स्वतःहून काही राजीनामा दिला नाही. तेव्हा ज्यांनी त्यांना काढलंय् ते त्यांना पुन्हा परत घेऊ शकतील. ते ढीग घेऊ शकतील, पण धारियांनी जायला पाहिजे ना? त्यामुळे सध्याचा एकंदर सूर बघता विरोधी जनता पक्षातर्फे धारियांची उमेदवारी निश्चितच समजायला हवी.

आणि धारियांना तुल्यबळ ठरेल असा उमेदवार काँग्रेस पक्षात नाही. त्यामुळे एखादा तरुण किंवा युवक काँग्रेसचा कुणीतरी धारियांविरुद्ध उभा करायचा बेत चालू आहे. अशा तऱ्हेची खेळी काँग्रेसने मागे एकदा बऱ्याच यशस्वीपणे खेळली होती. विधानसभा निवडणुकीच्या वेळी शुक्रवार पेठ मतदारसंघातून रामभाऊ म्हाळगींविरुद्ध काँग्रेसने वसंत थोरातांना उभं केलं होतं. आणि त्या चुरशीच्या निवडणूकीत रामभाऊ निसटत्या मतानेच विजयी झाले होते. तशीच चाल यावेळीही करायचा काँग्रेसचा विचार दिसतोय. तसं झालं तर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष उल्हास पवार यांच्यावर ही जबाबदारी पडेल. पण मुंबई प्रदेश व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या विलीनीकरणानंतर पहिल्या अध्यक्षपदाचा मान मिळालेले पवार पुण्याच्या या तितक्याशा सुरक्षित नसलेल्या जागेसाठी स्वतःहून आग्रह धरतील असं वाटत नाही. चाळीस टक्के जागा यावेळी युवक काँग्रेसला मिळाव्या असा आपण आग्रह धरणार असल्याचं जरी त्यांनी सांगितलं असलं तरी हमखास निवडून येणाऱ्या जागाच युवक काँग्रेसच्या पदरी पडाव्यात असा त्यांचा प्रयत्न असणार.

धारियांशी बऱ्यापैकी लढत देऊ शकतील असे विठ्ठलराव गाडगीळ हे एकमेव काँग्रेसचे उमेदवार दिसताहेत. मागे एस्. एम्. जोशींविरुद्ध त्यांनी निवडणूक लढविली त्यावेळी ते विशेषसे प्रसिद्धीत नव्हते. पण नंतर राज्यसभेचे खासदार बनून मंत्रिपदाचा अनुभव उपभोगल्यानंतर त्यांनी बरेच वजन आणि वलय प्राप्त करून घेतले आहे. विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना जरी काँग्रेसला सोयीची असली तरी लोकसभेची वाढीव जागा निव्वळ पुणे शहराला देताना पूर्वीचा शहराला जोडलेला ग्रामीण भाग आता अलग करण्यात आलाय्. त्यामुळे या भागातील वट्ट मतं जी काँग्रेसला मिळायची ती आता मिळू शकणार नाहीत. त्यामुळे शहरी संस्कृतीला जास्तीत जास्त जवळच्या ठरणाऱ्या विठ्ठलरावांनाच बहुधा काँग्रेस उभं करील.

एकूण ही निवडणूक काँग्रेस पक्ष प्रतिष्ठेची करणार हे उघडच आहे. आणीबाणीपूर्वी काँग्रेसमध्ये व आता काँग्रेसबाहेर पडलेल्या ज्या कोणी हाताच्या बोटावर मोजता येतील अशा बड्या आसामी आहेत त्यात धारियांचा नंबर बराच आहे.

मागे एक्काहत्तर साली बडी आघाडी अस्तित्वात असतानाही त्यातील जनसंघ व समाजवादी या दोन घटकपक्षांनी रामभाऊ म्हाळगी व भाई वैद्य यांना उभं करून एकमेकांविरुद्ध पुण्यात निवडणूक लढविली होती. यावेळी तसं काही होण्याची शक्यता नाही. जनता पक्षातर्फे एकटे धारियाच उभे राहतील. बाळ ठाकऱ्यांनी काँग्रेसच्या हातात हात मिळविण्याचे ठरविल्यामुळे शिवसेनाही आपला उमेदवार काँग्रेसविरुद्ध पुण्यात उभा करणार नाही. रिपब्लीकन पक्षाची पुण्यात फारशी मतं नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने काँग्रेस व जनतापक्ष अशी दुहेरी लढतच यावेळी होईल अशी चिन्हं दिसताहेत. ◻

## हे नगरसेवक ?

पुण्यातील एका वर्तमानपत्रात एक खळबळजनक बातमी प्रसिद्ध झालीय्. महापालिकेचे काही नगरसेवक एका रात्री महापालिकेची गाडी महापालिकेच्या ड्रायव्हरसकट घेऊन खेडशिवापूरला गेले. तेथील एका भानगडीच्या हॉटेलमध्ये जाऊन मद्यप्राशन व त्यानंतरचे प्रकार करून वर त्या ड्रायव्हरलाच मारहाण करून परत पुण्यात आले. या बातमीचा इन्कार झाला नाही म्हणजे ती ज्या प्रमाणात प्रसिद्ध झाली त्या प्रमाणात सत्य असेलच असं कुणी म्हणणार नाही. आणि सत्य असली तरीही काही हरकत नाही. कारण सीझरची पत्नीसुद्धा

चारित्र्यशुद्ध असावी, ही म्हण आता अडगळीत पडली आहे. आता सीझरची पत्नीच काय पण स्वतः सीझरसुद्धा चारित्र्यहीन असला तरी चालू शकतो. त्यालासुद्धा स्वतःचे असे काही खाजगी आयुष्य आहेच की नाही, ही कल्पना स्वीकारण्याइतक्या लोकांच्या जाणीवा रुंद नक्कीच झाल्या आहेत. त्यामुळे नगसेवकांच्या वरील कृत्याकडे जळजळत्या डोळ्यांनी कुणी पाहणार नाही. पण मौजमजा करताना महापालिकेची गाडी ड्रायव्हरसकट वापरून लोकांच्या डोळ्यांवर आपली कृत्ये येणार नाहीत याची काळजी स्वतःला लोकप्रतिनिधी समजणाऱ्यांनी नक्कीच घ्यायला पाहिजे.

एकूणच नगरसेवकांनी स्वतःच्या पदाचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. महापालिकेच्या सभेत ज्या तऱ्हेच्या व ज्या दर्जाने चर्चा होतात त्या पाहता वरील विधानाची सत्यता पटावी. याचं ताजं उदाहरण म्हणजे परवा झालेली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा. यात एका सदस्याने तेलगू भाषेतून भाषण केलं. इतकंच नव्हे तर महापालिकेचा कारभार तेलगू भाषेतून चालावा असंही ते म्हणाले. (तेलगू ही एक भारतीय भाषाच आहे हे त्यांनी केलेले समर्थन तर निव्वळ अभिनंदनीय ठरावे !) या मुद्द्यावर नंतर खूप गदारोळ झाला. आणि तेलगू भाषणातला मुख्य मुद्दा जो सभा तहकूब करण्याबद्दलचा होता तो मागे पडला. तो पुन्हा जेव्हा विचारात आला त्या वेळी अध्यक्षांनी जाहीर केलं की, काही कामकाज झाल्याशिवाय सभा तहकुबीचा ठराव मांडता येणार नाही. तेव्हा आपण आधी थोडं काम करू या. हे म्हणजे भातुकलीच्या खेळात आईवडील झालेली लहान पोरं लग्न व्हायच्या आधी आपण आईवडील झालोच कसे असं म्हणत आधीचे सर्व सोपस्कार करतात तसं झालं. केवळ सभा तहकूब करता यावी म्हणून दोनचार गोष्टी चर्चेसाठी घेण्यात आल्या.

महापालिकेच्या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर जे ठराव असतात त्यातील निम्मे अधिक ठराव कुणा ना कुणाच्या अभिनंदनाचे असतात. ज्यांचा पुणे शहराशी, महाराष्ट्राशी दूरान्वयानेही संबंध नाही अशांचे, त्यांनी केलेली कामगिरी कितीही चांगली असली तरी, महापालिका अभिनंदन करून काय मिळविते ? बरे, हे अभिनंदन नेहमीच निखळ स्वरूपातलं असतं असंही नव्हे. असं उलटसुलट चर्चा होऊन दर्शविलेले अभिनंदन संबंधित व्यक्तीला कशा प्रमाणात पोचत असेल कुणास ठाऊक !

पक्षातीत आणि शहरसुधारणेशी निगडित इतपतच महानगरपालिकेचे कार्य असावं. हें करताना महापालिकेच्या सभागृहाला गावच्या चावडीचे स्वरूप येऊ नये. अर्थात महापालिका म्हणजे शहराची चावडीच, असं कुणी म्हणेलही कदाचित. त्यांना मात्र आमचे सलाम ! □


बायजा द्वैमासिक

# कथा स्पर्धा

आजचे जीवन धकाधकीचे, ओढगस्तीचे व गुंतागुंतीचे बनले आहे. प्राप्त परिस्थितीत कुणी भरडून निघत आहेत तर कुणी ताठ मानेने त्यास सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत, खरे तर, समाजजीवनाचा शोध घेणारे रसरसते जिवंत साहित्य निर्माण व्हावयाचे. परंतु आजची कथा व इतर ललित लिखाण बहुतांशी पलायनवादी आहे व काल्पनिक जगतात वाचकास ते गुंतवून ठेवत आहे असे दिसते.

याहून अगदी निराळे, दलित समाज, आदिवासी समाज, कष्टकरी स्त्री यांच्या जीवनाच्या प्रश्नाला जाऊन भिडणारे आणि भूतकाळात न बुडता भविष्याचा वेध घेणारे जिवंत लिखाण तरुण-तरुणींना करावयास निश्चित आवडेल. त्यांच्यासाठी ही कथा-स्पर्धा.

स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.

कथेची शब्दमर्यादा सुमारे १०००.

कथा कागदाच्या एका बाजूला लिहिलेली असावी व त्याबरोबर लेखकाचे नाव, पत्ता, व्यवसाय व शिक्षण ही माहिती जोडावी.

कथा १५ मार्च १९७७ पर्यंत पुढील पत्त्यावर पाठवावी.

प्रा. सौदामिनी राव, संपादक 'बायजा' ९७, प्रभात रस्ता, पुणे ४.

उत्कृष्ट कथांना पारितोषिके।

| | | |
|---|---|---|
| पहिले | रु. | २५/- |
| दुसरे | रु. | २०/- |
| तिसरे | रु. | १५/- |

**निवडक कथांना 'बायजा'मध्ये प्रसिद्धी मिळेल.**

# आज ना उद्या तुझा वनवास संपेल !

अल्बर्ट कामू

स्वतंत्र माणूस म्हणून जगणे वाटते तेवढे सोपे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की ज्यांनी स्वातंत्र्यावर पाणी सोडायचे ठरविलेले असते तेच फक्त असा दावा करत असतात. कारण स्वातंत्र्य नाकारले जाते ते त्यापासून चार दोन खास हक्क मिळतात म्हणून नाही, तर ते उपभोगायची किंमत जबर असते म्हणून. स्वातंत्र्याबरोबर प्राप्त होणाऱ्या साऱ्या हक्कांची राखण आणि पडणाऱ्या साऱ्या जबाबदाऱ्यांचे पालन करायचे तर त्यासाठी अविरत मेहनतीची, जागरूकतेची आणि स्वत्वाच्या प्रखर जाणिवेची आवश्यकता असते.

स्वातंत्र्याची उठता बसता भलामण करणारे अनेक असतात पण ते सारेच काही प्रामाणिक, सन्मान्य नसतात. स्वतःचे हितसंबंध संभाळले जात असतील, अधिकार सुरक्षित राहात असतील तोपर्यंत स्वातंत्र्याचा उदो उदो करणारे परंतु त्यांना धक्का लागताच मुस्कटदाबीचे समर्थन करणारे आपले नव्हेत. दारिद्र्य आणि भय, अमानुष अत्याचाराला बळी जाणे हेच यांचे भवितव्य. अशा या युगात अत्याचारापुढे मान तुकविण्यासच नव्हे तर वेळ येताच अत्याचाराची साधने वापरण्यासही नकार देणारे उद्याच्या जगाची प्रेरणा ठरतात.

अशी माणसे दुर्लभ खरीच. आज अशा स्वातंत्र्याला फारसे समर्थक दिसत नाहीत. विसाव्या शतकाची खरी प्रेरणा स्वातंत्र्य नसून गुलामी आहे, असे मी एकदा बोलून गेलो होतो. शब्द कटू होते, विशेषतः ज्यांच्या त्यागापासून आजही आपल्याला स्फूर्ती मिळते त्यांच्यावर अन्याय करणारे होते. परंतु दिवसेंदिवस कमी होत जाणारी सहिष्णुता, निंदा–नालस्तीचे वाढते बळी, शब्दांचा बाजारू वापर, अत्याचारांचे थिटे समर्थन आणि पाशवी बळाचे निर्बुद्ध स्वागत हे सारे पाहून येणारा उद्वेग आवरणे अनेकदा अशक्य होते.

गुलामगिरीकडे असलेली वाढती प्रवृत्ती हा चांगुलपणाचा, मूल्यांचा भाग आहे,असे मानणाऱ्यांची संख्या वाढते आहे. बुद्धी आपल्या भेकडपणाचे समर्थन शोधण्यात गुंतली आहे. प्रत्येक भेकडपणाला त्याचे असे समर्थन हे असलेच ! त्यामुळे अशी समर्थने सहज सापडतात. आपल्यातर्फे विचार करण्याची, कार्यक्रम ठरवून देण्याची, हमी देणाऱ्या पक्ष व संघटनांसाठी स्वतःच असे मत बाळगण्याची, स्वतःच्या विचारांशी सुसंगत असे वर्तन ठेवण्याची जबाबदारी सोयीस्करपणे टाळली जाते. परस्परविरोधी सिद्धांतातील कोणता अधिक सत्य, योग्य हे ठरविण्याचा आजच्या बुद्धीवादयांचा निकष एकच दिसतो. अधिक बळ कोणत्या बाजूकडे ! एकदा हे ठरले की दास्याचे समर्थन करणारे सारेच चांगले !

सामाजिक हित, बहुजन समाजाचे कल्याण हे कारण आपल्या कृत्यांचे समर्थन करण्यासाठी नेहमीच पुढे केले जाते. शिवाय ही जुलमी कृत्ये अमलात आणण्यासाठी आवश्यक ते नैतिक बळही हे कारण पुरविते. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की जनकल्याणाचे निमित्त सांगणाऱ्यांनाही माहीत आहे, की हे कारण खोटे आहे. आणि हे खरे आहे असा जनतेत विश्वास निर्माण करण्याची; धर्म टिकावा, राष्ट्राचे स्वातंत्र्य अबाधित राहावे आणि न्यायाची प्रतिष्ठा वाढावी यासाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने घालणे अपरिहार्यच आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी ते पदरी बाळगलेल्या विचारयंत्रांवर टाकतात. ज्यासाठी जगावेसे वाटते अशा अनेक गोष्टी असतात. एक स्वातंत्र्य तेवढे नसले तरी इतर गोष्टी उरतातच, हे ठसविण्याचा प्रयत्न होतो. परंतु हे खरे नव्हे. स्वातंत्र्य असे एकटे नष्ट होत नाही, त्याबरोबर निरपराधित्व दररोज सुळी दिले जाते आणि न्याय कायमचा हद्दपार केला जातो.

स्वातंत्र्य हे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नव्हे, त्याच्याही मर्यादा असतात, हे खरेच अमर्याद स्वातंत्र्य हा कोणाचाच अधिकार नव्हे. प्रत्येकाच्या स्वातंत्र्याला दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा असतात. स्वातंत्र्याच्या या सीमारेषा, हक्क व कर्तव्ये यांचा परस्परसंबंध कायदा ठरवतो, आणि शासनालाही कायदयाचे बंधन पाळावे लागते. शासनच जेव्हा कायद्याचे सार्वभौमत्व झुगारून देते, नागरिकांना कायद्याच्या संरक्षणापासून वंचित करते, तेव्हा हा विश्वासघात असतो, फसवणूक असते. आणि या विश्वासघाताशी तडजोड शक्य नसते. प्रत्येकाला त्याचा धिक्कार करावा लागतो, त्याविरुद्ध झगडावे लागते.

स्वातंत्र्याच्या संकल्पनेच्या दिवसेंदिवस होत असलेल्या अवमूल्यनाची सर्वांत जास्त झळ जर कोणाला लागली असेल तर ती वृत्तपत्रस्वातंत्र्याला. वृत्तपत्रव्यवसायात जसे दलाल आहेत तसे आगंतुक रक्षणकर्तेही. दलाल तिची प्रतिष्ठा नष्ट करतात तर रक्षणकर्ते तिला आपली गुलाम बनविण्याचा प्रयत्न करतात आणि हे करतांना प्रत्येकजण दुसऱ्याचा आपल्या गैरकृत्यांचे समर्थन करण्यासाठी वापर करतो. एकूण हा प्रकार असा असतो–निराधार अर्भक आणि त्याला आश्रय देण्यासाठी आपसात झगडणारे हे सद्‌गृहस्थ. एकाचे आश्रयस्थान म्हणजे तुरुंग तर दुसऱ्याचे कुंटणखाना. अशा वेळी ही अनाहूत मदत धुडकावून लावण्याचा आणि एकट्याने लढत, झगडत आपले भवितव्य घडविण्याचा या बालिकेचा हक्कच आहे !

वृत्तपत्रव्यवसाय अतिपवित्र आहे असे नाही. पत्रकारिता म्हणजे बुद्धिमत्ता, प्रगती इ. इ. असे व्हिक्टर ह्यूगो यांनी एका भाषणात म्हटले आहे. एक अनुभवी पत्रकार या नात्याने मी सांगतो की, वस्तुस्थिती इतकी समाधानकारक, उत्साहजनक नाही. मुक्त वृत्तपत्रे

ही जितकी चांगली तितकीच वाईटही असू शकतात, हे खरे; पण स्वातंत्र्य नसेल तर मात्र ती फक्त वाईटच असू शकतात! माणूस काय करू शकतो याची आपल्याला कल्पना आहे. माणसाची ही चांगले किंवा वाईट करण्याची कुवत, जतन करण्याची गरज असते. म्हणूनच व्यक्तीचे नव्हे, तर काहीतरी भव्य करण्याच्या शक्यतेचे, पर्यायाने तशी संधी देणाऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण अधिक आवश्यक असते. स्वातंत्र्य ही निदान सुधारण्याची संधी असते पण गुलामगिरी ही विनाशाची खात्री असते! वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे म्हणून राष्ट्र हे प्रगतीच्या, न्यायाच्या मार्गाने जाईलच असे जरी नसले तरी वृत्तपत्रस्वातंत्र्य नसेल तर मात्र ते न्यायाच्या दिशेने जाऊच शकत नाही. कारण जेव्हा लोकांचे हक्क मान्य केले जातात तेव्हाच त्यांना न्याय मिळण्याची शक्यता असते आणि अभिव्यक्ति-स्वातंत्र्याशिवाय हक्कांच्या अस्तित्वाला अर्थ नसतो. म्हणूनच स्वातंत्र्याच्या संकल्पनेविषयी आपण अधिक जागरूक असले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे निव्वळ सांस्कृतिक अधिकारांचे अधिष्ठान नव्हे तर ते तितकेच कामगारांच्या, पददलितांच्या हक्कांचेही आहे. स्वतःच्या अत्याचारांवर पांघरूण घालण्यासाठी संस्कृती आणि समाजातील दुर्बल घटक असा संघर्ष उभा केला जातो. त्याच्या प्रभावाखाली आपण हे विसरता कामा नये की, ज्याप्रमाणे कामगारांना गुलाम केले की, बुद्धिवाद्यांचा आवाज बंद करायला वेळ लागत नाही त्याचप्रमाणे जेव्हा बुद्धिवाद्यांची मुस्कटदाबी केली जाते तेव्हा कामगारांना पराभूत करायलाही वेळ लागत नाही. जेव्हा सत्याशी किंवा त्याच्या प्रामाणिक आविष्काराशी प्रतारणा केली जाते, तेव्हा हे सारे आपण न्यायाच्या स्थापनेसाठीच करतो, हा विश्वासही न्यायाची विटंबना थांबविण्यास पुरेसा नसतो. म्हणूनच स्वतःला क्रांतिकारी म्हणवून घेणारे वृत्तपत्र, जे सांगते ते सारे सत्यच असते हे मान्य करण्यास आपण नकार दिला पाहिजे आणि आग्रहाने सांगितले पाहिजे की, सत्याचा पाठपुरावा करणारे वृत्तपत्रच फक्त क्रांतिकारी असू शकते.

सेन्सॉरशिप, लिहिण्याबोलण्यावरील शासकीय निर्बंध, शब्दाची ताकदच सिद्ध करतात. परंतु प्रबळ हुकूमशाहीलाही भयभीत करणारी ही शब्दशक्ती, त्यामागील त्यागातून येते. हृदय ओतून, प्रसंगी रक्त सांडून जगविलेल्या शब्दांतच माणसांना एकत्र आणण्याची ताकद असते. हुकूमशहांची अनिर्बंध सत्ता ही लक्षावधींच्या मूक एकलेपणावर पोसली जाते. अशा लक्ष लोकांपैकी एक जेव्हा या दडपशाहीविरुद्ध बंड करतो तेव्हा तो या एकलेपणाचा निषेध करतो आणि सर्व मानवजातीच्या एकजुटीची साद देतो.

जबाबदारीची जाणीव दिवसेंदिवस कमी होत चालली आहे ही आजची सार्वत्रिक तक्रार! परंतु यात आश्चर्यकारक काही आहे असे मला वाटत नाही. कारण आपल्या हक्कांविषयी थोडीही तडजोड करण्यास नकार देणारेच आपल्या जबाबदाऱ्यांविषयी जागरूक असू शकतात आणि हक्कांचा हा आग्रहच मुळी कमी होत चालला आहे.

अधिकारपदस्थांपुढे सदैव गुढगे टेकवणारे कधीच राष्ट्राचे महान नागरीक नसतात. उलट राष्ट्राच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेसाठी प्रसंगी शासनकर्त्यांची भीडमुर्वत न ठेवणारे, संधिसाधू राजकारणाकडे पाठ फिरवून अन्यायाचा प्रतिकार करणारेच या सन्मानावर अधिकार सांगू शकतात.

एकीकडे सत्तालालसेचा भ्रष्ट आविष्कार, दुसऱ्याच्या अप्रतिष्ठेची आसुरी ओढ आणि निस्त्राण करणारे भय जगाचा चेहरामोहराच पार पालटून टाकणार की काय असे वाटू लागते. आपण साफ हतबल आहोत, जगण्यासारखे काही उरलेच नाही असे विचार येऊ लागतात, त्याचवेळी दुसरीकडे मानवी स्वातंत्र्यावरील अव्यभिचारी निष्ठेपोटी तिच्या संरक्षणासाठी सर्वस्व वाहून घेतलेल्या व्यक्ती दिसू लागतात. या व्यक्ती दुर्दम्य असतात, पाशवी शक्तीलाही अजिंक्य असतात. कारण गमावण्यासारखे त्यांच्याकडे काही उरलेलेच नसते! या व्यक्ती माझ्यासारख्या अनेकांना आधार तर देतातच पण स्वातंत्र्याच्या आग्रहावर ठाम राहण्यास प्रेरक ठरतात.

या लढ्यात एक वेळ अशीही येते की जेव्हा दडपशाहीचा विजय होतो. अशावेळी आपली बाजू न्यायाची आहे अशी ज्यांची श्रद्धा असते त्यांना न्यायाच्या वांझपणाचे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. यानंतर सुरू होतो प्रदीर्घ वनवास. सगळीकडून होणारा विरोध, असह्य हालअपेष्टा आणि एकटेपणाची वाढती जाणीव यांच्या दडपणाखाली इतक्या धीराचा पुरुषही फुटतो, खचून गेल्यासारखा होतो. कधी नव्हे तो त्याचा स्वतःवरील विश्वास डळमळीत होतो. आपण ज्यासाठी झगडतो आहोत, ज्याचा पुरस्कार करतो आहोत ते चुकीचे तर नाही असा त्याला संभ्रम पडतो. मला वाटते या क्षणी आपल्यासारख्या समविचारांच्या व्यक्तींनी पुढे आले पाहिजे आणि सांगितले पाहिजे की तू एकटा नाहीस; तुझा प्रतिकार व्यर्थ नाही. आज ना उद्या ही जुलमी साम्राज्ये धुळीला मिळतील, तुझा वनवास संपेल आणि स्वातंत्र्याला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त होईल...

इतिहासाला अर्थ प्राप्त करून देणे हे नेहमीच माणसाला शक्य नसते. निदान स्वतःच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणे हे तर त्याच्या हातात असते.

'Homage to an Exile'
Albert Camus
अनुवाद : सतीश कामत

# झोपडपट्ट्यांचा प्रश्न हा मूलतः रोजगारीचा प्रश्न आहे

प्रा. आशिश बोस । इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ, दिल्ली विद्यापीठ

भारतात ३,००० लहान मोठी शहरे आहेत व त्यात राहणाऱ्या लोकांची संख्या १२ कोटी आहे. ही शहरे किंवा त्यांतील लोक यांच्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा नव्या शहरांची सुरुवात करता येणार नाही. नवीन शहरे वा नवी विकास केंद्रे स्थापन करण्याची सूचना सैद्धान्तिकदृष्ट्या चांगली असली तरी सध्याच्या राष्ट्रीय संदर्भात तिला मर्यादितच महत्त्व आहे.

जितके शहर मोठे, तितके अधिक त्याचे आकर्षण. अशा शहराकडे लोकांची धाव वाढली की तेथील परिस्थिती चिघळते.मग शहराचा योग्य आकार कोणता मानावा ? या प्रश्नावर सैद्धान्तिकदृष्टचा व अनुभवजन्य ज्ञानावर आधारीत विश्लेषणाच्या आधारे जगात सर्वत्र चर्चा झालेली आहे. या चर्चेची निष्पत्ती एवढीच की शहराच्या आकाराची कल्पना, नगरविषयक धोरणासाठी मार्गदर्शक तत्त्व म्हणून फारसी महत्त्वाची नाही.

शहराचा योग्य आकार कोणत्या दृष्टिकोणातून ठरवाल ? घरबांधणी, पाणीपुरवठा, वीज, शाळा, इस्पितळे, वाहतूक नियंत्रण, हवेचे प्रदूषण, मानसिक दुखणी किंवा रोजगारविषयक, आर्थिक व सामाजिक ध्येय, संपत्ती व उत्पन्न यांचे पुर्नवाटप, कल्याण कार्य या सर्वच बाबींचा या संदर्भात विचार करावा लागेल आणि या वेगवेगळ्या दृष्टिकोणातून शहराचा योग आकारही वेगवेगळा ठरेल. हा आकार ठरविण्यासाठी खर्च आणि लाभ यांचेही आकडेवारीचा डोंगर उपसावा लागेल. हॅरी रिचर्डसन यांनी संयुक्त राष्ट्र संघासाठी तयार केलेल्या प्रबंधांत म्हटल्याप्रमाणे लोकसंख्येचे जागेच्या रूपात वाटप ही कल्पना फसवी आहे. शहराचे पारंपारिक स्वरूप आणि बृहद्नगरे याचे कार्यक्षमता, कल्याणकार्य आणि प्रादेशिक व राष्ट्रीय उद्दिष्टे यांची पूर्ती, यादृष्टीने विशेष महत्त्व आहे.

## स्थलांतरावर नियंत्रण आवश्यक

भारतात स्थलांतर नियंत्रण धोरणाच्या यशस्वितेसाठी दोन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली म्हणजे लोकसंख्या वाढीवर प्रभावी नियंत्रण घातले गेले पाहिजे. किंवा जननप्रमाण, विशेषतः ग्रामीण भागातील जननप्रमाण झपाटयाने खाली आले पाहिजे. दुसरी म्हणजे ग्रामीण भागातील स्थितीत नाटयमय सुधारणा झाली पाहिजे. विशेषतः ग्रामीण भागातील रोजगाराच्या, संधीमध्ये वाढ झाली पाहिजे. याखेरीज ग्रामीण भागाची प्रतिमाहि उजळ झाली पाहिजे.

खेडे राहण्यायोग्य केल्याखेरीज राहण्यायोग्य शहराचे स्वप्न साकार होणार नाही. माझ्या कल्पनेतील अशा शहरात यापुढे झोपडपट्ट्या असणार नाहीत. सध्याच्या झोपडपट्टयांची किमान राहणीमानाचा विचार करून टप्प्याटप्प्यानें सुधारणा झाली पाहिजे. तेथे गगनचुंबी किंवा आलिशान इमारती वा कचेऱ्या नसाव्यात.

या शहरातील मजुरांना पूर्ण रोजगार मिळावा. नवीन पुनर्रचित रोजगार विनिमय केंद्राद्वारे संभाव्य स्थलांतर नियंत्रित केले जावे.

मनुष्यबळ नियोजनाची माझी ही कल्पना आहे, स्थानिक, विभागीय आणि राष्ट्रीय पातळीवर मानवी बळाचा प्रभावी वापर या कल्पनेत अभिप्रेत आहे. सुंदर शहर हे आर्थिकदृष्टया परिपूर्ण शहर असले पाहिजे.

सध्याच्या शहरांचा जमीन वापर पद्धतीच्या आधारावर पुर्नविकास केला पाहिजे. त्यात खेळाच्या मैदनाना सर्वत्र प्राधान्य देण्यात आले पाहिजे. आपल्या शहरातील मोठी लोकसंख्या युवकवर्गात मोडते. सुमारे ६० टक्के लोक २५ वर्षे वयाखालील आहेत. राहण्यायोग्य शहरात उद्याने, कारंजी असावीत. परंतु मैदानाना अधिक प्राधान्य मिळाले पाहिजे.

कमी खर्चातील घराबाबत आपण अनेक वर्षे बोलत आहोत, परंतु अल्पखर्ची मूलभूत जरूरीच्या बाबींवर आपण फारसे बोललो नाही. पिण्याचे शुद्ध पाणी, सांडपाणी वाहून नेण्याची कार्यक्षम व्यवस्था, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, वीजनिर्मिती, गटार व्यवस्था इत्यादीसाठी आपल्याला निश्चितपणे महागडया तंत्रशास्त्राचा आधार घ्यावा लागेल. परंतु केवळ तंत्रशास्त्र असून उपयोग नाही. सर्व शहरांतील स्थानिक साधन सामुग्री, स्थानिक मनुष्यबळ व गुणवत्ता यांचा पुरेपूर वापर आपण केला पाहिजे. काही शहरे अतिशय झपाटयाने वाढतात, परंतु हा प्रश्न शहरांच्या आकाराशी संबंधित नाही तर स्थलांतरितांना किती प्रमाणात सामावून घेतले जाते याच्याशी निगडीत आहे असे रिचर्डसन यांचे म्हणणे आहे. नागरीकरण थांबवणे हा त्यावर उपाय नाही, तर नागरीकरणाचे अनुषांगिक परिणाम टाळणे हाच त्यावर उपाय आहे.

हे अनुषंगिक परिणाम खरोखरच भयानक आहेत. म्हणूनच राहण्यायोग्य शहर कसे असावे याचा विचार करताना त्यात झोपडपट्टया नसणे हा विचार महत्त्वाचा आहे. सध्या शहरातून काही मूठभर लक्ष्मीपुत्र आलिशान बंगल्यातून सरंजामशाही थाटात राहतात. या उलट या शहरातून जास्तीत जास्त लोकांना काही किमान पातळीची दर्जेदार घरं असली पाहिजेत.

अर्थात हे म्हणणे सोपे आहे व कृती अवघड आहे. 'झोपडपट्टी नको' धोरणात (अ) सध्याच्या झोपडपट्टीचा प्रश्न हाताळणे व (ब) लोकसंख्या वाढ, वाढेत स्थलांतर व रोजगाराच्या संधी यामुळे झोपडपट्टयात होणारी संभाव्य वाढ टाळणे यांचा अंतर्भाव आवश्यक आहे.

झोपडपट्टीच्या प्रश्नाबाबत बोलावयाचे झाले तर काही मोजक्या यशकथा सोडल्या तर सध्याच्या झोपडपट्टयांचा प्रश्न प्रभावीरीत्या जगात कोठेच हाताळला गेलेला नाही. झोपडपट्टयांचा प्रश्न हा मूलतः घरांचा प्रश्न नाही तर रोजगार व उत्पन्न यापैकी एक आहे.

## रोजगार ही मुख्य गरज

कलकत्त्यातील फूटपाथ-निवाशांच्या अलीकडेच केलेल्या अशा सामाजिक-आर्थिक पाहणीत असे आढळून आले की, त्यांची पहिली गरज घर नाही तर रोजगार ही आहे. झोपडपट्टयांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जागेचा यथोचित वापर व घरबांधणी धोरण, त्याबरोबरच प्रभावी औद्योगिक व व्यापारी केंद्रांच्या विकासाचे धोरण यांची आवश्यकता आहे.

समाजवादी देश सोडले तर इतर देशांत शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यात फारसे यश आलेले नाही. समाजवादी देशात स्थलांतर मर्यादित ठेवण्यासाठी एक प्रकारची अंतर्गत परवाना पद्धती अंमलात आहे. लोकसंख्येत झपाटयाने होणारी वाढ आणि भूक्षेत्रांवरील जादा लोकसंख्येचा दबाव यामुळे भारतासारख्या देशातील स्थिती बिघडते.

आपल्या शहरातील युवकाचे कंटाळवाणे जिणे पाहिले म्हणजे खेद वाटतो. तेथील क्लब हे श्रीमंतासाठी असतात. मनोरंजनाचा एकमेव प्रकार म्हणजे सिनेमा. सिनेमा गृहातील खोटया वातावरणात काही ठराविक साचाचे चित्रपट पाहण्यात हा युवक वेळ घालवतो.

आपला सांस्कृतिक वारसा समृद्ध असला तरी शहरांतून कला, संगीत वा नाटके यासाठी पुरेशी थिएटरे नाहीत. राहण्यायोग्य शहरात या कंटाळवाणेपणाला फाटा देता आला पाहिजे.

अशा शहरात स्वच्छ, प्रामाणिक व कार्यक्षम नगर प्रशासनयंत्रणा असावी, तसेच स्थानिक वृत्तपत्रांनी शहर सुधारणेसाठी सतत लढाऊ भूमिका घ्यावयास हवी. या शहराचा कणनूकण नगरवासियांना प्रिय वाटला पाहिजे. तसे नसेल तर ते शहर राहण्यायोग्य ठरणार नाही.

श्रीमंत देशातील आलिशान शहरांइतकेच गरीब देशातील गरीब शहर प्रिय आणि राहण्यायोग्य असू शकते हे ध्यानात घेतले जावे. □

[ आकाशवाणी दिल्लीच्या सौजन्याने ]

'माझ्या कल्पनेतील राहण्यायोग्य शहर' या मूळ लेखावरून संक्षिप्त.

# सोलकढी

## □ कविता हे त्यांचे काळीज

मंगेश पाडगावकर हे मराठीतले एक अचाट-थोर कवी आहेत. हे सगळ्यांना ठाऊक आहे. महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातून मंगेश पाडगावकरांची कविता जशी पोचली आहे तशी कुटुंबनियोजनाची जाहिरातसुद्धा पोचली नसेल. (म्हणूनच आता महाराष्ट्र-सरकारने कुटुंबनियोजनाच्या प्रचारमोहिमेत पाडगावकरांना सामील करून घेतले आहे.) मंगेश पाडगावकर गेली पस्तीस वर्षे कविता लिहून राहिले आहेत. त्यात पुन्हा पाडगावकर वाट्टेल त्या प्रकाराची कविता टिच्चून लिहू शकतात. त्यांनी जुन्या कविता लिहिल्या. नव्या लिहिल्या. शुद्ध कविता लिहिल्या. शुद्ध गाणी लिहिली. सामाजिक जाणीव सोडली नाही. बालकवितेचा खुळखुळा वाजत ठेवला. हव्या तेव्हा संगीतिका रचल्या. जरूरीपुरत्या वात्रटीका केल्या. थोडा 'उदासबोध' ऐकवला. मीरेची पदे भाषांतरली. सध्या हातात घेतलेले 'विदा-वसंत' हे खंडकाव्य पुरे झाले की ते तडक 'मंगेशायन' या महाकाव्याकडे वळणार आहेत, असे ऐकतो.

कविता हे पाडगावकरांचे काळीज आहे, असे मराठीतले लिटन स्ट्रॅचीच अशा रविंद्र पिंग्यांनी म्हणून ठेवले आहे. त्यांनी तर पाडगावकरांना महंत मानले आहे. आपल्या कविताकाळजासाठी या महंत मंगेशाने पुष्कळ काही सोसले आहे: कवितेचा शोध घेत त्यांनी आसेतुहिमाचल पायपीट केली. पुढे संसार थाटला, तो सांभाळला. कवितेसाठी महाविद्यालयीन शिक्षण पार पाडले. कवितेसाठी एकेक नोकरी सोडत, दुसरी धरत, आज ते 'युसिस'मध्ये हालअपेष्टा सोशीत कवितेची निगरानी करत आहेत. कवितेसाठी त्यांनी बृहन्महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. हे सगळे सोडा; कवितेसाठी या सारस्वताने लोकप्रियतासुद्धा सोसली.

अशा या कलंदर कवीच्या संबंधीचे एक नाखुषीपत्र 'महाराष्ट्र टाईम्स'च्या ४ जानेवारी १९७६ च्या अंकात प्रसिद्ध झाले. जबलपूरच्या रा. रा. राजन रानडे यांनी या पत्रात अशी तक्रार केली होती की पाचसहा वर्षांपूर्वीच लिहिलेली आणि प्रसिद्धलेली 'मुजोर वारा' ही कविता पाडगावकरांनी यंदाच्या 'सुगंध'च्या दिवाळी अंकात पुन्हा प्रसिद्धिली आहे; आणि तीच कविता पुन्हा नव्या नवलाईने मिरवताना पाहून रा. रा. राजन रानडे यांना काहीसे आश्चर्य, बरीच गंमत आणि थोडासा खेद वाटला आहे.

हे पत्र वाचल्यावर अनंतरावांना महंमंगेश पाडगावकरांबद्दल नाही, तर या रा. रा. रा. रां. बद्दलच गंमतशीर, सखेदाश्चर्य वाटले. मराठी साहित्यिकांनी चार मराठी चितूमंतूसारखे वागावे, अशी या रानड्याची अपेक्षा दिसते. (हाय हाय. हरेरे हरेरे) मराठी साहित्यिक वेगळे आणि सामान्य माणसे वेगळी, एवढी साधी गोष्टसुद्धा नर्मदातीरीच्या या राजनला ठाऊक दिसत नाही. मला ती ठाऊक आहे. म्हणून गेली काही वर्षे पाडगावकरांच्या कविता पुन्हा पुन्हा नव्या नवलाईने प्रसिद्ध होत राहिल्या तेव्हा मी त्या पुन्हा पुन्हा वाचल्या. नंतर नंतर तर मीच त्यांना कुठल्या कविता पुन्हा प्रसिद्ध कराव्या याची फर्माईश करू लागलो 'मुजोर वारा' ही अशीच फर्माइशिष्ट कविता आहे. पाडगावकर त्याच कविता पुन्हा प्रसिद्धीला देतात याचे कारण ते प्रामाणिक आहेत; कविता हे त्यांचे काळीज आहे; मागणी आली म्हणून खोटचा, बेगडी, कमअस्सल कविता नव्याने लिहिण्यापेक्षा जुन्याच नव्याने प्रसिद्धीला देणे चांगले, असा विचार त्यांनी केला असणार, हे मी बरे समजून होतो. त्यामुळे मित्रमंडळीत मी या गोष्टीचे तोंड भरून समर्थन करत होतो.

पण राजन रानड्यांना ते कळणे शक्य नव्हते. म्हणून हे नाखुषीपत्र त्यांनी लिहिले. हे पत्र आल्याबरोबर, आता काय होईल, याविषयी आमच्या मित्रमंडळीत अंदाज वर्तवण्यात येऊ लागले. बहुतेकांचे मत होते, पाडगावकर धूर्तपणे गप्प बसतील; करायचे ते करत राहतील. आमच्या मित्रमंडळीला गोळाबेरीज साहित्यिकसमाज ठाऊक असला तरी त्यांच्यातले वर्ण, जाती, पोटभेद ठाऊक नाहीत. मला मात्र ते ठाऊक असायला लागतात. म्हणूनच, या पत्रानंतर पाडगावकर गप्प बसणार नाहीत; खुलासा करतील, आणि आपली चूक कबूल करून जाहीर क्षमा मागतील, अशी अटकळ मी बांधली. माझे मित्र हसले. माझ्या अटकळीबद्दल मला इतका विश्वास होता की पाडगावकरांचे हे खुलासापत्र कसे असेल तेही मी त्यांना लिहून दाखवले.

आणि ८ जानेवारीच्या 'महाराष्ट्र टाईम्स'च्या अंकात जेव्हा मंगेश पाडगावकरांचा खुलासा खरोखरीच आला, तेव्हा आमची मित्रमंडळी चकितचकित होऊन गेली. कारण मी येणाऱ्या पत्राचा म्हणून लिहिलेला मजकूर हा पाडगावकरांच्या खुलाशाचा अक्षरोअक्षर तर्जुमा ठरला होता. मंगेश पाडगावकर लिहितात : मागणी आहे म्हणून कविता सुचलेली नसतानाही काहीतरी खरडून देणे मी कधीच करत नाही. अशा वेळी भीड पडून, आपली मागणी असलेली 'इमेज' टिकवण्याच्या मोहाने काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या कविता मी पुन्हा प्रसिद्ध केल्या... माझ्या सर्व वाचकांना मी असे आश्वासन देतो की मी पुन्हा असे करणार नाही... सार्वजनिक जीवनात मला जी मान्यता आहे ती श्री. रानडे यांच्यासारखे वाचक माझ्या कवितेवर प्रेम करतात म्हणूनच.

मंगेश पाडगावकरांचे वाचक त्यांच्या कवितेवर कित्तीकित्ती प्रेम करतात, हे अवघा बृहन्महाराष्ट्र जाणतो. या तिळगुळी पत्रामुळे सारे वाचक, आता माझ्याप्रमाणे कवितेइतकेच खुद्द पाडगावकरांवरही प्रेम करू लागतील.

हे स्फुट संपवण्यापूर्वी तळटीपेसारखे काही तरी द्यावे म्हणतो : उपरोल्लेखित राजन रानड्यांचे पत्र ज्या अंकात आले होते त्याच अंकात अंजली सामंत आणि वीणा सामंत या मुलींचे 'महाराष्ट्राच्या कृष्णेकाठी' या पी. सावळारामांच्या कवितेबाबत तक्रार करणारे पत्र आहे. तक्रार तीच. आधी एकदा प्रसिद्ध झालेली सदर कविता यंदाच्या 'पुढारी'च्या दिवाळी अंकात नव्या नवलाईने पुन्हा झळकली आहे... या तक्रारीला १३ जानेवारीच्या 'महाराष्ट्र टाईम्स'च्या अंकात उत्तर देताना, ही कविता अनेकजणांना

आवडली म्हणून पुनर्मुद्रीत केली आणि त्यात काही गैर नाही, असा खुलासा पी. सावळाराम यांनी केला आहे.

तात्पर्य असे की एकाच प्रकारच्या तक्रारीचे दोन प्रकारचे खुलासे असू शकतात.

आणखी असे की कविताच लिहिल्या तरी दोन कवी सारखे नसतात: (पी. सावळाराम वेगळे आणि पी. मंगेश वेगळे!)

¤

## □ मा. भगवानला शरण

हिंदी चित्रपट पाहणे हे जबाबदार भारतीय नागरिकाच्या प्रमुख कर्तव्यांपैकी एक होय. ज्या गोष्टींमुळे भारतीयाला त्याचे ते खासे भारतीयत्व येते त्यात हिंदी चित्रपटांना मोठे स्थान आहे. हिंदी चित्रपटांबद्दल मी पुष्कळकाही अगत्याने वाचत असलो, आणि वाचतावाचता प्रसंगी माझी लाळ गळत असली, तरी हिंदी चित्रपट भसाभसा पाहणे, काही मला जमत नाही. त्यामुळे माझ्या वावळटपणाला एका बद्दूपणाचीही जोड मिळाली आहे.

माझ्या अवतीभोवतीच्या माणसांना ते बरे वाटत नाही. मग पुष्कळ धुमडघुमड करून ते मधूनमधून मला हिंदी चित्रपट पाहायला लावतात. रम्य वाटते. परवा त्यांच्या उल्हासामुळे 'अलबेला' नावाचा अफलातून चित्रपट पाहायचा योग आला. तेव्हापासून मी मा. भगवानसारखा नाचून राह्यलोय; अर्थात मनातल्या मनात, हे अनंतरावांना ओळखणाऱ्या 'सोलकढी'च्या प्रिय वाचकांना सांगायलाच नको. परंतु 'सत्यकथा' वर्गणीदारीने नियमित वाचणारे माझ्या माहितीचे काही वाचक 'अलबेला' पाहून मनातल्या मनातून बाहेर येऊन खरोखरीचे नाचू लागल्याचे समजल्यावर मी मा. भगवानला शरण गेलो.

'अलबेला' ही तशी प्रातिनिधिक परीकथा आहे. कलावंत होण्यासाठी घरदार सोडून निघालेला एक गुणी, भाबडा माणूस, एका देखण्या आणि दिलवाल्या नर्तकीच्या सहकार्याने खरोखरच बडा कलावंत कसा होतो, याची साधीसीधी कहाणी चित्रपटात सांगितली आहे. या कहाणीला ढकमकती गाणी आणि लवथवती नृत्ये यांची जोड मिळाली आहे. गाणी साधी आहेत; नृत्ये साधी आहेत; पण दोन्हींचा एकत्रित परिणाम एकूण उत्तेजक आहे.

'अलबेला' हा पंचवीस वर्षांपूर्वीचा चित्रपट, त्यानंतर चारपाच वर्षांनी अनंतराव चित्रपट पाहायला लागले: तरी 'अलबेला'-तली काही गाणी कानात होती. ती 'अलबेला'तली आहेत, हे माहीत नव्हते. सी. रामचंद्रांच्या नंतरच्या कर्तृत्वाचा थोडा परिचय झाला होता. मा. भगवान नावाचा एक महाराष्ट्रीय नट आहे, तो नाचतो, मारामाऱ्या करतो, आणि एकेकाळी गड्याने हिंदी चित्रपटक्षेत्र गाजवून सोडले आहे, असे ऐकले होते. 'गीताबालीच्या गोडव्याच्या ठकणत्या आठवणी काढणारे काही रसिक सहवासात होते. पुनर्वितरणानंतर गेल्या दीड वर्षात 'अलबेला'ने प्रेक्षकांना कसे आणि किती पागल केले याच्या आख्यायिका ऐकून होतो.

हे सगळे (आणि दूरदृष्टीने आगाऊच राखून ठेवलेले तिकीट) घेऊन 'अलबेला' पाहायला गेलो, आणि चित्रपटगृहात गुडुप-अंधार असणे एकंदरीने सोयिस्कर असते, असे म्हणत राहिलो.

—अनंतराव

# निवडणुका

## निर्भय मतदान हवे

वा. दा. रानडे

पंतप्रधानांनी लोकसभेचे विसर्जन करून नव्या निवडणुकांची घोषणा केली. आणीबाणी उठविण्यात आलेली नाही पण निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत, स्थानबद्धांची मुक्तता होत आहे. वृत्तपत्रांवरील सेन्सॉर-निर्बंध निवडणुकीपुरते उठविण्यात आले आहेत. येते दोन महिने आता देशातील वातावरण निवडणूकमय होऊन जाईल.

आपल्या महत्त्वाच्या निर्णयांचा थांग जवळच्या सहकाऱ्यांनासुद्धा शेवटपर्यंत लागू द्यावयाचा नाही, हे पंतप्रधानांचे तंत्र आहे. श्रीमती गांधींनी निवडणुकांची घोषणा केली त्याच्या पंधरा दिवस आधी केंद्रीय राज्यमंत्री ओमप्रकाश मेहता यांनी निवडणुका होणार असल्याच्या बातम्या निराधार असल्याचे सांगितले होते. निवडणुका घेण्यासारखी परिस्थिती अजून निर्माण झालेली नाही, विरोधी पक्षांच्या धोरणात बदल झालेला नाही, आपल्या चुका त्यांनी कबूल केलेल्या नाहीत अशी भाषा काँग्रेसचे मंत्री व नेते सर्वत्र बोलत होते. मग पंधरा दिवसांतच परिस्थितीत असा काय बदल झाला?

काँग्रेसला जास्तीत जास्त सोयीची वेळ निवडणुकांसाठी निवडणे हे पंतप्रधानांचे प्रथमपासूनचे धोरण आहे. त्यांनी १९७१ मध्ये लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेतल्या. अशाच मुदतपूर्व निवडणुका मार्च १९७५ मध्ये घेण्याचा त्यांचा विचार असावा पण काँग्रेसच्या दृष्टीने परिस्थिती अनुकूल नव्हती. विद्यार्थी आंदोलनामुळे गुजरातेत विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपतींची राजवट आणावी लागली होती. आणि बिहारमध्ये जयप्रकाशांच्या आंदोलनाचा जोर वाढत होता. अशा वेळी निवडणुका घेतल्यास १९७१ सारखे यश आपण मिळवू अशी खात्री पंतप्रधानांना वाटत नव्हती. म्हणून त्यावेळी निवडणुकांचा विचार त्यांनी पुढे ढकलला.

यानंतर १२ जून १९७५ ला पंतप्रधानांना हादरा देणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. गुजरात विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला. जनता आघाडीला

निर्विवाद बहुमत मिळाले नाही तरी किमलोपच्या पाठिंब्याने आघाडीचे सरकार अधिकारावर आले. दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे पंतप्रधानांची निवडणूक अलाहाबाद हायकोर्टाने रद्द ठरविली. पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केली व त्यासाठी शांततापूर्ण लढा सुरू करण्याची घोषणा जयप्रकाशांनी २५ जूनला दिल्लीच्या सभेत करताच दुसऱ्याच दिवशी अंतर्गत सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याचे कारण दाखवून देशात आणीबाणी पुकारण्यात आली. जनतेचे मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले. पंतप्रधानांनी वीस कलमी आर्थिक कार्यक्रम व संजय गांधींनी पाच कलमी कार्यक्रम जाहीर केला. आणीबाणीने मिळालेल्या अमर्याद अधिकारांचा उपयोग करून या कार्यक्रमाची विशेषत: त्यातील दलित, आदिवासी, वेठबिगार यासंबंधीच्या भागाची अंमलबजावणी करण्यासाठी परिणामकारक उपाययोजनेत सहा महिन्यात या कार्याने आपली व आपल्या पक्षाची प्रतिमा उजळून मार्च १९७६ मध्ये निवडणुका घ्याव्यात असा आणीबाणी जाहीर करताना पंतप्रधानांचा आडाखा असावा. त्या दृष्टीने शासकीय पावलांबरोबरच पक्षसंघटनेच्या दृष्टीनेही काही पावले त्यांनी टाकली. आणीबाणी संजय गांधींच्या सल्ल्याने पुकारण्यात आली असे त्यावेळी काही पाश्चात्य वृत्तपत्रांतील बातम्यांत म्हटले होते. आपल्याकडे वृत्तपत्रांवरील निर्बंधांमुळे सरकारी एकतर्फी अधिकृत निवेदनांशिवाय दुसरी काहीच बातमी कळू शकत नव्हती. पण हरियानाचे मुख्यमंत्री बन्सीलाल यांना केंद्रीय मंत्रिमंडळात घेण्यात आले यामागे संजयचाच प्रभाव असला पाहिजे असे वाटते. (आता तर त्यांना केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डावर घेतले आहे) याचवेळी उत्तर प्रदेशात बहुगुणाचे जागी नवा मुख्यमंत्री निवडण्यात आला. काही महिन्यांनी मध्यप्रदेशातही प्रकाशचंद्र सेठींचे जागी श्यामाचरण शुक्ल मुख्यमंत्री झाले. निवडणुकांपूर्वी काही राज्याचे मुख्यमंत्री बदलून तेथील कारभाराची प्रतिमा सुधारावयाची हे तंत्र इंदिरा गांधींनी पूर्वी अवलंबले होते. तेव्हा मार्च १९७६ मध्ये निवडणुका घेण्याच्या उद्देशाने ही पावले टाकली असणे शक्य होते. पण पक्षांतर्गत काही प्रश्न अजून सुटले नसल्याने निवडणुकांना अजून अनुकूल वेळ आलेली नाही असे पंतप्रधानांनी ठरविले आणि निवडणुका एक वर्ष पुढे ढकलल्या.

पक्षाची घडी नीट बसविणे आणि गुजरात, तामिळनाडू व गोवा येथील विरोधी पक्षांची सरकारे निवडणुकीपूर्वी सत्तेवरून दूर करणे या दृष्टीने इंदिरा गांधींच्या हालचाली चालू होत्या. गुजरातेत कॉंग्रेसच्या फोडाफोडीच्या डावास यश येऊन जनता आघाडीचे सरकार गडगडले. तामिळनाडूमध्ये पक्षासाठी सत्तेचा वापर व गैरकारभाराचे आरोप ठेवून तेथे राष्ट्रपतींची राजवट जारी केली. आरोपांच्या चौकशीसाठी कमिशन नेमणे व त्यांनी मंत्रिमंडळाला दोषी ठरविल्यानंतर मंत्रिमंडळ अधिकारावरून दूर करणे हा योग्य मार्ग झाला असता. आधी चौकशी मग शिक्षा हा योग्य क्रम अवलंबण्याऐवजी आधी शिक्षा मग चौकशी हा उलटा क्रम तेथे अवलंबण्यात आला व राष्ट्रपतींची राजवट सुरू झाल्यानंतर सरकारीया कमिशन नेमण्यात आले. विधानसभेची मुदत संपत आली असताना निवडणुका घेऊन मतदारांवरच निर्णय सोपविणे हाही योग्य मार्ग झाला असता. पण निवडणुका जिंकण्याएवढे कॉंग्रेसपक्षाचे बळ तामिळनाडूमध्ये नसल्याने तो मार्ग कॉंग्रेस श्रेष्ठींना नको होता. द्र. मु. क. पक्षात फाटाफूट घडवून कॉंग्रेसचे बळ वाढल्यावर निवडणुका घ्यावयाच्या असे त्यांचे धोरण होते. गुजरातेत जनता आघाडीचे मंत्रिमंडळ गेले पण कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ लौकर अधिकारावर येऊ शकले नाही. कारण मुख्यमंत्री कोणी व्हावयाचे यावर वाद होता. अखेर हितेंद्र देसाईंना केंद्रीय मंत्रिमंडळात घेऊन आणि माधवसिंह सोळंकींना मुख्यमंत्रिपद देऊन हा प्रश्न सोडविण्यात आला. गोव्यात मात्र यु. गो. पक्षास कॉंग्रेसमध्ये सामील करूनही यु. गो. पक्षाचे मंत्रिमंडळ खाली आणण्यात कॉंग्रेसला यश आले नाही.

ओरिसा, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रातल्या कॉंग्रेसमधील गटबाजी व अंतर्गत संघर्ष निवडणुकीपूर्वी मिटविणे आवश्यक होते. युवक कॉंग्रेसच्या म्हणजेच संजय गांधींच्या प्रभावाने ओरिसात नंदिनी सत्पथींचे मुख्यमंत्रीपद गेले. कम्युनिस्टांविरुद्ध जोरदार प्रचार मोहिम यावेळेपासूनच सुरू झाली आणि स्वत: पंतप्रधानांनीही एक जोरदार भाषण केले. पश्चिम बंगालमध्ये रे यांनी मुख्यमंत्रिपद टिकविले पण त्यांचे अधिकार बरेच कमी झाले आहेत. कम्युनिस्ट व त्यांच्या सहप्रवाशांविरुद्ध मोहिमेचाच एक परिणाम म्हणजे रजनी पटेलांना मुंबई प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपद सोडावे लागले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसमध्ये दोन चव्हाणांचे दोन गट आहेत. त्यांचा संघर्ष मिटविता येईना तेव्हा अस्थायी समिती नेमून तिच्याकडे निवडणुकीची सूत्रे सोपविण्याचा निर्णय कॉंग्रेसश्रेष्ठींनी घेतला. पक्षांतर्गत हे सारे संघर्ष मिटवून मार्च १९७७ मध्ये निवडणुका घेणे कितपत शक्य होईल याची पंतप्रधानांना शंका होती म्हणून लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढविण्याचे बिल त्यांनी पास करून घेतले होते, पण निवडणूक तयारीच्या त्यांच्या हालचाली चालूच होत्या. पक्षाची घडी आता चांगली बसली आहे असे वाटल्यावर त्यांनी निवडणुका जाहीर केल्या. देशात यंदा पीकपाणी चांगले असल्याने त्यादृष्टीनेही वेळ अनुकूल आहे.

विरोधी पक्षांना मात्र तयारीसाठी फार थोडा वेळ मिळाला आहे. तरीही चार पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष स्थापला आहे. मुख्य प्रश्न जनतेने मोठ्या प्रमाणावर आणि निर्भयपणे मतदान करण्याचा आहे. दीर्घकाळ पिंजऱ्यात असलेल्या पक्षाची स्वतंत्रपणे उडण्याची सवयच नाहीशी होते. आणीबाणीच्या निर्बंधांमुळे काहीशी तशीच मनोवृत्ती जनतेची झाली आहे. आणीबाणीचे निर्बंध सैल झाले तरी भीती गेलेली नाही. सरकारविरुद्ध मत देऊन रोष कशाला ओढवून घ्या ही भावना आहे. आणीबाणीत काही गोष्टी चांगल्या झाल्या असल्या तरी त्या घडवून आणण्यासाठी आणीबाणीआदी जारी करून लोकशाहीचा संकोच करण्याची जरूरी नव्हती. सरकारच्या लोकशाहीविरोधी अन्याय्य धोरणांना आपला विरोध स्पष्टपणे नोंदविण्याचे मतपेटी हे एक प्रभावी साधन आहे. याबाबतीत जनमत संघटित करण्यात आणि जनतेला निर्भय बनविण्यात विरोधी पक्षांना कितपत यश येते यावर निवडणुकीतील त्यांचे यश अवलंबून आहे. ☐



# अशी चौकशी, अशी फाशी !

लेखांक अकरा । र. धों. घाणेकर

## पापाला वाचा फुटली

९ डिसेंबर १९७१ ला वॉशिंग्टन न्यूज ह्या वर्तमानपत्रात सुप्रसिद्ध स्तंभलेखक जॅक अॅन्डरसन ह्याने एक सनसनाटी माहिती दिली, त्याचा थोडक्यात आशय असा होता.

'अमेरिकेतील इंटरनॅशनल टेलिफोन अँड टेलिग्राफ्स कॉर्पोरेशनने हार्टफोर्ड फायर इन्शुअरन्स कंपनी आपल्यात सामील करून घेण्याचे ठरविल्यावर, तसे करणे हे कायद्याविरुद्ध आहे. तेव्हा ते करू नये. अशा संबंधीचा खटला कनेक्टिकट् येथील Securities & Exchange Commissioner विल्यम कॉटर ह्याच्या पुढे चालला होता. पहिल्या प्रथम कमिशनर साहेबांनी असे एकत्रीकरण कायद्याविरुद्ध असल्याचे मत प्रदर्शित केले; परंतु अखेरी निर्णय देताना मात्र तसे करावयास हरकत नसल्याचे आपल्या निकालपत्रात नमूद केले. मिचेलच्या न्यायखात्याने देखील आपले विलिनीकरण्याच्या विरुद्ध असलेले मत बाजूला टाकून एकत्रीकरणाला मान्यता देऊन टाकली.'

अमेरिकेमध्ये दरवर्षी सरकारी अहवाल बाहेर पडतो की ज्यात कोट्यावधी डॉलर्स गुंतविलेल्या कंपन्याचे, त्यांच्या कारभारानुसार क्रमांक लावले जातात. १९५८ मध्ये आय. टी. टी. कार्पोरेशनचा जो ५१ वा क्रमांक होता तो १९७० सालात आठवा झाला. भांडवलाची वाढ इतक्या थोड्या अवधीत इतक्या मोठ्या प्रमाणावर कशी होऊ शकली याविषयी जनतेत कुतुहल निर्माण झालेले होते. ह्या १२ वर्षांच्या अवधीत हॅरोल्ड जेनीन हा आय. टी. टी. चा हुकूमशहा होता. त्याला पगार होता वार्षिक ८ लाख डालर्स. ह्याच्यावर आणखी निरनिराळे भत्ते इतका लठ्ठ पगार खाजगी व्यापारी कंपन्यातून त्यावेळी तरी कोणासच नव्हता. ह्या जेनीनने अमेरिकेत व बाहेरच्या देशांतून १२ वर्षांत सुव्यवस्थितपणे चालत असलेल्या ११० कंपन्या आय. टी. टी. मध्ये सामील करून घेतल्या व १९७० मध्ये तर ६१ नवीन कंपन्या जोडून घेतल्या.

१९७० च्या अखेरीस आय. टी. टी. च्या मुख्य सहाय्यकारी अंगभूत (Major Subsidiaries) अशा ३३१ कंपन्या होत्या व अशा Subsidiaries कंपन्यांच्या पुनः दुसऱ्या Subsidiares ७०८ होत्या. ह्या वेळची स्थिती अशी होती की प्रत्येक प्रकारच्या महत्त्वाच्या धंद्यामध्ये मूळ धंदेवाईक ह्या नात्याने आय. टी. टी. चा हात होताच !

जवळ जवळ अर्ध्या अमेरिकेभर टेलिग्राफ व टेलिफोन तारांचे व वीज कंपन्यांचे जाळे आय. टी. टी. व त्यांच्या Subsidiaries ह्यांच्या मालकीचे होते. आणि बाहेर ६७ देशांमधून हे धंद्यांचे जाळे विणून ठेवलेले होते.

ह्या धंद्याची वाढ झाली तरी कशी ? पहिल्या प्रथम आय. टी. टी. दुसऱ्या कंपन्याचे ५१ टक्के शेअर्स खरेदी करून त्यांच्या १०० टक्के भांडवलाची मालकी घेत असे. पूर्वीच्या भागीदारांना चूप बसविण्यासाठी व त्यांनी आपल्या Merger Scheme (एकत्रीकरणाला) विरोध दर्शवू नये म्हणून त्यांच्या शेअर्संना बाजार भावापेक्षा पंचवीस पंचवीस टक्के वाढती किंमत देत असे. आणि एकदा कंपनी ताब्यात आली म्हणजे नंतर मग नवीन नवीन डिबेंचर्स, प्रेफरन्स शेअर्स काढून जनतेच्याच खिशातून पैसा काढून घेऊन भरपाई केली जात असे.

हे असे किती वर्षे चालणार हा देखील एक कूट प्रश्नच असतो. कारण भागधारकांना अधिक पैसे देऊन बहमत मिळविण्यासाठी व

मालकी हक्क मिळविण्यासाठी व तो टिकविण्यासाठी पैसा ओतणार, नवनवीन कर्जे काढत राहणार, कामगार वर्ग गप्प बसविण्यासाठी त्यांना वेतन वाढविणार. पण सर्व प्रपंच येवढा मोठा वाढवून ठेवलेला असतो की कोठून ना कोठून तरी पैशाचा प्रवाह चालूच रहात असतो.

१९७१ च्या सुरुवातीला American Institute of certified public Accountants ह्या संस्थेनी असे निदर्शनास आणले की आय. टी. टी. कार्पोरेशनने १९६९ मध्ये आपल्या उत्पन्नावर २·१ कर भरला आणि १९५८ मध्ये (Merging) एकत्रीकरण झपाट्याने करावयास आरंभ होण्यापूर्वी उत्पन्नावर ४८ टक्के कर भरला होता.

प्रेसिडेंट जॉन्सनच्या कारकीर्दीत Auti–Trust फिर्यादी ज्या लावलेल्या होत्या त्या तशाच दप्तरी पडून होत्या. परंतु आय. टी. टी.ची एक जोड कंपनी Subsidiaries कॉन्टिनेंटल बँकिंग कार्पोरेशन ह्यांनी लख्ख खोटे हिशोब सादर केले होते, म्हणून खटला चालला होता.

कोणाच्या कल्पनेत बसणार नाही अशी गोष्ट ह्यावेळी घडली. शिकागो युनिव्हर्सिटीतील प्रख्यात विद्वान अर्थशास्त्रज्ञ YALE BROZEN ह्याने लागोपाठ ७ भाषणे आय. टी. टी. वर दिली व निक्सन राजवटीवर कोरडे ओढले. मासिक २० लाखांवर खप असलेल्या BARRONS ह्या अर्थविषयाला वाहिलेल्या सुप्रसिद्ध मासिकामध्ये ती भाषणे छापून आली. न्यूयार्क टाईम्सने त्यातील काही उतारे देखील छापले.

आय. टी. टी. चा उपाध्यक्ष विल्यम मरियम ह्याने सिनेटर थॉमस डॉड ह्याला तर जवळ जवळ विकतच घेतले होते. ह्याच्यामार्फत सरकारी यंत्रणा कार्पोरेशनला असाध्य ते साध्य करून देत होती.

१९५५ मध्ये जॉन फॉस्टर डलेस सेक्रेटरी ऑफ स्टेट, ह्याला, मध्यस्थी घालून आय. टी. टी. ने ब्रिटिश पंतप्रधान हॅरोल्ड मॅकमिलन ह्याला वश केले आणि अॅटलांटिक महासागरामधून टेलिग्राफ तारा टाकण्याचे कंत्राट मिळविले. युनायटेड नेशन्सचा सेक्रेटरी जनरल त्यागी ली, नाटोचे सेक्रेटरी जनरल पॉल मॉक, इंग्लंडचे लॉर्डस, फ्रेंच असेंब्लीचे बरेचसे सभासद आय. टी. टी. ने आपल्या दप्तरी केव्हाच नोंदून ठेवले होते.

१९७० साली आय. टी. टी. चा उपाध्यक्ष मरियम ह्याने शपथेवर दिलेल्या जबानीमध्ये असे सांगितले होते की, अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक व्हावयाच्या वेळी आय. टी. टी. दोन्हीही पक्षांना मलिदा चारीत असे.

'To butter both sides, so we will be in a good position who ever wins'

'Corrupt Practices Act' खाली हे गुन्हे होते हे ध्यानात घेऊन सुद्धा व्हाईट हाऊसचे न्याय खाते त्याची काहीही दखल घेत नसे. आय. टी. टी. कार्पोरेशनवर १९६७ साली ७ मिलीयन डॉलर्स कराची केलेली मागणी न्याय खात्यामार्फत २ मिलीयन करण्यात आली व आय. टी. टी. ते पैसे भरून सहिसलामत बाहेर पडली; आणि उजळ माथ्याने वावरू लागली.

ह्या १९६७ मध्ये आय. टी. टी. ने अमेरिकन ब्रॉडकास्टिंग कंपनी आपल्यात सामील करून घेण्याचे ठरविले. फेडरल कम्युनिकेशन्स कमिशनने विरोध केला. ३०० सिनेटर्सनी आपला विरोध दर्शविला; म्हणून त्यावेळी Merger झाले नाही.

१९७० मध्ये निक्सनच्या न्यायखात्याने आय. टी. टी. च्या विरुद्ध तीन Anti–Trust Suits दाखल केल्या. निवडून आलेले सिनेटर्स व कॉंग्रेसमेन अशा बाबतीत अनभ्यस्तच असतात. त्यांनी असे विषय पूर्वी कधी बारकाईने हाताळलेले नसतात. काहीजण जे हुषार असतात त्यांना ह्या मोठाल्या कार्पोरेशनस् विकत घेऊन टाकतात.

कनेक्टिकट्चा इन्शुअरन्स कमिशनर वुईल्यम कोटर ह्याने विरोध दर्शविला नाही कारण त्याचेही हात बरबटलेले होते. व त्यालाही पुढे कॉंग्रेस निवडणुकीसाठी उभे रहावयाचे होते.

एक लेखक म्हणतो.

When law inforcement becomes entangled with party politics and when the party-managers are appointed to administer justicc, then justice becomes Vulnerable to the political fix. For, this is the currancy that campaign managers use to pay off their obligations to the big contributors and to the political wheeler dealers.

निक्सनच्या न्यायखात्यातील उच्च श्रेणीच्या जागांपैकी सात जागांवर पूर्वीचे निवडणूक मंडळाचे प्रमुख व निवडणुकात धडपडलेले नकली स्वार होते. अॅटॉर्नी जनरल मिचेल, त्याचा दुय्यम केल्हिन फिलीप्स, डेप्युटी अॅ. ज. रिचर्ड क्लिनडिन्स्ट, बिल विल्सन, रॉबर्ट मार्डियन, लिओनार्ड, रूकलेशा हे सगळेच ह्या स्तरातले:

लिंडन जॉन्सनच्या कारकीर्दीत वॉरन ख्रिस्टॉफर म्हणून दुय्यम Attorney General होता. त्याने ह्या बाबतीत विवेचन करताना लिहून ठेवले आहे की, निवडणूक मंडळातून काम केलेल्या व्यक्ती, निवडणुकीला पूर्वी उभे राहिलेले व धडपडलेले उमेदवार ह्यांना सरकार दरबारी वा विशेषतः न्यायखात्यामध्ये मुळीच जागा देऊ नये. अनेक कुलंगडी पूर्वी केलेल्या असल्यामुळे त्यांची विचाराची दिशा शुद्ध नसते व त्यामुळे लवकरच राज्ययंत्रणा कोसळते आणि न्यायदान चोख व बरोबर होत नाही. व्यवस्थित राज्य चालवावयाचे असेल तर स्वच्छ अंतःकरणाची बाहेरची विद्वान माणसे व्हाईट हाऊसमध्ये घ्यावयास पाहिजेत.

आताच्या निक्सनच्या राजवटीत अॅटॉर्नी जनरल हा CREEP (Committee for Reelection of President) चा अध्यक्ष दुय्यम अॅटॉर्नी जनरल CREEP मधील महत्त्वाच्या पदावर, त्याच्या खालोखालचे तीन अॅटॉर्नी जनरल निरनिराळ्या ठिकाणच्या निवडणुकीत हरलेले उमेदवार.

खरं म्हणजे हे प्लेगसारख्या संसर्गजन्य रोगातले उंदीर आहेत. त्यांना दूर सारलेच पाहिजे. त्याला नाईलाज आहे.

त्यांचे हात बरबटलेले असतात व त्यांच्याकडून स्वच्छ राज्यकारभाराची अपेक्षा करणे हे मूर्खपणाचे आहे.

निवडणुकांमधून काम केलेली ही माणसे राज्यकारभार सचोटीने करू शकत नाहीत. कारण त्यांचा ध्येयवाद वेगळाच असतो.

मिचेल व मार्डियन तीन वर्षे न्यायखात्यात राहून निक्सन १९७२

च्या निवडणुकीला पुन्हा उभा राहणार हे जाणून १९७१ मध्ये न्यायखाते सोडून Committee for re-election of President. (CREEP) ह्या कमिटीला जाऊन मिळाले आणि दुसरे पाचजण खाते सोडून बाहेर पडले.

पहिल्यापासूनचा Anti-Trust Division चा मुख्य रीचर्ड मॅकलॉरेन हा होता. तो निक्सनच्या फंडगुंडापैकी किंवा निवडणुकीला उभा राहिलेला उमेदवार नव्हता. तो वकिली करून पुढे आला होता. व त्याला न्यायदानाची चाड होती. ह्यानी मोठे धाडस करून आय. टी. टी. व Ling-Temco Vought ह्यांच्या विरुद्ध खटले भरले. ह्या दोन्ही कंपन्या ' NIXON-ROSE-MUDGE-GUTHRIE -ALEXANDER-MITCHELL ह्या सॉलिसिटर्स व अॅटर्नीज कंपनीचे गिऱ्हाईक असल्यामुळे Attornay General मिचेल ह्यांनी ते काम हाताळण्याचे नाकारले. मिचेल हा त्या सॉलिसिटर्स कंपनीचा पूर्वी भागीदार होता.

मागे सांगितलेच आहे की, खालच्या कोर्टात Anti-Trust केसेसचा निकाल मॅक लॉरेनच्या म्हणजे न्यायखात्याच्या 'विरुद्ध लागला. मॅक लॉरेनने सुप्रीम कोर्टात अपील दाखल केले. ही गोष्ट १९७१ च्या जूनमध्ये घडली. आय. टी. टी. चा जेनीन व्हाईट हाऊसमध्ये वशिले लावण्याच्या मार्गावर होता. ४ ऑगस्टला त्याने मिचेलची गाठ घेतली. काहीतरी तोड काढून समेट करण्याच्या उद्देशाने वाटाघाटी सुरू झाल्या.

मॅकलॉरेन तोड काढण्याच्या विरुद्ध होता.

अशी परिस्थिती असताना मिचेलच्या न्यायखात्याने आय. टी. टी. च्या विरुद्ध असलेल्या फिर्यादी काढून घेतल्याचे जाहीर केले आणि आय. टी. टी. व हार्टफोर्ड फायर इन्शुअरन्स ह्यांचे एकत्रीकरण लगेच झाले !

सप्टेंबर १९७१ मध्येच बातमी बाहेर फुटली की, आय. टी. टी. नी आपली सबसिडिअरी कंपनी शेरटन हॉटेल ह्यांच्यामार्फत CREEP (Committee for re-election of President Nixon) ला सॅनडिअॅगो ह्या शहरी १९७२ चे अधिवेशन भरविण्यासाठी ४ लाख डॉलर्स दिले आणि त्याच्या बदल्यात मिचेलनी निक्सनच्या साहाय्याने आय. टी. टी.वर असलेल्या विश्‍वासघाताच्या फिर्यादी काढून घेतल्या.

नोव्हेंबर महिन्यात डेमॉक्रेटिक पक्षाचा अध्यक्ष लॉरेन्स ओब्रायन ह्याने मिचेलला खालीलप्रमाणे पत्र पाठवून विचारणा केली–

' Are you able through a candid exposition of all the facts to allay my suspicion that there is a connection between I. T. T.'s sudden largesse to the Republican Party and simultaneous out-of-court settlement of one of the biggest merger cases in Corporate History to I. T. T.'s benefit ?'

मिचेलनी काहीच जवाब दिला नाही. परंतु दुय्यम अॅटर्नी-जनरल क्लिन्डिस्ट ह्याने उत्तर धाडले की, त्याला स्वतःला किंवा मिचेलला आय. टी. टी. च्या देणगीविषयी काहीच माहिती नसून ' आय. टी. टी. मर्जर ' प्रकरण सुरुवातीपासून शेवटपर्यंत मॅक लॉरेन ह्यांनी हाताळलेले आहे.

डिसेंबर महिन्यात मॅकलॉरेननी राजिनामा दिला. मिचेलनी त्याला युरोपची वारी करण्यास धाडले व तिकडून परत आल्यावर उत्तर एलिनॉइस ह्या भागात Ferderal Court Judge बनवून टाकले.

ह्या गोष्टी इतक्या झटपट उरकल्या गेल्या की, काही विचारायची सोय नाही. वास्तविक फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशाची नियुक्ती करावयाची म्हणजे ती व्यक्ती ज्या संस्थानातील असेल तेथील दोन सिनेटर्सनी ते नाव पसंत करून सिनेटकडे धाडावे लागते. सिनेटची ज्युडिशिअल कमिटी त्याचा विचार करते व नंतर सिनेट मंजुरी देते. वॉशिंग्टनचे न्यायखाते रीतसर नाव जाहीर करते. ह्या गोष्टीला कमीत कमी तीन महिने लागतात. पण मिचेलनी हे काम तीन तासांत उरकून टाकले, केवढा कामाचा दांडगा उरक !

आय. टी. टी. ची ४ लाख डॉलर्सची CREEP ला देणगी व Anti-Trust Suits काढून घेणे व मॅकलॉरेनची फेडरल जज्ज ह्या पदावर तीन तासांत नियुक्ती ह्या सर्व गोष्टी संशयास्पद वाटू लागल्या.

१२ फेब्रुवारी १९७२ ह्या दिवशी मिचेलनी अॅटॉर्नी जनरलपदाचा राजीनामा दिला व रिचर्ड क्लिन्डिस्ट हा त्याच्या जागी आला.

२२ फेब्रुवारी १९७२ ला खुनाला वाचा फुटली.

ह्या दिवशी वॉशिंग्टन पोस्टच्या बातमीदाराच्या हातात मूळ ' मेमो 'ची प्रत येऊन पडली. तो सुप्रसिद्ध मेमो मिसेस डिटा डेव्हिस बिअर्ड ह्या आय. टी. टी. कॉर्पोरेशनमध्ये वरच्या थरावर काम करणाऱ्या बाईने व्हाईस प्रेसिडेन्ट डब्ल्यू आर. मेरियम ह्याला २५ जून १९७१ ह्या दिवशी लिहिलेला कागद. खऱ्या भानगडी होत्या तरी काय हे कळण्यासाठी त्यातील महत्त्वाचा भाग उद्धृत करणेच श्रेयस्कर.

**मेमोरॅन्डम**

(खाजगी आणि गुप्त)

आय. टी. टी. वॉशिंग्टन कार्यालय,
१७०७, एल. स्ट्रीट,-एन. डब्ल्यू.
वॉशिंग्टन डीसी. २००३८

डब्ल्यू. आर. मेरियम यांस, टे. नं. (२०२) २९६-६०००
डी. डी. बिअर्डकडून २५ जून १९७१.

**विषय : सॅन डिआॅगो येथील रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन.**

माझे आत्ताच इ. आय. जेनिन बरोबर बोलणे झाले. त्याचे कारण म्हणजे अगोदर व्हाईट हाऊसकडून टेलीफोन आला होता. ह्या बाबतीतील बातमी फुटू न देण्याची आपण प्रत्येकानी काळजी घेतली पाहिजे. ह्या अधिवेशनाच्यासाठी आपली कंपनी चार लक्ष डॉलर्स कशा प्रकारे व कोणाला देणार आहे हे गुपित निक्सन, मिचेल व

## आणि चार लाख डॉलर्सच्या बदल्यात....

हॅल्डमन यांच्याखेरीज कोणालाच माहिती नाही. मिचेलनी गुप्तता राखण्याविषयी बजावले आहे. बाहेरून विचारणा करणारे इतके टेलीफोन्स येत आहेत की, मी अगदी त्रासल्यासारखी झाली आहे.

आपल्या कंपनीचे त्या बाबतीत नाव बाहेर पडू नये म्हणून मी हॉल आणि नेड ह्या दोघांनाही बजावून सांगितले आहे. कंपनीची जी इतर कंपन्यांशी एकत्रीकरण करण्याची योजना आहे, त्याला ह्या देणगीचा उपयोग होणार आहे. राष्ट्राध्यक्षांनी सर्व कसे उरकावयाचे ह्याचा आदेश मिचेलला दिलाच आहे. परंतु मॅकलॉरेन ह्याची उगीचच मध्येमध्ये लुडबुड चालू आहे.

माझी विनंती आहे की, आपण सर्वांनीच ह्याबाबतीत संपूर्ण गुप्तता राखून अलिप्त राहावे, म्हणजे काहीच धोका नाही.

मिचेल हा सर्व बाजूंनी मदत करीत आहे. हे ध्यानात घ्यावे.

हा मेमो मिळाल्यानंतर वाचून नंतर फाडून टाकणे.

ह्या मेमोवर डिटा बिअर्डने सही केली नव्हती. फक्त कोपऱ्यामध्ये स्वहस्ताक्षरात डी हे अक्षर लिहिले होते. पुढे जेव्हा तिला हा मेमो वॉशिंग्टन पोस्टच्या बातमीदाराने दाखविला; तेव्हा तिने सरळ सांगितले की, मेमोवर सही करण्याची माझी प्रथा नव्हती. मी फक्त 'डी' अक्षर कोपऱ्यात लिहित असे; व ह्या मेमोवरील 'डी' हे माझ्याच हाताने मी लिहिले आहे.

**डिटा डेव्हिस बिअर्ड :** १००० कोटींच्यावर भांडवल असलेल्या आय. टी. टी. कॉर्पोरेशनच्या वॉशिंग्टन येथील कार्यालयात काम करणारी व विधीमंडळातील सिनेटर्स व कॉंग्रेसमेन ह्यांच्यात खेळीमेळीने संचार करणारी एक स्त्री (Lobbyist) आय. टी. टी. कार्पोरेशनच्या फायद्याच्या गोष्टी सिनेटर्सच्या कडून करवून घेणे; वशिले लावणे, आतील आवाजाच्या बातम्या कॉर्पोरेशनच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या कानावर घालणे, हाच तिचा व्यवसाय.

डिटा तरुणपणी एक अल्लड वर्तनाची व उथळ विचाराची अशी मुलगी होती. युद्ध काळात रेडक्रॉसमध्ये काही महिने काम करून आल्यावर तिने दोन लग्ने केली-दोनदा काडीमोड घेतला. वरवरच्या थरातील लोकांत मिसळण्याची आवड असल्यामुळे १९६० च्या निक्सन-निवडणुकीच्या घुमाळीत तिने भाग घेतला होता. आय. टी. टी. मध्ये काम करीत असताना ज्यावेळी वॉशिंग्टनला नवीन कार्यालय उघडले गेले त्या वेळेपासून म्हणजे १९६० पासून ती तेथे काम करू लागली. तिला वर्षाचा ३०००० डॉलर्स पगार, महिना तीन हजार डॉलर्स इतर खर्चासाठी व वर्षाला १५ हजार डॉलर्स बोनस मिळत असे. निरनिराळ्या ठिकाणी पार्ट्या झोडणे, मोठ्यांशी संधाने बांधणे, राजकारणी व धंदेवाईक ह्यांच्यातून मिसळणे. ह्यात ती चांगलीच वाकबगार झालेली होती. आय. टी. टी. चा चेअरमन जेनिन ह्याची तिच्यावर फार मर्जी होती. व व्हाईट हाऊसमधील सर्व महत्त्वाची कामे तिच्या मार्फतच होऊ लागली.

२५ जून १९७१ चा मेमो हातात आला, परंतु त्या संबंधात सर्व माहिती जमा करण्याचे काम वॉशिंग्टन पोस्ट ह्या दैनिकाने त्यांच्या हुषार व चालाख बातमीदार (Brit Hume) ब्रिट हयूम ह्याच्यावर सोपविले.

एक दिवस बर्न गुडरिच व बॅक हॉर्नर ह्या दोन आय. टी. टी. च्या Public Relations खात्यातील जबाबदार व्यक्तींना घेऊन हयूम डिटाची मुलाखत घेण्यासाठी तिच्याकडे गेला. त्याने तो मेमो तिला दाखविला व डिटाने मेमोच्या टोकाला असलेले 'D' अक्षर आपलेच आहे हे सांगितले.

गुडरिच व हॉर्नर चाटच पडले. हयूमचा आनंद गगनात मावेना. ममोमधील शब्दन शब्द खरा असल्याची तिने ग्वाही दिल्यावर गुडरिच व हॉर्नर ह्यांचे चेहरे काळेठिक्कर पडले.

त्याच दिवशी वॉशिंग्टन पोस्टमध्ये संध्याकाळी डिटाचा फोन आला. तिने हयूमला घरी बोलावून घेतले. महत्त्वाची बोलणी झाली. सारांश असा :

१२ मे १९७१ रोजी सॅन डिआगो येथील Half Moon हॉटेलमध्ये आय. टी. टी. चा अध्यक्ष जेनिन, शेरेटन हॉटेलचा बिल जेम्स, कॉंग्रेसमन बॉब वुल्सन हे केंटुकीच्या गव्हर्नरनी दिलेल्या खान्याला हजर होते. जॉन मिचेल आला होता. मिचेल, ती स्वतः व गव्हर्नर Dunn हे निराळ्या दिवाणखान्यात बोलत बसले होते. आय. टी. टी. प्रकरण व ४ लाख डॉलर्सची देणगी ह्या बाबतीत काय करावयाचे ते ठरले.

सॅन डिआगो येथे १९७२ चे रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन घेण्याचे व त्यासाठी ४ लाख डॉलर्स खर्च करण्याची जबाबदारी आय. टी. टी. ने उचलली.

कॅलिफोर्नियातील गव्हर्नर ले. जनरल रेनीक हा सर्व रक्कम परस्पर मिळविण्याची व्यवस्था करील असे मिचेलनी सांगितले.

२९ फेब्रुवारी, २ मार्च व ३ मार्च १९७२ ह्या दिवशीचा वॉशिंग्टन न्यूजमध्ये ह्या सर्व हकिकती सुसंगतवार छापल्या गेल्या. डिटा १ मार्चला वॉशिंग्टन सोडून अज्ञात स्थळी निघून गेली. कोठे गेली हे आय. टी. टी. चा अध्यक्ष व मिचेल ह्यांनाच फक्त माहीत होते.

अॅ. जनरल क्लेंडेस्टाईनने सिनेट ज्युडिशिअरी कमिटीपुढे ह्या मेमोचा खोटेपणा सिद्ध करण्याचे आव्हान केले.

मिसिसिपी स्टेटमधून आलेला सिनेटर जेम्स इस्टलंड हा कमिटीचा अध्यक्ष होता. ५ तारखेला निवेदने सादर करण्याची तारीख दिलेली होती. मिचेल, क्लनडेस्टाईन ह्यांनी आपली लेखी निवेदने देऊन शपथेवर सांगून टाकले की, आपल्याला ह्या प्रकरणाची काहीच माहिती नाही.

आय. टी. टी. कार्पोरेशननी बचावाच्या दृष्टीने खालील मुद्दे दाखल करून त्याच्या आधारे प्रकरण लढावयाचे असे आव्हान दिले.

१) २५ जून १९७१ चा डिटा बिअर्डचा मेमो बनावट आहे.

२) डिटा बिअर्ड हिचे नाव खराब असून ती कलंकिता आहे; व तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवू नये.

३) वॉशिंग्टन पोस्टचा प्रचार निंद्य, घृणास्पद, व हीन अभिरुचीचा आहे. कारण मुळात तसे काही घडलेले नाही.

ह्याचवेळी कॅलिफोर्नियाचा SACRAMENTO BEE ह्या जबाबदार वर्तमानपत्रानी खालील बातमी छापली.

'The startling turnabout in Governor Ed. Reinecke's story about Press-Reports about Corporate financing offer to bring the Republican National Convention to San Diago has raised questions from

Washington to Sacramento.

Governor Reinecke did say on last friday about the arrangements of 4 lacs financing guarantee by the shearton Hotels ltd; a subsidiary of I. T. T.

'बी' वर्तमानपत्राच्या बातमीपत्राने गव्हर्नर साहेबांची मुलाखत घेतली. त्यात त्याने प्रश्न विचारला.

'I understand you and Eli Gillonwaters talked to Mitchell sometime in May–was that right?'

'Thats' right.' said the Governor.

दुसऱ्या दिवशी गव्हर्नर साहेबांनी Press Conference बोलाविली व खुलासा करताना सांगितले.

On 16th May 1971 trip to Washington D. C. we did not meet Att. General Mitchell as I previously reported. My discussion with A. G. Concerning the Convention was at 9·30 a. m. on 17–9–1971.'

गव्हर्नरसाहेब सिनेट कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांची फेफे उडाली.

इतकी नाचक्की होत होती तरीदेखील ॲटॉर्नी जनरल मिचेल निर्लज्जपणाने आय. टी. टी. प्रकरण हे वर्तमानपत्रांनी रचलेले एक कुभांड आहे असेच भासवीत होता.

आय. टी. टी. चा हॅरोल्ड, जेनिन, मिचेल, जिलेन वॉटर्स, रीचर्ड क्लिन्डिस्ट, आय. टी. टी. डायरेक्टर रोहटिन व मॅकलॉरेन ह्यांच्या जबान्या नोंदविल्या गेल्या.

ह्याच प्रश्नावर मॅकलॉरेन ह्यांनी राजीनामा दिला होता. आता तो सुप्रीम कोर्टाचा जज्ज असल्यामुळे प्रश्नांना उत्तरे अगदी जपून तोलून, मापून देत होता.

सिनेट चौकशी समितीमध्ये सिनेटर रोमन ऱ्हुस्क ही एक बिनडोक्याची, विचित्र वल्ली होती. निक्सन आणि धनवान लोक ह्यांच्या विरुद्ध कोणी बोलले की तो एकदम चवताळून उठत असे. त्यांच्या अंगाचा भडका होई.

स्तंभलेखक ॲन्डरसन साक्षिदाराच्या पिंजऱ्यात उभा राहिला. सिनेटर ऱ्हुस्कने तिरप्या नजरेने त्याच्याकडे पाहून म्हटले,

'You can have your opinions about it, but again I submit that the committee will probably have a pretty good idea of where the credibility lies with regard to whether the contribution by a corporation to support a Political Connection is CRIME.'

ॲन्डरसनने उत्तर दिले :

Well, I am aware that the attitude towards political contributions on the part of the politicians has been somewhat fazzy. (अस्पष्ट)

Senator Rhuska : It is not fazzy at all. Connections all over America are bought all–the time by business communities and every one...'

Anderson : Yes, I subscribe to that.

Senator Rhuska : Everyone in this room knows it.'

ह्या संवादाने खरे रूप प्रगट झाले.

२५ जून १९७१ चा मेमो खरा असल्याचे डिटा कमीत कमी ५ व्यक्तींच्या जवळ बोलली होती. त्या व्यक्ती साक्षी देण्यासाठी येणार होत्या.

ज्या डॉक्टरकडून डिटा बिअर्ड वर्षोगणती औषधपाणी घेत असे, तो, फितूर केलेला डॉक्टर व्हिक्टर लिझका सिनेट कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी आणला गेला. त्याने आपल्या जबानीत सांगितले की, बऱ्याच वर्षे डिटा मद्यसेवन करीत असल्याने तिचा मेंदू बरोबर काम करीत नव्हता. ती कोणत्याही कागदावर जबाबदारी ध्यानात न घेता सह्या ठोकीत असे. अखेर तो म्हणाला :

'Having lost the facility of judgement, putting things together in an uncontrolled fashion, she could have written an inaccurate memo.'

सिनेटर इस्टलंड ह्याने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना डॉक्टरसाहेब म्हणाले की, येथे जबानी देण्याच्या अगोदर मला व्हाईट हाऊसकडून दोन वेळा बोलावणे आले होते व मी गेलो होतो. आय. टी. टी. च्या मुख्य कार्यालयामधील प्रत्येक नोकरांची दरवर्षी प्रकृती तपासून अहवाल सादर करण्याचे काम मी करत आलो आहे. डिटाच्याविषयी अहवाल कंपनीकडे देताना, ती दारू पिते, तिचे डोके ठिकाणावर नसते, ती पाहिजेल त्या ठिकाणी सह्या करते, असे मी कधीही लिहून दिलेले नाही.

दुसऱ्याच दिवशी Medical Director of American Heart Association ह्याचे वक्तव्य बाहेर पडले व त्याने डॉक्टर लिझकाची जबानी 'Nonsense' ह्या सदरात नोंदविली.

केंटुकीचा गव्हर्नर लुई नन ह्याची पण जबानी झाली आणि ती सर्वांनाच अविश्वासार्ह वाटली.

व्हाईट हाऊसमध्ये जे अनेक बदमाश ह्या काळात घुसले होते, त्यांत हॉवर्ड हंट ही व्यक्ती होती. मिचेलनी ह्या हंटला C. I. A. चा वेष देऊन डिटाला भेटण्यासाठी Denvar ला पाठवून दिले. दुसरी बदमाश व्यक्ती कॅलिफोर्नियाचा वकील डेव्हिड फ्लेमिंग हा वॉशिंग्टनच्या सरकारी यंत्रणेतील शिपले ह्याचा दोस्त होता व आय. टी. टी. चा Retained Lawyer होता. दर वर्षाला त्याला आय. टी. टी. कडून पंधरा हजार डॉलर्स फी मिळत असे. डिटाकडे हॉस्पिटलमध्ये जाऊन रोज फ्लेमिंग तिला सिनेटपुढे जबानी कशी द्यावयाची ह्याची रंगीत तालीम देत होता.

सरकारचा मलिदा खाणारे वर्तमान पत्रकार आता बातम्या देऊ लागले की, मुळात Dita–Nemo सपशेल खोटा आहे, बनावट आहे.

कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी डिटांनी पहिल्या प्रथम लेखी निवेदन सादर केले. सिनेटर्स तिला प्रश्न विचारीत होते. ती उत्तरे देत होती

## डिटाचा डॉक्टर लिझका फितूर झाला पण....

सिनेटर कुकने मध्येच एक प्रश्न विचारला...

'Well, Mr. Hume has testified that during the meeting at your home on the 24th you told him that you had negotiated the terms of the settlement and of the I. T. T. cases with A. G. Mitchell during the party at Governor Nunns residence on 12th May. Now, did you say that to Mr. Hume? Dita : If I did, it must have been towards the end of the evening, Sir, when I was so upset.'

हा मेमो का लिहावा लागला, ह्यासंबंधी बोलताना ती म्हणाली की, मिस्टर मेरियमला व्हाईट हाऊसमधून टेलिफोन आला होता की ४ लाख डॉलर्स देणगी म्हणून जे द्यावयाचे ते सॅन डिअॅगो येथील रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशन खर्चासाठी का निक्सन निवडणूक फंडाला देणगी म्हणून ठेवावयाचे आणि नंतर त्याने जेव्हा मला तसे नक्की सांगितले त्यावर मी तो मेमो लिहिला.

तिची जबानी संपली. तिला हायसे वाटले.

डेनव्हेर मेडिकल असोसिएशनच्या डॉ. स्विडेर आणि डॉ. मायर ह्यांनी डिटाची शारीरिक व मानसिक तपासणी करून डिटाला कोणताही रोग नसल्याचे निवेदन बाहेर काढले. त्याची नक्कल वर्तमानपत्राकडे व सिनेट चौकशी समितीकडे धाडली.

कोर्टाच्या हुकुमान्वये ब्रिट ह्युमच्या पाच वेळा Lie-Ditector Tests घेण्यात आल्या व त्याने खोटी जबानी दिली नाही हे सिद्ध झाले.

२५ जून १९७१ च्या आसपास जे इतर मेमो डिटाच्या जवळ असलेल्या टाईपरायटरवर टाईप झाले होते, त्याच मशीनवर मेरिअमला लिहिलेला मेमो टाईप केला होता, हा पुरावा दाखल केला गेला.

२७ एप्रिल १९७२ ला सिनेट कमिटी चौकशी संपली. सर्व कागदपत्र मिचेल ह्याच्या खात्याकडे धाडून देण्यात आले व तसेच धूळ खात पडले. डिटाला तिचा पूर्वीचा मासिक पगार चालूच होता तेव्हा तिची काहीच तक्रार नव्हती.

मध्यंतरीच्या काळात व्हाईट हाऊसमधील पाळीव कुत्री : जेम्स मॅकॉर्ड, लिली हंट, गॉर्डन लिडी व जॉनडीन ही चांडाळ चौकडी डॅनियल एल्सबर्गच्या डॉक्टरांच्या घरावर दरोडा घालून ढेकरा देत होती आणि नवीन कामाच्या शोधात होती. त्यांना डिटावर पाळत ठेवून व मधून मधून भेटी देऊन आय. टी. टी.चे प्रकरण खऱ्या स्वरूपात कोणालाही सांगावयाचे नाही; असा सल्ला देण्याविषयी आदेश दिले गेले होते.

ज्या बिलंदर व्यक्ती आय. टी. टी. प्रकरणाच्या बुडाशी सुरवातीपासून होत्या त्याच व्यक्ती पुढे वॉटरगेट दरोडा प्रकरणात होत्या हे विशेष आहे.

जॉन डीन, हॉवर्ट हंट, लिली, कॉल्सन व जेम्स मॅकॉर्ड ह्या त्या व्यक्ती.

डीन तर गुन्हे करून वर दडपून टाकण्यामध्ये अत्यंत चतुर व हुषार. हल्डमन, मिचेल व एहरलिचमन ह्या त्रिकुटांचा त्याला पूर्ण पाठिंबा.

ह्या डिनची साक्ष आय. टी. टी. कमिटीपुढे काढावयाचे ठरले. समन्स काढले गेले. पण हा बदमाष जो फरारी झाला तो उपराष्ट्रपती अॅग्न्यूच्या कॅपिटल हॉलमधील गोटात. कशाला त्याचा पत्ता लागेल?

डिटा बिअर्डचा तो महत्त्वाचा २५ तारखेचा मेमो की, जो...

सिनेट ज्युडिशिअरी कमिटीपुढे दाखल केला गेला होता तो व्हाईट हाऊसचा जस्टिस खात्याकडे पाठवून दिला गेला. पॅट्रिक ग्रे ह्यांनी तो तेथून लंपास केला; व डीनजवळ दिला आणि डीनने तो अगदी अलगद आय. टी. टी. च्या अध्यक्षांकडे पोहोचता केला. मूळ 'मेमो'च गायब झाल्यावर आपोआपच प्रकरण दडपले जाईल, ही सर्वांची कल्पना.

१ ऑगस्ट १९७३ ला सिनेट वॉटरगेट कमिटीपुढे व्हाईट हाऊसच्या न्यायखात्याने आय. टी. टी. प्रकरणांनी सर्व पुरावा कागदपत्रांसहीत कमिटीकडे दाखल केले. त्या महत्त्वाच्या कागदपत्रांत स्पेशल कौन्सिल चार्लस कॉल्सनने व्हाईट हाऊस प्रमुख हल्डमन ह्याच्याकडे ३० मार्च १९७२ रोजी जी तक्रार नोंदविली होती ती देखील दाखल झाली होती. त्यात कॉल्सन म्हणतो की व्हाईट हाऊस, न्याय खाते व आय. टी. टी. ह्या तिघांनीही आपल्या जवळचा लेखी पुरावा पुढे आणलाच नाही, दाबून टाकला. ते कागदपत्र दाखल झाले असते तर अमेरिकेचा राष्ट्रपती निक्सन हा ह्या सर्व प्रकरणाचा सूत्रधार होता, हे स्पष्ट झाले असते.

ह्या दाबून टाकलेल्या Files संबंधी सिनेट कमिटीने आपल्या अहवालात नमूद करून ठेवले होते की :

उदाहरणार्थ : टाचण नं. १. आय. टी. टी. प्रकरणातील देण्याघेण्याबाबतीत एहरलिचमन ह्यांनी ५ मे १९७१ ला लिहिलेला मेमो की ज्यात ह्यासंबंधीचे मिचेल व निक्सन ह्यांच्यामधील वाटाघाटी स्वरूपाचे बोलणे नमूद केले गेले होते.

टांचण नं. २. आय. टी. टी. च्या अध्यक्ष जेनीन ह्यांनी लिहिलेला अत्यंत गुप्त मेमो की, ज्यात निक्सननी न्यायखात्याकडे आय. टी. टी.च्या मर्जर– एकत्रीकरणाच्या धोरणाला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचे एहरालिचमनमार्फत कळविले असल्याचे नमूद केले गेले आहे.

टांचण न. ३. व्हाईट हाऊसमधील खलिता की जो मिचेलनी आय. टी. टी. बरोबर केलेला चार लाख डॉलर्सचा सौदा.

८ जानेवारी १९७४ ला दोन फतवे व्हाईट हाऊसमधून बाहेर पडले. पहिला फतवा असा :

'The White House released a background paper denying the charges. It said that the President had concluded the I. T. T. litigation as it was inconsistant with his own views of Anti–Trust Policy because it was an attack on 'bigness' rather than an attempt to insure corporate competition.'

दुसरा फतवा : दुधाच्या डेअरीवाल्यांना दुधाच्या किमती वाढवून दिल्या गेल्या. ह्याला कारण निक्सन निवडणूक फंडाला त्यांनी पैसे दिले होते; ही गोष्ट सत्य नाही. ह्या दोन गोष्टींचा एकमेकाशी काहीही संबंध नाही.

अमेरिकेतील सामाजिक कार्यकर्ता राल्फ नाडेर याने दुधाच्या किमती वाढविल्या जाऊ नयेत म्हणून फार मोठी चळवळ उभारलेली होती.. १९७२ मध्ये अखेर किमती वाढविल्या गेल्याच. नाडेरनी निक्सनवर वर्तमानपत्रातून व भाषणातून झोड उठविली होती, व निक्सन निवडणूक फंडाला ह्या डेअरीवाल्यांनी लाखो डॉलर्स दिलेले होते; हे जनतेच्या नजरेला आणून दिले. एवढेच काय परंतु ह्या CREEP फंडाला कोणी किती पैसे पुरविले होते त्याची माहिती देखील त्याने जनतेपुढे ठेवली. त्याची यादी खालीलप्रमाणे होती.

| | |
|---|---|
| ओल्डीन कार्पोरेशन | २॥ लाख डॉलर्स |
| LING TEMCO VOGHT | २ लाख डॉलर्स |
| आय. टी. टी. | ४ लाख डॉलर्स |
| अमेरिकन एअरलाईन्स | १ लाख डॉलर्स |
| फिलीप्स पेट्रोलीयम | २ लाख डॉलर्स |
| अॅशलंड ऑईल | १,५५,००० डॉलर्स |
| ब्रॅनिक एअर वेज | १,४०,००० डॉलर्स |
| गुडइयर टायर | १,४०,००० डॉलर्स |
| मिन्नेसोटा माइनिंग | १,३०,००० डॉलर्स |
| कॅलिफोर्नियातील युनियन ऑईल कं. | २॥ लाख डॉलर्स |
| वेल्स फार्गो बँक | २॥ लाख डॉलर्स |
| अॅरिझोना येथील मिडयाॅकी रेल रोड | २ लाख डॉलर्स |
| South east forest industries | २ लाख डॉलर्स |

७ एप्रिल १९७२ ला रॉबर्ट व्हास्को ह्या धनाढ्य माणसाने Mutual Investment Trust फंड लुटला. व १० एप्रिलला मॉरिस स्टान्समार्फत CREEP फंडाला २ लाख डॉलर्स दिले. त्याच्यावर खटला केला जाऊ नये म्हणून Attorney General मिचेल ह्यांनी खटपट केली होतीच. पुढे वॉटरगेट प्रकरणात मिचेल व मॉरिस स्टान्स ह्या दोघांनाही पाच पाच वर्षांच्या शिक्षा झाल्या.

१९७१ व १९७२ ह्या दोन वर्षात निरनिराळ्या संस्था स्थापन करून CREEP साठी तो फंड द्यावयाचा, हे एक पेव फुटलेले होते. काही संस्थांची नावे खालीलप्रमाणे होती.

1. For Maryland Education
2. Effective Citizenship
3. Mission Committee
4. Citizens Response Committee
5. Political Actions together
6. Better Government
7. The league of Middle American women
8. Committee to keep cop on the Beat
9. Committee for stable society
10. Citizens for citizen Government.

ह्यातून जमा झालेल्या पैशांची ना नोंद ना हिशोब, सर्वच गुप्त.

१९७५ मध्ये बाहेर फुटलेले लॉक हेड लांच लुचपत प्रकरण हे देखील १९७१ मधील निक्सन राजवटीतले.

१९६४ मधील राष्ट्रपती निवडणुकीसाठी रिपब्लीकन पक्षाने बरी गोल्डवॉटर यास उभा केला होता व डेमोक्रॅटीक पक्षाने लिंडन जॉन्सनला.

बॅरी गोल्डवॉटरच्या निवडणूक मोहिमेत भाषण देत असताना ९ ऑक्टोबर १९६४ रोजी कॅलिफोर्नियातील एका सभेत निक्सन म्हणाला होता :

With all the power President has the most important thing to keep in mind is this :

You must not give that power to a man unless, above everything else, HE HAS CHARACTER. Character is the most important qualification the President of AMERICA can have.'

आणि १९७४ मध्ये निक्सनला राजीनामा देऊन व्हाईट हाऊसमधून बाहेर पडावे लागले ते त्यांनी शिलांची जपणूक केली नाही म्हणून. अब्रूची चाड ठेवली नाही म्हणून. १९६० साली प्रचार सभेत तो म्हणाला होता :

' Money is the mother's milk in Politics ! '—

आणि हीच कृती त्यांनी शेवटपर्यंत जोपासली होती; आणि तिने त्याला गळफास लावला.

[ क्रमशः ]

**बालमित्रांसाठी**
पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या कथांचा
नवा संग्रह प्रकाशित झाला

**बालरत्न**

बारावा डेमी । ११८ पृष्ठे । रु. ४

यापूर्वी प्रकाशित झालेली
पंडित महादेवशास्त्री जोशी यांची इतर पुस्तके

**अग्निदिव्य**

बारावा डेमी । १०४ पृष्ठे । रु. ३

**राजवाहन**

बारावा डेमी । १०४ पृष्ठे । रु. ३

**विश्वकर्मा साहित्यालय**
२०३५।२ सदाशिव पेठ
टिळक रस्ता
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४१२०९

पुस्तके

# तसबीर आणि तकदीर

## एक ' विचारप्रधान ' आत्मचरित्र

म. श्री. दीक्षित

१९७० ते ७२ या कालावधित, म्हणजे सत्तरी ओलांडल्यावर प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी आपले आत्मचरित्र 'तसबीर आणि तकदीर' या नावाने लिहिले व ते १९७६ च्या उत्तरार्धात वाचकांचे हाती आले. हा सारा त्यांच्या 'तकदीरा'चाच भाग म्हटला पाहिजे. श्री. के. क्षींची 'तसबीर' गेली चाळीसपंचेचाळीस वर्षे वाचकांपुढे आहे ती टीकाकार म्हणून. 'राक्षसविवाहा' सारखी एखादी दीर्घ भावकथा उमेदीच्या काळात त्यांनी लिहिली व ती मुख्यतः विवाहपद्धतीवरील त्यांच्या भावनात्मक विचारतरंगांमुळे गाजली. त्यानंतर क्षीरसागरांचे ललितलेखन पूर्ण बंद पडले आणि उर्वरित आयुष्यात त्यांनी टीकालेखक म्हणूनच लौकिक मिळविला.

प्रा. क्षीरसार हे जितके बुद्धिमान, चिकित्सक आहेत, तितकेच आत्मकेंद्री, आत्मरत आणि देव-दैव-ज्योतिष यांच्यावर श्रद्धा असणारे सौंदर्यपूजक टीकाकार आहेत. त्यांची प्रकृती सदोदित दुर्बळ नि रूग्ण. वाचन, चिंतन आणि लेखन या अन्नावर आणि 'ओळखले जाण्याच्या क्षुधेच्या' जोरावर त्यांनी पंचाहत्तरी गाठली. विशिष्ट मूल्यांखातर त्यांनी आपली लेखणी अप्रियता पत्करूनही परजत ठेवली आणि आता पंच्याहत्तरीच्या उंबरठ्यावर असता 'तसबीर आणि तकदीरा'च्या रूपाने आपली विस्तृत अनुभव गाथा, वाचकापुढे ठेवली. प्रा क्षीरसागर यांच्या आजवर साकार झालेल्या तसबीरीत त्यांच्या तकदीराचा मोठा वाटा आहे असे त्यांना मनापासून वाटते आणि त्यामुळेच त्यांनी आत्मचरित्राला हे काहीसे विचित्र नाव दिले. असे नाव देण्यात त्यांचे उर्दू-फारसीवरील प्रेमही व्यक्त झाले आहे. या भाषाशुद्धीवाद्यांना आपल्या जुन्या प्रखर विरोधी भूमिकेची याद देण्याचाही कदाचित त्यांचा हेतू असावा, असो. नावात काय आहे ? तकदीराने तारलेल्या तसबिरीचे आता आणखी बारकाईने निरीक्षण करू.

'तसबीर आणि तकदीर' हा ग्रंथ श्री. केक्षींच्या वैयक्तिक आणि वाङमयीन जीवनाची सांगोपांग उकल करणारा ग्रंथ आहे. आत्मचरित्राच्या माध्यमातून तो आकारास आला असला तरी त्याचे एकूण लेखन टीकात्मक पद्धतीनेच झाले आहे. त्यामुळे कादंबरी सदृश ललितकृती वाचीत असल्याचा आनंद हा ग्रंथ अर्थातच देऊ शकेणार नाही. सर्वसामान्य वाचकापेक्षा वाङमयाच्या जाणकार वाचकास, किंबहुना अभ्यासकास मात्र हे आत्मचरित्र बौद्धिक मेजवानी देऊ शकेल. प्रा. व. दि. कुलकर्णी, शंकर सारडा आणि वि. श्री. मोडक यांच्यासारख्या चोखंदळ चहात्यांच्या नजरेखालून हे आत्मचरित्र जाऊनसुद्धा डेमी ५१५ पृष्ठांइतके ते मोठे व्हावे याचे आश्चर्य वाटते.

आपल्या १७ टीकात्मक पुस्तकात 'विचारधन' आहे तर आत्मचरित्रात 'जे पाहिले आणि भोगले' असे 'अनुभवधन' आहे असे श्रीकेक्षी 'निवेदना'त प्रारंभी म्हणतात. प्रत्यक्ष ग्रंथ वाचताना अनुभव येतो तो असा की, अनुभवधनापेक्षा विचारधनाचे पारडे जड झाले आहे. निखळ टीकाकाराचे बाबतीत हे क्रमप्राप्तच होते. वाङमयातील वादस्थळे असोत वा वाङमयीन व्यक्तींचे मूल्यमापन असो, श्रीकेक्षी आपल्या आवडत्या मूल्यकल्पनांची आणि त्यांना अनुरूप असलेल्या विचारसरणीची इतकी चौफेर टोलेबाजी करतात की त्यापायी आत्मकथा अनेक ठिकाणी गळचेपून गेली आहे आणि वाचकास त्यांचे इतर टीकाग्रंथ वाचीत असल्याचा पुनः पुन्हा भास होतो. 'आत्मचरित्र हा प्रकार आत्मकेंद्री लोकांचाच लेखनप्रकार आहे. प्रांजल आत्मसर्मथनाने आत्मचरित्राची हानी होत नाही. प्रांजळ निवेदन आणि डोळस अनुभव यात आत्मचरित्राचे आकर्षण असते' असे सुंदर नेटके विचार निवेदनात मांडणाऱ्या श्रीकेक्षींनी वाङमयीन कर्तृत्ववर्णनावर भर देण्यापेक्षा आपल्या सौंदर्यपूजक आणि बौद्धिक भावजीवनाची दैवाधीन कथा अधिक खुलवून सांगितली असती तर त्यांची तसबीर कितीतरी उजळून जाती.

प्रा. क्षीरसागर हे मूळचे साताऱ्याकडील मध्यमस्थितीतील पांढरपेशी बालबोध घराण्यातील गृहस्थ. आई, वडील, चुलते, विशेषतः थोरले बंधु यांच्या मायेत ते वाढले. शरीरबल आणि द्रव्यबल श्रीकेक्षींच्या तकदीरात कधीच नव्हते. तकदीराने त्यांच्यावर फक्त सरस्वतीची अपरंपार कृपा केली. उत्कट भावना आणि चिकित्सक बुद्धी असणारे क्षीरसागर शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात आल्यावर त्यांच्या जीवनाला खरा आकार येत गेला. कै. माधवजूलियन, गं. दे. खानोलकर आणि कै. शेजवळकर यांच्या सारखे खंदे कवी-लेखक सान्निध्यात येताच श्रीकेक्षींमधले भावनापूजक (रोमँटिक) नि वैचारिक व्यक्तित्व एकदम टवटवले आणि पुढे ज्ञानकोशकार केतकर, अहिताग्नी राजवाडे, न्यायरत्न विनोद यांच्यासारख्या विचारवंतांच्या सावलीत ते क्रियाशील, आक्रमक बनले. आक्रमकता अर्थातच विचारात होती. दुबळ्या शरीरप्रकृतीमुळे कृतीशूरपणा त्यांना कधीच पेलला नाही. भावनिक जीवनात आपणहून ठामपणे निर्णयाप्रत येणे त्यांना कधीच जमले नाही. कन्याराशीचे श्रीकेक्षी ममाने नेहमी भावनापूजक आणि बौद्धिक क्षेत्रात

मूलगामी विचारक राहिले. 'टु बी रेकग्नाइज्ड' आणि 'टु बी लव्हड' या दोन वेडांनी 'राक्षसविवाहा' पासून ते जे झपाटले ते थेट प्रस्तुतची आत्मकथा लिहीपर्यंत.

श्रीकेक्षींच्या तसबिरीला नाण्याप्रमाणे दोन बाजू आहेत. एक भावनात्मक आणि दुसरी वैचारिक. भावनात्मक व्यक्तिगत जीवनात प्रेम, प्रणयाराधन, सौंदर्यशोध आणि या सर्वांतून निर्माण होणारं दर्दभरी स्वप्निल विश्व या सर्वांचं उत्कट, पण संयमशील दर्शन ते घडवितात. बुद्धिमान आणि सुंदर स्त्रीचा सहवास, मग ती विवाहित असो वा अविवाहित असो, श्रीकेक्षींना फार प्रिय. मिरज संमेलनाला क्षीरसागर मेलने निघाल्याचे तळवळकरांनी सांगताच मामा वरेरकर म्हणाले 'अरे' तो रोमँटिक मेलने कसला जातो! तो फीमेल गाडीनेच जाणार. स्त्री सहवासाला श्रीकेंनी प्रेमाचं एक अधिष्ठान आणि तत्त्वज्ञान प्राप्त करून दिलं आहे. कै. माधवजूलियन यांच्या प्रेमसृष्टीचे आणि प्रीतिभावनेचे त्यांना झालेले आकलन यादृष्टीने समजून घेण्यासारखे आहे. भरीला उर्दू-फारसीतील शेरशायरी आणि इंग्रजी प्रेमकविता यात रंगून आणि त्यांचा विपुल प्रमाणात वापर करून त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रेमाच्या दुनियेचं सुंदर दर्शन घडविलं आहे.

श्रीकेंची प्रेमक्षुधा 'एम'ने आरंभीच इतकी चाळवली की, 'राक्षसविवाहा'चं लेखन करूनच ती त्यांना शमवावी लागली. आत्मकथेत 'एम'चे प्रकरण त्यांनी आणखी खुलं करून सांगितलं आहे. विवाहनिरपेक्ष प्रेमाचं श्रीकेक्षींचं एकूण तत्त्वज्ञान हे त्यांच्या 'सांस्कृतिक राष्ट्रवादी' विचारसरणीत कसं बसतं हे मात्र कोडं आहे. शर्मिला टागोरने पतौडीशी केलेल्या प्रेमविवाहास त्यांनी याच विचारसरणीतून विरोध दर्शविला आहे. 'एम'नंतरच्या व्याकुळ अवस्थेत पुढे त्यांना 'परित्यक्ता' मीरा भेटते. मीरा आणि तिचा हरवलेला पोर यांच्यासंबंधी अपरंपार कणवेने श्रीकेक्षींनी जे लिहिलं आहे तो सारा मजकूर गद्यकाव्यात जमा होईल इतका करुणोत्कट उतरला आहे. तकदीरात विवाहसुख नसल्याच्या जाणिवेने श्रीकेक्षी जेव्हा मीरेच्या मृत्यूसोहळ्याचं वर्णन करतात तेव्हा त्यांच्यातील ललितलेखक वृद्धावस्थेतही जागा असल्याचा प्रत्यय येतो. मीरा अंतर्धान पावल्यानंतर साठीच्या आसपास श्रीकेक्षींचं भावजीवन हटयोगिनी शकुंतला व्यापून टाकते. इतकं की, अखेर लोकनिंदेची पर्वा न करता, ते तरुण शकुंतलेल्या पूर्ण स्वाधीन होतात. उघडपणे आणि संयमाने कथन केलेली तीन स्त्रियांची ही प्रेमकहाणी हेच खरे श्रीकेक्षींच्या आत्मचरित्राचे प्रमुख आकर्षण आहे. अर्थात ही सारी कहाणी वाचताना वयस्कपोक्त अशा श्रीकेंपेक्षा मीरा आणि शकुंतला यांच्य डोळस, चिवट प्रीतिभावनेचा प्रभाव वाचकांवर अधिक पडेल असे वाटते. आपलं आत्मचरित्र त्यांनी शकुंतलेला अर्पण करावं यात मोठेपण अधिक कुणाचं हे सांगणंही कठीण.

प्रेम आणि सौंदर्यपूजन ही श्रीकेंच्या व्यक्तिगत जीवनातील जशी प्रमुख धारा आहे तशीच आप्तस्वकीय आणि मित्रपरिवार हीसुद्धा एक स्निग्ध धारा आहे. या सर्वांविषयी कृतज्ञभावाने लिहून त्यांनी जणू एक प्रकारे ऋण फेडले आहे. वडीलबंधु, गोपीनाथ तळवळकर, निरंतर, भय्या उमराणी, चिपळूणचे चितळे वकील, डॉ. पुरोहित पति-पत्नी, कुमुद घारपुरे, तारा बरकतराय, य. रा. दाते, अशोक जावडेकर, शायर पाटणकर इत्यादी अनेक व्यक्तींसंबंधी या आत्मकथेत अधूनमधून साभिप्राय, पण स्नेहभावाने लिहिलेले आढळते. थोरल्या बंधुसंबंधी 'वडील'कीच्या आदरभावनेने लिहिलेला मजकूर किंवा भय्या उमराणींसंबंधीचा वेळोवेळी प्रकट झालेला खराखुरा स्नेहभाव–हे सारे वाचताना वेधक शब्दचित्रे वाचत असल्याचा भास होतो. उमराणींचे शब्दचित्र वाचताना मला तर 'एकच प्याल्या'तील सुधाकराला जपणाऱ्या रामलालची आठवण आली.

शैक्षणिक आणि वाङ्मयीन क्षेत्रात, म्हणजे क्षीरसागरांच्या आवडत्या बौद्धिक क्षेत्रात–विवेकानंद, माधवज्यूलियन, शेजवलकर, ज्ञानकोशकार केतकर, अहिताग्नी राजवाडे, जे कृष्णमूर्ती, न्यायरत्न विनोद अशा अनेक थोर व्यक्ती भेटतात. त्यांचे व्यक्तित्व नि कार्य यांची यथार्थपणे ओळख करून देण्यात आत्मचरित्राची बरीच पाने खर्ची पडली आहेत. वास्तविक या पानभरतीतून, यापूर्वी लिहिलेल्या टीकाग्रंथातील मजकुरापेक्षा अधिक काही मौलिक सांगितले असे मुळीच नाही. 'समाजाने ज्यांना पुरते ओळखले नाही, किंबहुना अकारण अवमानिले' त्यांची पूर्वी एकदा घासूनपुसून ओळख करून दिल्यावर पुन्हा आत्मकथेत तेच दोरखंड वळत बसल्यामुळे श्रीकेक्षींची आवडती 'औचित्यविषयक जाणीव' बोथट झाल्याचे मात्र दिसून आले. उलट म. ए. सो. चे भालशे, किंकर, न. चिं. केळकर, सांगलीचे राजेसाहेब, अत्रे, गिरीश, घाटे इत्यादी काही व्यक्तींसंबंधी प्रसंगाप्रसंगाने जे आठवणीकथन आढळते ते नवीन व अर्थपूर्ण वाटते. दि. के. बेडेकरांसारख्या मतवैचित्र्य असणाऱ्या सुजन टीकाकाराविषयी उदारबुद्धीने लिहिलेले जसे जाणवते, तसेच वा. ल. कु. प्रभाकर पाध्ये यांच्याविषयीचे निसटते वारही लक्षात येतात. साहित्य परिषदेच्या संदर्भात वा. रा. ढवळे, त्यांची मुंबई लॉबी आणि त्या लॉबीचे पाठिराखे के. नारायण काळे, कवी यशवंत–ही सारी श्रीकेक्षींनी कल्पिलेली


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०


एक आघाडी आहे. त्यामुळे ढवळयांसारख्या हौशी वाङमयीन कार्य-कर्त्यांचे भडक चित्रण करून त्यांनी आपली वादक्षुधा शमविली की काय अशी शंका येते. मर्ढेकरी संप्रदायातील हीनावर बोटं चेपत असता मर्ढेकरांच्या वाङमयीन महात्मतेचं रहस्य त्यांना अद्यापी उलगडू नये याचा अचंबा वाटतो.

श्रीकेक्षींच्या आत्मचरित्रातील बरीच पाने त्यांची दुबळी प्रकृती, औषधोपचार, पथ्यपाणी, ज्योतिष, दैववाद, काल्पनिक दुःखे आणि वाङमयीन जगतातील मानसन्मान, दौरे, साहित्य परिषदेतील राजकारण इत्यादी विषयांनी व्यापलेली आहेत. या सर्व विषयासंबंधी त्यांनी निवेदिलेला बारीकसारीक तपशील इतका विपुल आहे की, तो वाचताना मूळच्या आशयसंपन्न कथेवर त्यांच्यातील कुरकुरी कुरघोडी करीत आहे असे वाटत राहते. इथे आत्मकेंद्री व्यक्ती आत्मपूजनात प्रमाणाबाहेर रंगली आहे. साहित्य परिषद आणि संमेलने यासंबंधीच्या मजकुरात विस्मृतीमुळे म्हणा किंवा अनवधानाने म्हणा, काही चुका झाल्या आहेत. संमेलनाध्यक्ष निवडणुका, मिरज–सातारा संमेलने, केतकर समाधी, कुसुमावतींची निवड, वाङमयेतिहास, अध्यक्षीय सत्कारसमारंभातील भाषणे, अशा काही हकिकतीतील त्रुटी आणि चुका दप्तराच्या आधारे सहज पडताळून पाहता येतील. श्रीकेक्षी त्या मान्यही करतील. म. ए. सोसायटीमधील प्रदीर्घ सेवेतील आपले कटु-गोड अनुभव खूप विस्ताराने त्यांनी कथिले आहेत. साहित्यक्षेत्रातील त्यांचे स्वयंभू मोठेपण काही व्यवसायबंधूंना सलत होते एवढाच यावरून निष्कर्ष निघतो. मराठी मनाची ही कोती वृत्ती तशी सार्वत्रिक आहे.

श्रीकेक्षींचं आत्मचरित्र वाचून एका गोष्टीचा पुन्हा प्रत्यय येतो. तो हा की, क्षीरसागर हे एक स्वयंप्रज्ञ, आणि निर्भीड टीकाकार आहेत. वाळिंब्यासारखा फेसाळपणा त्यांच्यात नाही. आपल्या आवडत्या मूल्यांखातर लोकप्रियता अव्हेरून, ते एकांड्या शिलेदाराप्रमाणे वैचारिक टीका प्रतिटीका करीत आले. कला, वाङमय आणि जीवन यांचा एकत्रित मूलगामी विचार करून नववाङमयाविरुद्ध त्यांनी प्रायः एकाकीपणे जी झुंज दिली ती निःसंशय आदर बाळगावा अशी आहे. त्यांचे तात्त्विक लेखन रेखीव, सुगम, रसोद्ग्राही आणि वकिली बाण्याचे असते हे आत्मकथेवरूनही सहज कळू शकते. अशा लेखनात नेहमीच्या लकबीप्रमाणे इंग्रजी शब्द आणि वाक्ये यांची खैरात (तीही देवनागरीत) करण्याचे कारण नव्हते. कारण श्रीकेक्षींची शैली पुरेशी अर्थवाही, समर्थ आहे. व्यापक अर्थाने एका मराठी चिंतकाचे हे विचारप्रधान आत्मचरित्र आहे. आत्मपूजन आणि मूल्याधिष्ठित विचारसंघर्ष अशा दुहेरी रूपात ते बौद्धिक आनंद खचित देईल. मात्र त्या आनंदाचा आस्वाद घेताना नारळाच्या शेंड्या काढताना झटापट करावी लागते तशी वाचकांस करावी लागेल. *

**तसबीर आणि तकदीर**
श्री. के. क्षीरसागर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४
मूल्य ४० रु.


## प्रसिद्ध झाले !




# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# भारतीय संघाला हिणवू नका !

मुकुंद मणुरकर



मद्रासच्या क्रिकेट सामन्यात भारताचा पराभव झाला त्यात अनपेक्षित असं काहीच नव्हतं. फार फार तर तो ज्या दारुण पद्धतीनं झाला ते अनपेक्षित होतं असं म्हणता येईल. अन्यथा पहिल्या दोन सामन्यांत भारतीय फलंदाजांनी जी काही फलंदाजी केली होती ती पहाता यावेळी काही वेगळं घडू शकेल असं समजण्यात कोणतीच तर्कसंगती नव्हती.

हा पराभव झाला आणि ती वारंवार सिद्ध झालेली गोष्ट पुन्हा नव्याने जगजाहीर झाली. ती म्हणजे आपल्याला पराभव अजिबात सहन होत नाही. स्वतःच्या विजयाचं विश्लेषण जसं करता येत नाही तशीच पराभवाची मीमांसाही करता येत नाही. आणि म्हणूनच गल्लीतील लंगोटी पत्रापासून सर्वांनी एकजात भारतीय क्रिकेट संघावर ताशेरे ओढण्यास सुरुवात केली. विजयाची भलावण करताना जसं लेखणीला सैल सोडलं होतं तितक्याच बेबंदपणे लाखोल्या वहाताना लेखण्या चालवल्या गेल्या. एकदम हे टोक नाही तर मग ते टोक. सुवर्णमध्य माहीतच नाही. त्यामुळे क्रिकेट सोडून देऊन विटीदांडू–लगोऱ्या खेळण्याचा सल्ला आत्मविश्वासाने ते देऊ शकले.

पराभव झाला, दारुण पराभव झाला हे निर्विवाद. पण त्याची काही तरी कारणं ही असणारच. आपल्या फिरकी गोलंदाजीची जादू संपली का ? निदान या घटकेला तरी असं म्हणायला कुणी धजावणार नाही. मग इंग्लंडची धावसंख्या तीनतीनशेपर्यंत कशी जाऊ शकली ? (फक्त तिसऱ्याच सामन्यात ती पहिल्या डावात तीनशेच्या आत आणि दुसऱ्या डावात दोनशेच्या आत गुंडाळली गेली.) याबाबत एक गोष्ट नजरेत येईल. गेल्या पाच वर्षांतील इंग्लंडबरोबरची ही चौथी मालिका. यापैकी किमान तिसरी मालिका भारताविरुद्ध खेळणाऱ्या खेळाडूंनीच धावा केल्यायत. एमिस, ग्रेग, नॉट, टॉलचर्ड-ओल्ड हे (आणि फक्त हेच) धावा काढणारे खेळाडू मागील दोन मालिकेत भारताविरुद्ध खेळलेले आहेत. नवोदितांपैकी जॉन लिव्हर या गोलंदाजाने एकदा केलेल्या धावा हा अर्थातच सन्माननीय अपवाद. बाकीचे सर्व नवीन फलंदाज–बॉर्लो, ब्रिअर्ली, वूल्मर, रॅण्डॉल हे फिरकी गोलंदाजीला स्वस्तात

बळी पडत आहेत. म्हणजे उपरोक्त जुन्या खेळाडूंवरच इंग्लंडची फलंदाजी अवलंबून आहे. ग्रेगने आपल्या एका नव्या पुस्तकात चंद्रा, बेदी, प्रसन्ना, वेंकट यांच्या गोलंदाजीचं मोठ्या विस्ताराने विश्लेषण केलंय्. प्रोफेशनल खेळाडूंनी इतक्या डिटेलमध्ये भारतीय गोलंदाजीचा अभ्यास केल्यावर त्यांची फलंदाजी व आपली गोलंदाजी यातील मेळ मग समजून येऊ शकतो.

आता आपली फलंदाजी. मागील वर्षी त्रिनिनादला वेस्ट इंडिजने दिलेले शेवटच्या डावात चारशेच्यावर धावा करण्याचे आव्हान ज्या फलंदाजांनी यशस्वीपणे स्वीकारले तेच एक गायकवाड सोडला तर बाकी सर्वजण म्हणजे गावसकर, मोहिंदर, विश्वनाथ, पटेल हे त्याच क्रमाने मद्रासलाही खेळले. तेव्हा धावा निघाल्या फक्त त्र्याऐंशी! ओल्ड, लिव्हर, विलीस यांच्यापेक्षाही तेज ठरणारे रॉबर्ट, होल्डिंग आणि अंडरवूडच्याच दर्जाचा लान्स गिब्ज यांची गोलंदाजी व्यवस्थित खेळणारे फलंदाजच यावेळीही होते. तरीही तीनही सामन्यांतील सहाही डावात सातत्याने निराशाजनक फलंदाजी कशी होऊ शकली? वर्षात हजार धावा पुऱ्या करणारा गावसकर, शैलीदार फलंदाजीने धावा गोळा करणारा विश्वनाथ, आक्रमक ब्रिजेस पटेल, द्रुतगती गोलंदाजी दमदारपणे व बेडरपणे खेळणारे गायकवाड, मोहिंदर अमरनाथ या सर्वांना एकाच वेळी एकत्रितपणे काय झालंय्? कागदोपत्रांवरून तरी याचं कोणतंच कारण दिसू शकत नाही. त्यासाठी जरा आडवळणात शिरावे लागेल. आणि तसं शिरलं की मग एकदम बेदीचे नेतृत्व आणि सिलेक्शन कमिटीचा विदुषकीपणा इथे येऊन आपण पोचतो. (मद्रासच्या सामन्यानंतर पतौडीने आकाशवाणीवरून बोलताना मोघमपणे सांगितले की, हा पराभव झाला त्याच्यामागे कारणं 'बरीच' आहेत. ही बरीच कारणं कुठली हे मात्र काही त्याने सांगितले नाही!) बेदीला बहाल केलेले नेतृत्व हे धरलं तर चावतं, सोडलं तर पळतं या पठडीतील आहे. या महाशयांनी संघात प्रादेशिकता इतकी जोपासली आहे की, त्यामुळे पतौडीच्या कारकीर्दीतील परिस्थितीही कमी क्षोभक ठरावी. उत्तर-विभागाचे आणि त्यातही दिल्लीचे वर्चस्व संघावर असावे यासाठी त्याने चालविलेले प्रयत्न उघडउघड दिसून येतात. करसन घावरीला दावून मोहिंदर-मदनलाल यांना खेळवायचा त्याचा प्रयत्न जितका तिरस्करणीय तितकीच मद्रासच्या सामन्यात केवळ मोहिंदरला आत घेता यावे म्हणून गायकवाडला बळी देऊन फलंदाजीच्या क्रमाची लय बिघडविण्याची त्याची कावेबाज चालही तिरस्करणीय. याचे आणखी एक ढळढळीत उदाहरण म्हणजे चौथ्या सामन्यासाठी संघात करण्यात आलेला सुरींदर अमरनाथचा समावेश. मदनलालला वगळल्यामुळे दिल्लीचा एक खेळाडू बाहेर गेला. त्यामुळे त्याची जागा भरून काढण्यासाठी दिल्लीचाच दुसरा खेळाडू घेणे आवश्यक ठरले असावे. अर्थात हा बेदीचा एकट्याचाच दोष नाही. त्याचा हेका चालवून घेणाऱ्या निवडसमितीच्या सदस्यांचा आणि त्यांहीपेक्षा क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष असलेल्या दिल्लीच्या रामप्रकाश मोहेरांचाही यात सिंहाचा वाटा आहे. ही पार्श्वभूमी पटवून घेतल्यावर मग संघातील इतर खेळाडूंची मनःस्थिती लक्षात येईल. सामना सुरू व्हायच्या सकाळपर्यंत जर संघाच्या निवडीबाबत खडाजंगी चालू असेल तर दहा वाजता हातात बॅट घेऊन फलंदाजीला जाणाऱ्या गावसकरची मनःस्थिती कशी असेल? खेळाडूंचे मॉरलच एकदा डाऊन झाल्यावर किंवा केलं गेल्यावर त्यांच्याकडून चांगला खेळ होण्याची अपेक्षा कितपत धरावी?

अर्थात हे काही भारतीय संघाच्या पराभवाचे समर्थन नव्हे. तसंच पराभवाची पुरेशी मीमांसाही नाही. (तो हक्क पाचही सामने पुरे होईपर्यंत राखून ठेवला आहे.) भारतीय संघाला शिव्या घालणाऱ्यांनी एक लक्षात ठेवावं की शेवटी हा खेळ आहे त्यात जय-पराजय हे होणारच. शिवाय प्रत्येक संघाला अधूनमधून 'काळचाकुट्ट' कालखंडातून जावेच लागते. आपला जितका झालाय त्यापेक्षाही भयानक पराभव गेल्या दोन वर्षांत इंग्लंडला ऑस्ट्रेलिया व वेस्ट इंडिजकडून स्वीकारावे लागले. परवा मद्रासला भारतीय संघ जेवढ्या धावात बाद झाला तेवढ्या धावाही इंग्लंडच्या याच संघाला गेल्या वर्षी वेस्टइंडिजविरुद्ध करता आल्या नव्हत्या. विश्वचषक जिंकणाऱ्या लॉईडच्या वेस्टइंडिज संघाला आस्ट्रेलियाने नुकतेच देमाय धरणी ठाय करून सोडले होते. त्याच आस्ट्रेलियाला परवा पाकिस्तानने जवळजवळ तीन दिवसांतच हरविले होते. क्रिकेटला 'गेम आफ चान्स' म्हणतात ते यामुळेच.

आणि म्हणूनच भारतीय संघाला उपरोधिक, कडवट, कुजकट, तिखट शब्दांत शिव्या घालण्याचे काहीच प्रयोजन नाही. ¤

## बंगलोरचा सामना

येत्या अठ्ठावीस तारखेपासून बंगलोर येथे चौथा कसोटी सामना सुरू होत आहे. तो अगदी निरुत्साही वातावरणात. पहिले तिनही सामने सणसणीतपणे हरल्यावर मालिकेतील स्वास्थ्य आपल्या दृष्टीने तरी गेलंच आहे. (मुंबईच्या सामन्याला जाण्याचे केलेले बेत आता अनेकांनी निर्धास्तपणे रद्द केले आहेत.) अशावेळी गेल्या वर्षी वेस्टइंडिजवर ऐतिहासिक विजय मिळविल्यानंतर बेदीने केलेले वक्तव्य आठवते. तो म्हणाला होता की, 'चारशे धावांचे आव्हान स्वीकारताना आम्ही ठरवले की हे जमले नाही तर जास्तीत जास्त वाईट काय होईल तर आपण सामना हरू. आणि तसं झालं असतं तर परिस्थितीत विशेषसा काही फरक पडणारच नव्हता. म्हणून सामना जिंकण्याच्या दृष्टीनेच आम्ही फलंदाजी सुरू केली.' आता बंगलोरच्या सामन्याच्या वेळीही भारतीय संघाची परिस्थिती अशाच प्रकारची आहे. पहिल्या तीनही सामन्यांतील पराभवानंतर जी प्रचंड बेअब्रू झाली आहे त्यात पुढील दोन पराभवानंतर विशेषशी वाढ काही होणार नाही. या गोष्टीचा बेदीने विचार नक्कीच केलेला असावा. आणि तसा तो केला असल्यास भारतीय संघाकडून या सामन्यात चमकदार खेळाची अपेक्षा केल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

अर्थात ही आपली एक अंधुक आशा आहे! ☐

# आणि म्हणून कुणीही....

## अखेर मनोरंजनाच्या पातळीवरच राहते

मोहिनी वर्दे

'आणि म्हणून कुणीही' या नाटकास राज्यनाटचस्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले, म्हणून आवर्जून नाटक पाहिले. ह्या नाटकाचे मूळ गुजराती लेखक आहेत मधु रॉय, अनुवादक विजय शिर्के, व दिग्दर्शक दिलीप कुलकर्णी. या नाटकातील प्रमुख भूमिका अनुया पालेकर यांनी केली आहे. या नाटकाचे सर्व संचाने नाटक उठावदारपणे रंगमंचावर आणले. परंतु आपण काही चिरकालीन स्मरणात राहावे असे पाहिले, असे नाटक पाहिल्यावर वाटले नाही. शिवाय या नाटकाच्या निमित्ताने काही प्रश्न मनात उभे राहिले त्यांची उत्तरे शोधण्यासाठी नाटक कसकसे समजत गेले ते जाणण्याचा प्रयत्न केला आहे.

नाटक हा कलाप्रकार प्रयोगक्षम असतो याचे भान ठेवून या नाटकाचे मूल्यमापन करण्याचे ठरविले. आजच्या प्रायोगिक रंगमंचावर रोज काही ना काही घडते आहे. नाटकाच्या आविष्करणाचे अनेकविध प्रयोग होताना दिसतात. 'आणि म्हणून कुणीही' या नाटकात नाटचकलेच्या माध्यमातून एका वेगळ्या प्रकारे नाटचाविष्कार घडवला आहे. हे नाटक दोन अंकी आहे. कथानक दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर आकार घेते. नाटकातल्या नटांचे खाजगी जीवनातील कथानक व दुसरे नटांनी उभ्या केलेल्या पात्रांचे नाटकातील कथानक. थोडक्यात ह्या नाटकात आणखी एक नाटक आहे. ह्यातील पहिला अंक म्हणजे फार्सिकल पद्धतीने सादर केलेले नाटकातील नाटक. अर्थात हे नाटकातील नाटक आहे, ही गोष्ट प्रेक्षकांना पहिला अंक संपेपर्यंत लक्षात येत नाही. त्यामुळे काय बिघडते हा प्रश्न नंतर विचारात घेता येईल. नंतरच्या अंकात नाटकातील पात्रांचे खरे जीवननाटच सुरू होते. तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकात दोन पातळ्यांवर नाटकातले वास्तव आंदोलत राहते. या नाटकातही 'नाटकातील नाटका' चा उल्लेख वारंवार येतो. परंतु प्रस्तुत नाटकात पहिला अंक आणि दुसरा अंक यात संपूर्ण वेगळे वास्तव उभे केले आहे.

पडदा उघडतो तेव्हा नाटकातला सेट वाटावा अशी सामान्य घरातील बैठकीची खोली, थोडी कृत्रिम आणि डोळ्यात भरावी इतपत सजवलेली. घराच्या मालक मालकिणीचे म्हणजे तरुण नवरा-बायकोचे भांडण होते. नवरा पाच मिनिटांत क्षुल्लक भांडणावरून भांडून घरातून निघून जातो आणि नायिका कामिनी फोन करून आपल्या प्रियकराला घरी बोलावते. प्रियकर येतो व तो असतानाच तिचा नवरा किल्ल्या विसरतो म्हणून परत येतो. बाहेर पडलेले पिस्तूल घेतो व पिस्तूल हातात असतानाच पत्नीला व तिच्या प्रियकराला मजा मारा असा संदेश देतो. त्यांचा आणखी एक मित्र नंदलालभाई व त्याची पत्नी भाभी येतात. पिस्तुल हातात घेऊन ही मंडळी कोणाचे कोणावर प्रेम आहे, कोण बेइमान आहे हे आपापसात मजेमजेने ठरवतात. या पाच पात्रांव्यतिरिक्त भाभीचा पूर्वीचा प्रियकर देशपांडे हा रंगमंचावर प्रवेश करतो. तो नुकताच आफ्रिकेहून आलेला असतो. भाभीच्या म्हणजे ज्योत्स्नाच्या लग्नापूर्वीच्या घाणेरड्या फोटोंचा उल्लेख केला जातो. परंतु त्यामुळे नंदलालभाई भडकून न उठता फोटोचे कॅलेंडर करण्याचा निर्णय घेतो. नाटक सुरू झाल्यानंतर ५।१० मिनिटांतच प्रेक्षकांच्या लक्षात येते की रंगमंचावरच्या घटना विनोदी आहेत. एखाद्या फार्समध्ये असतात तशा थिल्लर, भडक, उथळ आहेत. सगळा उतावळ्या माणसांचा संच जमला आहे. कामिनीची नवऱ्याजवळ आपल्या व्यभिचाराची कबुली, प्रियकराचे तिच्यावरचे प्रेम, तिच्या नवऱ्याचा आत्महत्त्येचा प्रयत्न, एकमेकाच्या हातून पिस्तुलाची उडवाउडव, सर्व घटना व पात्रांच्या हालचाली; गोंधळ निर्माण करतील अशा कृत्रिम पद्धतीने बसवल्या आहेत. प्रत्येकाची वेशभूषा तऱ्हेवाईक व दिखाऊ, अत्यंत घाईघाईत उच्चारलेली वाक्ये आणि सर्व पात्रांचे एका वेळी बोलणे हे प्रेक्षकांना नाटकाकडे गंभीरपणे पाहायला सांगत नाही. गोंधळात कामिनी रंगमंचावरून पिस्तुल उडवून प्रेक्षकातल्या कुणाचा तरी खून करते. प्रेक्षकातून एक किंकाळी ऐकू येते. प्रेक्षक स्तिमित झालेले असताना पहिला अंक संपतो.

पुढच्या अंकात खरे नाटक गंभीर वळण घेते. पुढच्या अंकाची म्हणजे खऱ्या अंकाची कथा अशी: एक कामिनी शहा नावाची तरूण मुलगी नाटकात कामे करून पैसे मिळवते व आपल्या आईला आणि ऐतखाऊ भावाला पोसते. तिचा भाऊ सुंदर तिच्याबरोबर तिच्या नाटकात कामे करीत असतो. पाठक नावाच्या तिच्या नाटकात काम करणाऱ्या एका तरुणावर तिचे प्रेम असते. त्यांचे लग्न ठरलेले असते. या नाटकाचा लेखक तिच्या प्रेमात असतो. नाटकात काम करणारे पारीख पतीपत्नी तिच्या प्रेमाला उत्तेजन देतात. कामिनीचा भाऊ सुंदर शहा याचे पारीखच्या पत्नीवर प्रेम असते व ती नवऱ्याच्या नकळत त्याच्याशी चोरून संबंध ठेवते. अशा गुंतागुंतीच्या प्रेमप्रकरणावर कडी करणारे आणखी एक रहस्य या नाटकात आहे. कल्पनेतल्या एका घाऱ्या डोळ्याच्या गोऱ्या रुबाबदार तरुणावर कामिनी लुब्ध असते. वर्तमानपत्रात कुणी खोसला नावाच्या श्रीमंत तरुणाचे नाव ती वाचते. व तो आपला काल्पनिक प्रियकर आहे असे ठरवते. योगायोगाने तो प्रियकर लेखकाचा आफ्रिकेहून परत आलेला जुना मित्र निघतो. कामिनी त्यांचे व आपले संबंध आहेत असे नाटकातल्या तिच्या प्रत्येक सहकाऱ्याला सांगते. प्रत्येकाची प्रेमप्रकरणे उजेडात येतात. पाठकही (तिचा खरा प्रियकर) तिच्यावर

रागावतो. शेवटी कामिनी लेखक मित्राला विनंती करून खोसलाला नाटकाच्या प्रयोगाला बोलावते. तिला पिस्तुल चालवायला येत असते म्हणून ती प्रेक्षकात बसलेल्या खोसलाचा खून करते. कोर्टात सुनावणी होते व कामिनीला जन्मठेपेची शिक्षा होते. या खुनामागचा आपला हेतू कोणता तर सुंदर पुरुषाची प्राप्ती होत नाही म्हणून ती त्याच्यावर सूड उगवते.

फार्सच्या स्वरूपात हलके फुलके फुलत जाणारे नाटक जन्मठेपेच्या शिक्षेपर्यंत येऊन पोहोचते.

एखाद्या नाटकाने, कादंबरीने किंवा कोणत्याही कलाप्रकाराने एखादी गोष्ट निश्चितपणे व्यक्त करावी अशी प्राथमिक अपेक्षा कलाकृतीच्या बाबतीत वावगी नाही. जे सांगायचे असते ते संमिश्र- स्वरूपाचे असू शकते परंतु तरीही ते ठामपणे मांडले जाते. या नाटकातून चार गोष्टी अस्पष्ट स्वरूपात जाणवल्या त्यामुळे कोणत्याही एका गोष्टीचा परिणाम होऊ शकला नाही. या नाटकातली सर्व पात्रे एकमेकांची फसवणूक करीत असतात ही एक गोष्ट. कामिनी नावाच्या तरुणीला आपल्या आईच्या व भावाच्या जाचातून सुटायचे असते म्हणून ती काल्पनिक विश्वात रममाण होते, ही दुसरी गोष्ट. जगावर सूड उगवण्यासाठी माथेफिरू तरुणी निरपराध माणसाचा खून करू शकते, ही तिसरी गोष्ट. माणसे भेकड असतात ही चौथी गोष्ट, अशा अनेक गोष्टी असू शकतील.

'आणि म्हणून कुणीहि' विषयी एवढे समजून घेतले तरी नाटक प्रेक्षकांना आपल्या बरोबर खेचून नेते. नाटक रंगत जाते. तात्पुरते परिणामकारक होते. याचे कारण नाटकाची भाषा व अभिनय. गुंतागुंतीचे कथानक शिताफीने गुंफले आहे. लहान लहान प्रवेशाद्वारे एकसंध उभे केले आहे. नाटकातले प्रवेश प्रकाशयोजनेच्या द्वारे एकमेकांपासून सुटे केले आहेत. अभिनयाचे कसब सर्वांचे सारखेच वाखाणण्याजोगे. अनुया पालेकरचा अभिनय सर्वोत्कृष्ट (त्याबद्दल तिला अभिनयाचे पारितोषक मिळाले आहे) सहज सुंदर अभिनय, विलक्षण गतिमान, क्षणाक्षणाला बदलत जाणारे हावभाव, हालचालींतली चपलता, आवाजाचे तऱ्हेवाई बदल, बालिश रम्य भाव आणि तिने उभे केलेले लाघवी व्यक्तिमत्व यामुळे तिची भूमिका सहजासहजी विसरली जाणार नाही. नाटकाची भाषा नेटकी आणि नेमकी हवे ते सांगणारी, चटपटीत संवादाने सजलेली, पाहिजे तेथे गंभीर आशय पेलणारी आहे. एकंदर नाटक मनावर ठसते, ते नाट्यवस्तूपेक्षा त्याचा प्रयोग परिणामकारक होतो म्हणून. आणि म्हणून प्रायोगिक नाटकासंबंधी प्रश्न उभे राहातात.

या नाटकाप्रमाणे नवे विषय, नव्या कल्पना, नवे आशय रंगभूमीवर अवतरताहेत परंतु नाटकाचा आशय आणि त्याची नाट्यप्रयोगात झालेली परिणती अपरिहार्य वाटते का? नाटक ज्या स्वरूपात रंगमंचावर आले, त्या स्वरूपात ते रंगमंचावर येणे आवश्यक होते का? नाटकात वास्तवाच्या पातळचा एकापेक्षा अधिक, कालगणनेची सरमिसळ केलेली दिसते. अगोदरची घटना व नंतरची घटना यातील सुसूत्रता डोळ्याआड केलेली आढळते हे सर्व मूळ अनुभवाचे स्वरूप संमिश्र आहे म्हणून झालेले असते काय? हा प्रश्न विचारावासा वाटतो. 'आणि म्हणून कुणीही' यातील आशय सरळ पद्धतीने व्यक्त होऊ शकला असता का? कामिनीच्या दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाचे दर्शन जर घडवायचे होते तर सबंध एक अंक नाटक फार्सिकल पातळीवर ठेवण्याचे प्रयोजन काय? सरळ घेण्याचा घास उलटा घेतल्याने काय साधते? तात्कालिक परिणाम साधला जातो. एक यशस्वी नाटक व प्रायोगिक रंगभूमीला एक चांगला नाट्यप्रयोग मिळाला एवढे जमेस धरले तरी 'आणि म्हणून कुणीही' हे नाटक गांभीर्याची अपेक्षा करणारे परंतु विरंगुळा अथवा घटकाभर मनोरंजन याच पातळीवर राहाणारे नाटक ठरते.

□

# घरोघरी हीच बोंब

## घरात ठीक.. नाट्यगृहातही?..

शिरीष सहस्रबुद्धे

भर हिवाळ्यात पुण्यामध्ये नव्या नाटकांचा पार उन्हाळा झालेला असताना 'कलाकार' या नवीन स्थानिक संस्थेनं 'घरोघरी हीच बोंब' हे वसंत सबनिसांचं नवं नाटक सादर केलं आहे. सूत्रधार शरद तळवलकर आणि दिग्दर्शक शशिकांत निकते. 'कास्ट'च्या दृष्टीनं नाटक सुटसुटीत : म्हणजे फक्त सहा पात्रांचं. नाटकाचं नाव मात्र सामान्य प्रेक्षकाला जरा दचकविणारं. त्याचं आधीचं नाव म्हणे 'वेडिंग आणि बेडिंग' असं ठरलं होतं, पण ते सुलभ करण्याच्या दृष्टीनं बदलण्यात आलं. नवं नाव सुलभ आहे हे तर खरंच, एवढंच नव्हे तर नाटकाच्या प्रकृतीची अंधुक कल्पना यायच्या दृष्टीनंसुद्धा ते उपयोगी आहे.अर्थात खास नाट्यरसिकांपैकी काही आणि सामान्य प्रेक्षकांपैकी काही असा प्रेक्षकवर्ग (तो कोणता ते सुज्ञ वाचकांना ओळखणं कठीण नाही!) या चटकदार पण भडक नावामुळे गमावण्याचा धोका सादरकर्त्यांनी गृहीत धरला असेलच. पण तो काही फार महत्त्वाचा मुद्दा नाही.

महत्त्वाचा मुद्दा आहे तो नाट्यलेखनासंबंधी. विनोदी नाटकातील लेखकाचं स्थान, त्याची contribution आपल्याकडे दुय्यम तर लेखण्यात येत नसावी? नाट्यमंदारच्या 'सासू मेलीच पाहिजे' या लेखनात प्रयोगाइतक्याच फसलेल्या फार्ससंबंधी लिहिताना- सुद्धा या मुद्द्याचा मी उल्लेख केला होता. विनोदी नाटकाला किंवा फार्समध्येही इतर कुठल्याही नाटकाइतकंच ताकदवान स्क्रिप्ट लागतं, हे आपल्या निर्मात्यादिग्दर्शकांना माहीत नाही असं कसं होईल? पण याबाबतीत 'कळतं पण वळत नाही' अशी स्थिती झाली आहे खरी.

'घरोघरी हीच बोंब' या ताज्या हास्यप्रधान नाटकाची अवस्थाही बरीचशी अशीच आहे. निव्वळ लेखनमूल्यांच्या दृष्टीनं नाटकाचा विचार केला तर विनोद अभावानंच लक्षात येतो. कलाकार त्यात काय भर घालतील ती गोष्ट वेगळी. पण खळखळून हसून दाद द्यावी असा दमदार विनोद लेखनामध्ये बराच दुर्मिळ. याची कारणं दोन–तीन. एक तर नाटकात प्रसंगनिष्ठ आणि शब्दनिष्ठ विनोद जवळजवळ नाही. आहे तो विनोद प्रामुख्याने विविध स्वभाववैशिष्ट्यांची

पात्रं एकमेकांसमोर उभी राहिल्याने निर्माण होणारा–म्हणजेच पात्रनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ विनोद. पण अशा विनोदाला निसर्गतःच पात्रचित्रणाच्या व्यापविस्तारानुसार मर्यादा पडतात हे उघडचं आहे. त्यातही पुन्हा या नाटकात पात्रं कमी, सहामधलं एक पात्र, चांगलंच गंभीर. शिवाय सबनिसांनी जी सिच्युएशन उभारली आहे तीही काही अपरिचित नाही आणि फार्सिकल किंवा निखळ विनोदीही नाही. सुधीर (शशिकांत निकते) आणि सारंग (माधव आचवल) हे दोघे छायाचित्रकार मित्र; आजन्म ब्रह्मचर्याची आणि स्वच्छंदी जीवनाची प्रतिज्ञा केलेले. वसुधा (शोभा आर्य) सुधीरच्या प्रतिज्ञेचं दिवाळं काढते. मग त्यांच्या वैवाहिक जीवनातले चढउतार, बंधनं, वादळं, त्यात सारंगची होणारी ओढाताण आणि या सर्वांच्या सुखदुःखांशी समरस होणारे त्यांचे घरमालक दाजिबा (शरद तळवलकर) व सौ. दाजिवा (लता थत्ते) असा हा सगळा प्रपंच आहे. दाजिबा, राधाकाकू आणि सुधीर–सारंगची मॉडेल मोनिका (नवतारका शलाका) ही तीन पात्रे ही विनोदाची प्रमुख आणि शुद्ध उगमस्थान. शुद्ध म्हणायचं कारण ही तीनच पात्रं प्रारंभापासून शेवटपर्यंत विनोदी राहतात – अर्थात कमी अधिक प्रमाणात–पण इतर पात्रं मात्र तीन अंकात चढत्या श्रेणीनं गंभीर होत जातात. विशेषतः वसुधा तर कौटुंबिक जिव्हाळ्याच्या हृदयस्पर्शी नाटकात शोभेल इतक्या उत्साहानं रडारड वगैरे करते, आणि विशेषतः दुसऱ्या अंकाच्या अखेरीस ती (खोटंखोटंच) घर सोडून जायला निघते तेव्हा तर नवविवाहितांच्या नैसर्गिक रुसव्याफुगव्यांना अकारणच 'घराबाहेर' छाप गंभीर मुलामा दिला जातो. खरं सांगायचं तर सुधीर–वसुधाची भांडणं प्रथम नाट्यमय आणि नंतर नंतर अतिनाट्यात्मक करून सबनिसांनी व्यंगात्मक खुसखुशीत विनोदाचा एक राजमार्ग वाया दवडला आहे, असं माझं व्यक्तिगत मत आहे. आहे या स्थितीत सुधीरला लग्न केल्याबद्दल झालेला पश्चात्ताप एक अंकभर का होईना, पण उगीचच वास्तववादी वगैरे वाटायला लागतो आणि मग नाटकाच्या पहिल्या अंकाचा सूर, खेळकर टोन, फास्ट टेंपो यांच्यावर पाणी पडतं. अर्थात एवढं असूनही शुभारंभाच्या प्रयोगाला आलेले प्रेक्षक मात्र हवे तिथे आणि हवे तेवढे (आणि नको तिथे, नको तेवढेसुद्धा) हसत होतेच, वर काहीजण माझ्यासारख्या तुरळक अभागी विनोदवैऱ्यांची करुणार्द्र कीवही करीत होते. शरद तळवलकरांनी काहीही केलं तरी लोकांनी हसायचं हा रिवाज एक मान्य, पण बाकीच्यांचं काय ? अशा घाऊक हशांचं एक रहस्य तिथल्या एका नाट्यतज्ज्ञानं मला सांगितलं, पण तळवलकर आणि 'कलाकार'चे कलाकार यांच्या सज्जनतेवर विसंबून मी ते खोटं ठरवून सोडून देतो.

सहा पात्रांतील तीन पुरुषभूमिकांच्या बाबतीत नाटकानं पुरेसे समाधान दिलेले आहे. निकते, आचवल व तळवलकर तिघांनीही समजून व जबाबदारीनं आपला वाटा उचलला. मला स्वतःला आचवलांचं काहीसं बाजूला पडलेलं काम अधिक आवडलं. तळवलकरांचं, त्यांच्या अलीकडे दुर्मिळ झालेल्या संयमाबद्दल, अभिनंदन करायला हवं. (जाता जाता : इथल्या बऱ्याचशा संयमित विनोदाबरोबरच 'तूच माझी राणी' या चित्रपटातल्या त्यांच्या अगदी moderate भूमिकेची तुलना करून पाहणं इष्ट होईल. संयमामुळे चारदोन हशे कमी वसूल झाले झाले तरी अभिनयात नैसर्गिक सहजता येत नाही का ? ) स्त्रीभूमिकांबद्दल अनुदार उद्गार काढण्यापेक्षा स्त्रीदाक्षिण्य दाखवून मूग किंवा जमेल ते गिळलेलेच बरे. नवतारका शलाका बरीच समाधानकारक. नाटकाचं नेपथ्य आणि दिग्दर्शन सुबक, एवढेच. दिग्दर्शक निकते यांची प्रतिभा स्वतःच्या मर्यादांबरोबरच लेखनसीमांनीही जखडलेली दिसते.

नाटकाची एकूण प्रकृती पाहिल्यानंतर 'बोंब' हा शब्द भलताच आक्रस्ताळेपणाचा आणि अनावश्यक वाटतो. या नाटकात दाखवलेले प्रकार, समजा घरोघर घडत असले तरी त्यांना 'बोंब' म्हणता येईल का, याबद्दल मी चांगलाच साशंक आहे. ही असली 'बोंब' घरातसुद्धा फारशी सुखद वाटत नाही. नाट्यगृहाची गोष्टच वेगळी. □

मराठी चित्रपट

# तूच माझी राणी

## हुकमाच्या राणीने जिंकलेला डाव!

मुंबईत (चक्क) मेट्रो आणि पुण्यातसुद्धा नटराजला प्रथम प्रदर्शित झालेला एक भाग्यवान मराठी चित्रपट एवढ्याच पार्श्वभूमीनिशी 'तूच माझी राणी' पाहायला गेलो तेव्हा आदल्या आठवड्यातल्या 'जवळ ये लाजू नको'चा धसका मनात ताजा असल्याने अपेक्षा तशा माफक होत्या. अर्थातच, हिंदीतल्या 'मनचली' किंवा 'छोटी सी बात'च्या जातीची काहीतरी बेहतरीन 'डिश' आपल्यासमोर येईल याची सुतराम कल्पना मला नव्हती. या अनपेक्षितपणामुळेही असेल कदाचित, अपेक्षाभंगाच्या सुखद धक्क्यामुळेही असेल कदाचित, पण 'तूच माझी राणी' मला आवडला. अगदी प्रमाणाबाहेर, बेहिशोबी आवडला.

'बायांनो नवरे सांभाळा' या यशस्वी मराठी चित्राचे निर्माते उदय चित्र आणि ना. गो. दातार याचीच ही दुसरी स्वतंत्र निर्मिती. अर्थात तिची तुलना मी 'मनचली' किंवा 'छोटी सी बात' बरोबर केली ती मुख्यतः एकंदर थाटा–घाटाच्या संदर्भात. दर्जातील साम्य–भेदाचा प्रश्न इथं तरी अर्थातच गैरलागू आहे. प्रेमासारखा चिरंतन चोथा विषय Light comedy ची डूब दिली की अति खुसखुशीत आणि फर्मास चवदार बनतो हे या सगळ्या चित्रपटांनी दाखवून दिलंय आणि प्रेमाचं मद्रासी सांबार ओरपून वैतागलेल्या सुबुद्ध रसिकांना दिलासा दिला आहे. हीच प्रक्रिया मराठीत चालू करून, 'तूच माझी राणी' सध्याची कोंडी फोडील आणि मराठी चित्रसृष्टीला काही नवी दिशा सुचवील, अशी आशा करायला भरपूर वाव आहे. अर्थात त्यासाठी अशा चित्राचं होतं त्यापेक्षा अधिक हार्दिक स्वागत व्हायला पाहिजे.

'तूच माझी राणी'च्या श्रेयनामावलीत विशेष उल्लेख करायला हवा तो राजेश

मुजुमदारांचा. पांडू हवालदारनंतर झपाट्यानं प्रगती करीत असलेल्या मुजुमदारांनी या चित्राची कथा-पटकथा-संवाद आणि गीतं अशा चार प्रमुख अंगांचा ताबा मिळवलेला आहे. त्यांची ही चौरस कामगिरी अभिनंदनीय असली तरी पटकथाबांधणी आणि गीतरचना या दोन क्षेत्रात त्यांना मर्यादित यश लाभलंय. चित्रातली तीन-चार गाणी कामचलाऊ आहेत, आणि स्वर्गीय वसंत देसाईंच्या चाली अजिबात संस्मरणीय नाहीत, याबद्दल दुमत होऊ नये. 'आज अचानक कशी उमलली भावफुले हृदयात' हे गाणं हा एक बऱ्यापैकी अपवाद. पटकथा बांधताना, मूळ रोमँटिक पेअर आणि त्याला समांतर पण विरुद्ध दिशेनं जाणारी विवाहित जोडी यांचा सांधा, निदान पूर्वार्धानंतर तरी, मुजुमदारांनी सफाईनं जुळवला आहे. पण मुख्यतः सामान्य विनोदनिर्मितीसाठी वापरलेलं त्रिकूट (गणेश सोळंकी, रणजित बुधकर, वसंत शिंदे) मात्र या सर्वांपासून बरंच वेगळं पडत असल्याने त्यांचा विनोद बरा असला तरी त्याला पॅचवर्कचं स्वरूप आलं आहे. संवादलेखनाची जबाबदारी मात्र मुजुमदारांनी ताकदीनं पेलली आहे. पात्रानुकूल किंवा भावानुकूल संवाद लिहिणं कठीण नाही, पण 'तूच माझी राणी' मधले संवाद चालू काळाशी पक्कं नातं जोडताना दिसतात हे विशेष. त्यामुळे बहुसंख्य पात्रांच्या तोंडून १९७६–७७ चीच भाषा ऐकायला मिळते; आणि हायसं वाटतं.

चित्रपटाची कथासुद्धा चालू काळाशी नातं सांगणारीच आहे. शरद तळवलकर आणि त्यांच्या 'कुटुंबा'च्या बऱ्यापैकी सुखवस्तू घरात, शरदरावांचा भाचा त्र्यंबक उर्फ राजेश आणि त्यांच्या सौभाग्यवतींची भाची काशी उर्फ हेमा या दोघांची गाठ पडते. एकमेकांच्या प्रेमात यथावकाश आणि यथास्थित पडल्यानंतर आपल्याला कुणाचीच विरोध नसल्याचं या मंडळींच्या लक्षात येतं. पण म्हणून त्यांचं मीलन सहजासहजी होणारं नसतं. कारण पेटंट हिंदी सिनेमाप्रमाणे इथं जालिम जमानेवाले मुहब्बतकी राहोंमें' रोडे अटकावून वगैरे बसले नसले, तरी या दोघांचे प्रेमातले रुसवेफुगवे, असूया, भांडणं वगैरे काय कमी असतात? लग्नानंतर बांधायच्या बंगल्याला रंग निळा द्यायचा की गुलाबी, या तत्त्वाच्या प्रश्नावरून इथं आत्महत्त्येचीही तयारी असते. मध्यंतरापर्यंत बृहन्मुंबईत बृहद्गोंधळ घातल्यानंतर राजेश-हेमा लग्नाआधी एकमेकाला समजून घ्यायला म्हणून म्हणे महाबळेश्वरला राहायला जातात. (मुजुमदारजींना आपण इथं मानलं. काळाबरोबर चालताना ते पाचपंचवीस पावलं पुढंही सहज धावून गेले आहेत!) तिथे अशोक (रविराज) आणि आशा (मीना टी.) या विवाहित परंतु भांडखोर जोडप्याबरोबर त्यांची गाठ पडते. जोडीला फोडणी म्हणून त्या हॉटेलची कजाग मालकीण राधाबाई (पद्मा चव्हाण) आणि तिचा नवरा–अर्थात नंदीबैल (धुमाळ), आणि 'ते' त्रिकूट. शेवट अर्थातच अपेक्षित.

मराठी चित्रपटात अभावानं तळपणाऱ्या ज्या अनेक गोष्टी 'तूच माझी राणी'मध्ये आहेत, त्यात समर्थ दिग्दर्शनाचा उल्लेख आवश्यक आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतले विख्यात संकलक आर. टिपणीस यांनी दिग्दर्शक म्हणून चित्रावर उत्तम पकड ठेवली आहे; त्यांचा वावर चित्रात निश्चित जाणवतो. खासकरून चित्राची सुरुवात त्यांनी अतिशय आकर्षक बनवलीय्. गाण्याच्या– त्यातही द्वंद्वगीताच्या– टेकिंगमध्ये मात्र त्यांची थोडी अडचण झाल्यासारखी वाटते. तथापि चित्रपटाचा हलकाफुलका, हास्यप्रधान सूर त्यांनी सुरुवातीपासूनच छान उचललाय. अगदी हीच गोष्ट अमोल पालेकर (राजेश) आणि जयश्री टी. (हेमा) यांची आहे. हिंदी चित्रसृष्टीत नाव कमावलेल्या या गुणी कलाकारांचा मराठीतला हा पदन्यास मराठी चित्रसृष्टीला नक्कीच लाभदायक ठरावा. जयश्री टी.चा 'फरारी' पाठोपाठ प्रदर्शित झालेला हा दुसरा मराठी चित्रपट. यातली भूमिका मात्र 'फरारी'पेक्षा शंभर टक्के वेगळी; एका अल्ट्रामॉडर्न युवतीची. भूमिकेप्रमाणे अभिनयपद्धतीला मुरड घालण्यात यशस्वी ठरलेल्या या कुशल नर्तिकेनं याही चित्रपटावर आपली पकड सतत कायम राखली आहे. काशी उर्फ हेमाची खेळकर भूमिका तिनं मोठ्या सहजतेनं आणि मोकळेपणानं वठवली आहे. मधनंमधनं मात्र ती खराखुऱ्या ओरिजिनल 'हेमा'च्या स्टाइलस मारत असल्याचा संशय येतो, तो काही फारसा सुखद नव्हे. अमोल पालेकर तर सध्या 'फार्मात' आहेच. विलक्षण अकृत्रिम आविष्कारपद्धती हे त्याच्या इथल्या भूमिकेचं वैशिष्ट्य म्हणता येईल. पडद्यावर नायक इतक्या निर्लेप, निर्भेळ, 'स्टाइल'रहित सहजतेनं वावरल्याची उदाहरणं मराठीच काय, पण हिंदी चित्रसृष्टीतही अभावानंच आढळतील. या जोडीचं पडद्यावरचं दर्शन अतिशय आकर्षक आणि नेत्रसुखद आहे हेही नमूद करायला हवंच. इतर पात्रात शरद तळवलकर संयमित व सुरेख. पद्माबाई खूपच सुसह्य. चित्रपट तांत्रिकदृष्ट्या अतिशय समृद्ध आहे, हीही गोष्ट आवर्जून नोंद करावी अशीच. गिरीश कर्वे यांचं दर्जेदार रंगीत छायालेखन आणि निर्दोष ध्वनिमुद्रण करणारे कुणी अज्ञात मानकरी यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

मराठी चित्रपटात दुर्मिळ असणारी या चित्रपटातली आणखी एक गोष्ट म्हणजे त्यातली वातावरणनिर्मिती. विनोदात अतिशयोक्ती किंवा आचरटपणा टाळल्यामुळे आणि जागोजाग लहानसहान विनोदी प्रसंग, 'पंचेस' विखरून दिल्यानं हा परिणाम साधला आहे. आणि एकदा साधलेली ही विनोदाची भट्टी नासवायचं पापही, त्यात गुन्हेगारी, फाइट्स्, कॅब्रे इ. काही न घुसडल्यानं घडलेलं नाही. राजेश–हेमा मुंबईत भटकताना उडालेले घोटाळे, त्यांचा पळून जाण्याचा प्रयत्न, तिची आत्महत्त्येची धमकी आणि एकंदरीत उभयतांची प्रेमाची भांडणं, भांडणांचं प्रेम वगैरे कसं झकास जमून आलंय्. जोडीला मग एक होरारत्न– एक नटवर्य– एक रेसपेट असे ते त्रिकूट आहेच.

असो. विचार खाऊन जगणारे प्रेक्षक–समीक्षक चित्रपटाला पलायनवादी वगैरे म्हणण्याची शक्यता जमेला धरूनही मी असं म्हणेन की 'तूच माझी राणी' निदान शहरी प्रेक्षकवर्गात तरी हमखास डाव जिंकणारी हुकुमाची राणी ठरण्यायोग्य आहे.

# संग्राम

'फकीरा' मालिकेतील एक शत्रुप्रयत्न !

'संग्राम' या नावावरनं कुणाला वाटेल तसा हा जुना ऐतिहासिक तलवारपट नव्हे. हा आपला 'फकीरा' मालिकेतला एक सोसो पिक्चर आहे. हिंदी पडद्यावर हीरो म्हणून प्रस्थापित होण्यासाठी शत्रुघ्न सिन्हा-साहेबांनी चालवलेल्या महान धडपडखटपटींचा हा एक प्रकार असावा. या चित्रात त्यानं काम तसं वाईट नाही केलेलं, आणि आपले खास नखरेही बेताबातानंच वापरलेत, पण इकडूनतिकडून अवयव जमवून बनवलेल्या सांगाडयात प्राण फुंकण्याइतका जादूगार अभिनेता काही शत्रुघ्न नव्हे. हिंदी पिक्चरवाले सध्या धार्मिक ऐक्यावर तुटून पडलेले दिसतात. खन्नाच्या 'महाचोर 'मध्ये ही भाई-भाईची भानगड होतीच. आता सिन्हाच्या संग्राममध्येही शंकर (शत्रुघ्न सिन्हा) आणि सलीम (डॅनी) यांची गळा-मिठी आहेच. हे दोन जिवलग साथी लहानपणी जत्रेत चुकणं (हिंदी सिनेमातल्या जत्रेचा हा एकमेव उपयोग.) आणि मोठेपणी प्रतिस्पर्धी गँगजतर्फे आमनेसामने खडे ठाकणं, ऐन मोक्याच्या वेळी दोघांनाही नातं कळल्यामुळे दोघांनी एकत्र येऊन खऱ्या व्हिलनला खडे चारणं वगैरे लवाजम्यात कुठे काहीही कमी नाही. 'फकीरा 'सह नाना चित्रपटातले सर्व सुपरिचित प्रसंग इथे एखाद्या म्युझियमसारखे एकत्र पाहायला मिळतील एवढंच.

भप्पी लाहिरी यांचं रडवं संगीत हा संग्राममधला सर्वाधिक बोअर प्रकार आहे. 'चांदी की पायलिया बोले छम छम छम' हे अगोदरच लोकप्रिय झालेलं गाणं वगळता एकही गाणं तर संस्मरणीय नाहीच, शिवाय गाण्याची एकंदर प्रचंड संख्यासुद्धा विसरलेलीच बरी. डॅनी आणि सेठ गिरिधारिलाल उर्फ दुर्जनसिंग (अजित) यांची कामे सुसह्य शत्रुघ्नची पार्टटाईम नायिका म्हणून रीना. रॉय झकास दिसली असली तरी तिला फारसा वाव तर नाहीच पण तिच्या भूमिकेला काही अर्थ, स्वरूप, सुसंगत रचना वगैरे काही भानगडच नाही. कारण शत्रुघ्नाला प्रत्येक 'फ्रेम 'मध्ये पुरेसा 'स्कोप' हवा !

सिनेमा सेन्सॉरकडनं पुनःसंशोधित झाला असला तरी मारामाऱ्या वगैरे दणकट आहेत.

लहान मुलांना बागुलबुवाची भीती दाखवण्यापुरताच या पिक्चरचा काही झाला तर उपयोग.

—शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २९।१।७७ ते ४।२।७७

### काँग्रेस पक्षात नव्या नेतृत्वाची चाहूल

सध्या मकर रास सत्ता व राजकारणाच्या आघाडीवर चमकत आहे. मकर संक्रमण हे एक उपकारक साधन आहे. काँग्रेस हा सत्तारूढ असून भारताच्या भवितव्याशी हा पक्ष निगडीत आहे. मकर ही महत्त्वाची रास आहे व पंतप्रधान श्रीमती गांधी, तसेच यशवंतराव चव्हाण सारखे नेते भारताचे भवितव्य घडवण्यास आघाडीवर आहेत. पण असे असले तरी ठिकठिकाणी काँग्रेसमध्ये गटबाजीचे खेळ चालू असून नव्या नेतृत्वाचं प्रश्न पुढे येत आहे. यावेळी पंतप्रधान अशा काही नव्या व्यक्तींना अचानक पुढे आणण्याची शक्यता आहे. अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा प्रश्न निर्माण होणार असून त्या जागी केंद्रिय मंत्रिमंडळातून एखादी व्यक्ती निवडली जाण्याची शक्यता आहे. मुंबई व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या एकी करणाला जोरदार गती मिळणार असून येथल्या काँग्रेस अध्यक्षपदावर एखादी नवी तडफदार व्यक्ती घेण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात नेतृत्व बदलाची चाहूल लागेल. महाराष्ट्र व केंद्रिय मंत्रिमंडळात बदल्यांच्या हालचाली गुप्तपणे चालू होतील.

### मेष : प्रगतीची घोडदौड

सध्या ज्या राशी विशेष महत्त्वाच्या ठरल्या आहेत त्यांत मेष रास आहे. भाग्यस्थानी राशीस्वामी मंगळ व दशमस्थानी रवी तसेच राशीत गुरु अशी उत्कृष्ट ग्रहांची साथ गेल्या कित्येक दिवसांत लाभली नव्हती. आता जे जे काही तुम्हाला करावयाचे आहे ते ते करा. यश व सफलता हात जोडून तुमच्यासमोर उभी राहतील. नोकरीत तुमचे बरेच मोठे वजन वाढणार आहे. प्रमोशनची माळ यावेळी काही खटपट न करता तुमच्या गळयात पडणार आहे. बदली मिळू शकेल. बेकारांना यावेळी रिकामे राहावे लागणार नाही. रेसमध्ये व लॉटरीमध्ये यावेळी एखाद्याचे नशीब उघडू शकेल. आरोग्य सुधारेल. शुभ दिनांक २९–३१.

**महिलांना :** नोकरीत बढती मिळेल. कुमारिकांचे विवाह जमतील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत यशाची माळ गळयात पडेल.

### वृषभ : नोकरीत उत्तम

यावेळी तुमचे यश रवी या ग्रहांच्या राजाकडे आहे. तो भाग्यस्थानी आहे. गुरु-मंगळाचा त्रिकोणयोग होत आहे. पण व्ययस्थानी गुरु व केतू आहे. त्यामुळे प्रगतीची गाडी अडखळतच जाणार आहे. यावेळी तुम्ही तुमची भाषा व बोलणे शहाणपणाचे ठेवा. कारण गुरु हातून नको ते घडवतो. आर्थिक बाजू एकदम भक्कम नसली तरी पैशाची गरज कशी तरी भागवू शकाल. धंद्यासाठी कर्ज वा इतर मदत मिळू शकेल. राजकारणी व्यक्ती उपकारक ठरू शकेल. आरोग्याची काळजी घ्या. विशेष करून वाहन हाकताना वेगावर मर्यादा ठेवणे आवश्यक आहे. विवाहाचा बेत काही दिवस लांबणीवर टाकणे श्रेयस्कर. शुभ दिनांक ३१–१.

**महिलांना :** शेजारी वा इतर लोकांबरोबर भांडणे टाळा.

**विद्यार्थ्यांना :** स्मरणशक्तीवर विसंबून राहू नका. प्रयत्न करा.

## मिथुन : अडचणीवर मात

यावेळी चंद्र-मंगळाचा प्रतियोग आहे. पण तो एवढा प्रतिकूल नाही. लेखनात भरीव प्रगती होईल. कित्येकांना पहिली प्रसिद्धी मिळेल. तुम्ही एखादी लेखक म्हणून उत्तम कलाकृतीची सुरुवात यावेळी करू शकताल. नोकरीच्या दृष्टीने अनुकूलता आहे. गेले अनेक दिवस जे उदासवाणे भासत होते ते यावेळी दूर होईल. बदल्यांच्या मार्गाचा प्रत्यय येईल. पत्रकार वा त्या व्यावसायांतील नोकरदारांना शुभवार्ता कळेल. त्यांच्या हिताचे घडेल. आरोग्याची कटकट दूर होईल, तुम्ही उच्चपदावरील व्यक्तींची गाठभेट घेऊ शकता. बेकारांना हवे ते काम मिळू शकेल. व्यापारात नफ्याचे प्रमाण वाढेल. चालू धंदा प्रगतीच्या मार्गावर येईल. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. संसारात मतभेदांना वाव देऊ नका. शुभ दिनांक १–३.

**महिलांना** : नोकरीत सहानुभूती मिळेल संसारात मतभेद होतील.

**विद्यार्थ्यांना** : केलेल्या श्रमाचे चीज होईल यश पदरात पडेल.

## कर्क : अनुकूल स्थित्यंतर

रवी-शनीचा प्रतियोग झाला आहे. परंतु शनी-मंगळाचा षडाष्टक योगही झाला आहे. तरी पण तुम्हाला सारे अनुकूल वातावरण झाले आहे. नोकरी धंद्यात बरेच मोठे स्थित्यंतर यावेळी घडून येणार आहे. चालू प्रतिकूल परिस्थिती बदलणार आहे. चालू नोकरीत वातावरण हवे तसे अनुकूल होणार आहे. नवे क्षेत्र लाभणार आहे. कर्तृत्वाला वाव मिळणार आहे. अतभूत गुणांच्या विकासाची संधी मिळणार आहे. कलाक्षेत्रातील लोकांना प्रसिद्धी व कीर्ती मिळणार आहे. अपेक्षा पुऱ्या सोणार आहेत. नोकरीत काही नवीन घडणार आहे. बऱ्याच आशा-आकांक्षा पुऱ्या होतील. अपेक्षीत लाभ पदरात पडल. प्रवासाला जायला हा काळ उत्तम आहे. परदेशीवारी करण्याचीदेखील शक्यता आहे. लग्नाचा प्रश्न मात्र लांबणीवर पडेल. शुभ दिनांक २९–३१.

**महिलांना** : आशा-अपेक्षा सफल होतील. व्यवसायात मोठे यश मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेत यश व क्रेडिट मिळेल.

## सिंह : सन्मानाचा योग

तुमची रास मुळातच सिंहाच्या वृत्तीची आहे. मोठेपण तुम्हाला कायम मिळत असते. तुम्ही माणसे इतर सामान्य माणसाप्रमाणे असत नाही. नेहमीच काही तरी विशेष असणे हे तुमचे खास वैशिष्टय आहे. राजकारणात तुम्ही लोक नेहमीच आघाडीवर असता. यावेळी चंद्राचा मंगळाबरोबर होणारा नवपंचमयोग व शत्रुस्थानी रवी ही ग्रहांची रचना मोठे लाभदायक आहे. कोणतेही डावपेच लढवा. यावेळी तुम्ही यशस्वी होणार आहात. तुमचे स्थान उखडून टाकण्याचे जे प्रयत्न करीत होते तेच तुमच्या सहकार्याची अपेक्षा करतील. नोकरीत तुम्ही वरचे स्थान मिळवणार आहात. बेकारांना नोकरीत प्रवेश मिळेल. तब्बेत चांगली राहील. आर्थिक बाजू मात्र अजून थोडी कच्चीच राहाणार आहे. नवी संधी मिळेल. शुभ दिनांक ३१–२.

**महिलांना** : सार्वजनिक जीवनात व कौटुंबिक जीवनात मोठेपणा चालत येईल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेची भीती बाळगू नका. यश मिळेल.

## कन्या : अनुकूलता आहे

कन्या राशीला कष्ट फार करावे लागतात याला काही इलाज नाही. फक्त त्या कष्टांचे चीज झाले पाहिजे हीच अपेक्षा असते. तुमची ही अपेक्षा यावेळी बऱ्याच मोठ्या प्रमाणात सफल होईल. पाचवा रवी तुमच्या अपेक्षा सफल करार आहे. प्रामुख्याने नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. विरोध असा फारसा होणार नाही. चालू नोकरीत बरेच अनुकूल स्थित्यंतर घडणार आहे. बेकारांना आता फार काळ वनवास भोगावा लागणार नाही. आर्थिक बाजू सुधारेल. मन सोडून पैसा खर्च करणे शक्य नसले तरी गरज भासेल. लॉटरीचा प्रयत्न करा. दुय्यम धंद्याची स्थिती सुधारेल. प्रकृतिमान उत्तम राहील. सुखस्थानी असलेला मंगळ उगाचच मनःस्थिती साशंक ठेवील. कौटुंबिक स्वास्थ्य देखील सुधारेल. पत्रव्यवहार होईल. शुभ दिनांक २९, ३१.

**महिलांना** : घरगुती कामास मोठे यश मिळेल. समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : श्रमाचे चीज होऊन अपेक्षित यश पदरात पडेल.

## तूळ : बढती मिळेल

धनू राशीत असलेला तिसरा मंगळ तुमच्यासमोर नवीनवी क्षितीजे निर्माण करणार असून तुमच्या कर्तृत्वाला नवी संधी मिळवून देणार आहे. नोकरी असो की धंदा असो, चांगल्या सुप्त गुणांना संधी मिळणार आहे. पत्रकार–लेखक यांना लेखनात प्रोत्सहक अशी परिस्थिती राहील. जे जे लिहिले जाईल ते ते प्रभावी ठरेल. लोकप्रियता मिळेल. प्रवासास हा काळ योग्य आहे. नवे नवे काही शिकण्याच्या दृष्टीने प्रवास होईल. कलावंतांना प्रसिद्धी मिळेल. उपेक्षित कलावंताना पुन्हा चांगले दिवस येतील. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. बढती प्रमोशन मिळेल. वरिष्ठांच्या कृपेचा प्रसाद मिळेल. स्थानांतर होईल. आरोग्याची परिस्थिती सुधारेल. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह होणे असतील त्यांचे विवाह ठरतील. पार पडतील. कापड व्यापारी व सराफ चार पैसे मिळवतील. शुभ दिनांक ३०, २.

**महिलांना** : गायकांना व लेखिकांना लोकप्रियता मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : कलेचा अभ्यास करा. कलावंताचे मार्गदर्शन लाभेल.

## वृश्चिक : नोकरीत लाभ

राशीस्वामी मंगळ दुसरा आहे. तुमची वृत्ती ही नोकरीत अधिकार गाजवणारी असते. त्याला अनुकूल अशी परिस्थिती सध्या आहे. तुमच्यापैकी जे कुणी पोलीस अधिकारी, रेव्हेन्यु अधिकारी असतील त्यांच्या गुणांचे चीज होणार आहे. बढती, प्रमोशन मिळवून देणारा असा हा आठवडा आहे. बेकारांना आता नक्कीच चांगले दिवस येणार आहेत. जमिनीची कामे यशस्वी होतील. वारसदारीची कामे पार पडतील.

कोर्टकचेरीतील कामे सफल होतील. वरिष्ठांच्या गाठीभेटी होतील. प्रवासाचा बेत सुखकारक रीतीने पार पडेल. कौटुंबिक मतभेद मिटतील. पतीपत्नींचे संबंध प्रेमळ राहतील. नवे वाहन खरेदी करण्याची परिस्थिती आहे. चार पैसे हाती येतील. रेसमध्ये परीक्षा पाहायला हरकत नाही. आर्थिक कोंडी कमी होईल. धंद्याच्या अडचणी निवारण होतील. मदत व सहकार्य मिळेल. शुभ दिनांक ३१–२.

**महिलांना** : अपेक्षा न करता मान मिळेल. विवाहेच्छू कुमारिकांना शुभवार्ता कळेल.

**विद्यार्थ्यांना** : भांडणापासून दूर राहावे. कायदा मोडू नये.

## धनू : प्रभाव वाढेल

राशीत मंगळासारखा ग्रह असताना तुम्ही काळजी का करता ? यावेळी तुमचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी राहील की, जे जे मनात आणाल ते ते घडण्याचे सामर्थ्य मंगळ तुम्हास प्राप्त करून देणार आहे. तुम्ही नवीन धंद्याची सुरुवात करू शकता. थांबलेल्या धंद्याची परिस्थिती सुधारू शकता. अनेकांची मदत व सहकार्य तुम्हास मिळणार आहे. तुम्ही जर लेखक असाल तर तुम्हाला नवी कल्पना सुचेल व तुमच्या लेखनाची सुरुवात होईल. उपासना फलदायी होईल. प्रवासाला बरीच अनुकूलता आहे. तुम्ही जर महत्त्वाच्या कामासाठी उच्च पदावरील व्यक्तीबरोबर चर्चा करणार असाल तर त्याला अनुकूलता आहे. नोकरीत परिस्थिती अनुकूल राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. तुमच्यापैकी ज्यांना लग्नासाठी प्रयत्न करावयाचे असतील त्यांना हा काळ अनुकूल आहे. कौटुंबिक व सांसारिक संबंध चांगले राहतील. शुभ दिनांक २–३.

**महिलांना** : तुमचा त्रास संपलेला आहे. नवे सुखदायक पर्व सुरू होईल.

**विद्यार्थ्यांना** : अनेकांची मदत व सहकार्य मिळेल.

## मकर : यशाची चाहूल

मकर रास सध्या आघाडीवर आहे. राजकारणात ही रास श्रेष्ठ आहे. तसेच उद्योग व कचेरीतदेखील या राशीची माणसे आघाडीवर आहेत. सध्या राशीस रवीसारखा श्रेष्ठ समर्थ ग्रह आहे व मंगळ बारावा आहे. त्यामुळे काही उत्तम तर काही प्रतिकूल असा अनुभव आहे. राजकीय आघाडीवर तुम्ही जिंकणार आहात. प्रतिष्ठा उंचावणार आहे. नोकरीच्या दृष्टीनेदेखील हा आठवडा विशेष महत्त्वाचा ठरेल. अनेक दिवसांच्या आशा-आकांक्षा सफल होतील. धंद्यात अडचणी कमी होऊन यशाची नांदी सुरू होईल. व्यापारी क्षेत्रात–विशेष करून खते, औषधे, सौंदर्य प्रसाधने या व्यापारात मोठा नफा मिळणार आहे. नोकरीत तुम्ही जर अंमलबजावणी करणारे असाल तर फार काळजीपूर्वक वागणे आवश्यक आहे. शुभ दिनांक ३१–३.

**महिलांना** : आरोग्याच्या सर्व तक्रारी दूर होतील. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : परिश्रम करणे आवश्यक आहे. यश मिळेल.

## कुंभ : महत्त्वाकांक्षा बहरतील

कुंभ राशीची माणसे आता कोंडीतून बाहेर पडली आहेत. त्याची दृश्य फले याच आठवड्यात दिसू लागणार आहेत. बारावा रवी तुमचे कोणतेच नुकसान करणार नाही. राजकारणात तुम्ही आजवर जे परिश्रम केले ते यावेळी उपकारक ठरणार आहेत. आता तुम्ही उच्च पदस्थ व्यक्तींच्या गाठीभेटी घेऊन तुमचे म्हणणे त्यांच्याकडे मांडा, यश व सफलता मिळेल. यावेळी तुमच्या महत्त्वाकांक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील. नोकरीची परिस्थिती सुधारेल. तुमचे हक्क तुम्हाला विशेष त्रासाशिवाय मिळतील. वरिष्ठांच्या मनातील गैरसमज दूर होऊन त्यांची मर्जी बसेल. आर्थिक बाजू एकदम सुधारली नसली तरी पैसा मिळण्यात अडचणी नाहीत. रेसमध्ये पैसा मिळू शकेल. शेती–व्यापार सुधारून नफा मिळेल. केलेले श्रम सत्कारणी लागतील. शुभ दिनांक २९–३१.

**महिलांना** : नोकरीत अधिकार वाढतील. प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे.

**विद्यार्थ्यांना** : संशोधनात लक्ष घाला. प्रवासात नव्या ओळखी होतील.

## मीन : यश पदरी पडेल

दुसरा गुरू, अकरावा रवी, दहावा मंगळ अशी एकंदर छान ग्रहस्थिती सध्या तुमच्या वाट्याला आलेली आहे. यावेळी हातून महत्तम कार्य घडेल. सर्व प्रकारची कार्यक्षमता वाढेल. बुद्धी तल्लख होईल. मन उत्साही राहील. त्यामुळे जे मनात आणाल ते पद मिळवून देईल. प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. आशाआकांक्षा सफलतेच्या दृष्टिपथात येतील. नोकरी असो की धंदा असो, प्रगतीचे नवे युग निर्माण करू शकाल. लेखकांना नवे दालन गवसेल. सरकारदरबारी प्रतिष्ठा वाढेल. सत्तेवरील उच्चपदस्थ व्यक्तीची कृपा लाभेल. राजकारणात तुमच्या कामाचे श्रेय तुमच्या पदरात पडेल. तुम्ही एक मोठी व्यक्ती म्हणून ओळखले जाल. पत्रव्यवसायात तुम्ही असाल तर तुमचे मोठे काम होईल. तुमचे लेखन गाजेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. सर्व प्रकारची अस्थिरता दूर होईल. शुभ दिनांक २९–१.

**महिलांना** : संसारात सुख मिळेल. मुलांची मदत होईल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेची तयारी करा. बुद्धी प्रभावी होईल.

□


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय-एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**